ग्रं. सं. ठाणे
विषय कादंबरी
सं. नं. ३८९

REFBK-0001111

Printed and Published at the Manoranjan Press,
1, Girgaon Road, Bombay, by K. R. MITRA.

## साक्रेटिसाची ईशप्रार्थना.

परमेश्वरा! आमचें कल्याण खरोखर कशांत आहे आणि अकल्याण कशांत आहे, हें आह्मांला समजत नाहीं. तूं सर्वज्ञ आहेस, तुला तें सर्व विदित आहे; ह्मणून ज्या गोष्टींत आमचें कल्याण आहे, त्या गोष्टी आह्मीं तुजपाशीं मागितल्या नसल्या तरी तूं आह्मांला दे, आणि ज्या गोष्टींत आमचें अकल्याण आहे, त्या गोष्टी, आह्मीं तुजपाशीं मागितल्या तरी तूं आह्मांला देऊं नको.

झेनोफन.

# साक्रेटीस आणि त्याचे विचार.

लेखक

गोविंद गोपाळ टिपनीस.

प्रकाशक:-

मनोरंजन छापखान्याचे मालक,

गिरगांव-मुंबई.

REFBK-0001111

किंमत ०-८-०.] सर्व हक्क स्वाधीन. [सन १९१५.

# प्रस्तावना.

या पुस्तकाचे सामान्यतः दोन भाग असून, त्यांपैकीं पहिल्यांत स्वतंत्रपणें लिहिलेलें साक्रेटिसाचें अल्प चरित्र दिलें आहे; आणि दुसऱ्यांत, **झेनोफन**च्या '**मेमारेबिलिया**' नामक पुस्तकाच्या आधारें त्याचे विचार दिले आहेत. झेनोफन हा साक्रेटिसाचा शिष्य आणि मित्र होता. एकदां साक्रेटिसाची आणि त्याची रस्त्यांत गांठ पडली असतां 'शिधा कोठें मिळतो ?' असें साक्रेटिसानें त्याला विचारलें. झेनोफननें या प्रश्नाचा सरळ जबाब दिल्यानंतर 'ज्ञान कोठें मिळतें ?' असा दुसरा प्रश्न साक्रेटिसानें त्याला केला. आपला प्रश्न ऐकून झेनोफन घोंटाळ्यांत पडला असें पाहून 'माझ्या मागून ये; म्हणजे मी तुला या प्रश्नाचें उत्तर देतों,' असें साक्रेटिसानें त्याला सांगितलें. हीच या गुरुशिष्यांची पहिली भेट होय. झेनोफन साक्रेटिसाबरोबर गेला आणि त्यानें पाजलेल्या ज्ञानामृताचें प्राशन करीत आमरण त्याच्या सहवासांत राहिला.

साक्रेटीस आपले विचार श्रोत्यांच्या अंतःकरणांत जे बिंबवी ते बहुधा त्यांच्याशीं निरनिराळ्या विषयांवर संभाषणें करून बिंबवीत असे. यांपैकीं त्याचीं जीं संभाषणें झेनोफननें स्वतः ऐकलीं होतीं, तींच त्यानें आपल्या पुस्तकांत जशींच्यातशीं लिहून काढिलीं असल्यामुळें, त्यांच्या खरेपणाबद्दल संशय घेण्याचें कारण रहात नाहीं.

झेनोफन हा एक अगदीं सामान्य मनुष्य होता; त्यामुळें केवळ व्यवहारिक विषयांवरील साक्रेटिसाचे जे संवाद त्यानें ऐकिले, तेच फक्त त्यानें या पुस्तकांत लिहिले. तत्त्वज्ञानासारख्या गहन विषयावरील त्याच्या संभाषणांचा समावेश त्यानें या पुस्तकांत केला नाहीं. अर्थात्, आह्मीं या पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत दिलेले '**साक्रे-**

# प्रस्तावना.

टिसाचे विचार ’ सामान्यत: सर्व लोकांना समजण्यासारखे असून सर्वांना त्यांचा अत्यंत उपयोग होण्यासारखा आहे; तसेच ते सर्वांच्या मनांत ठसण्यासारखे असून, सर्वांनीं ते आचरणांत आणण्यासारखे आहेत; परंतु साक्रेटिसाचें खरें महत्त्व त्याच्या तत्त्वज्ञानांत आहे. अशा तत्त्वज्ञ साक्रेटिसाची ओळख वाचकांना त्याच्या या विचारांवरून होणार नाहीं. ते त्याचे तत्त्वज्ञानविषक विचार त्याचा विद्वान् शिष्य प्लेटो यानें असेच संवादरूपानें लिहिले आहेत.

मनोरंजन छापखान्याचे मालक श्रीयुत मित्र यांचें प्रोत्साहन नसतें, तर आज या व्यवहारचतुर साक्रेटिसाची आणि महाराष्ट्र-वाचकांची ओळख करून देण्याचा सुयोग मला लाभला नसता. हा साक्रेटीस महाराष्ट्रीयांना आवडतो, त्याचे विचार त्यांना ग्राह्य आणि संग्रहणीय वाटतात, आणि त्याची व्यवहारोपयोगी सल्लामसलत घेण्याकरितां तो नेहमीं आपल्याजवळ—अगदीं आपल्या घरांत असावा—ह्मणून ते सारखी धडपड करितात, असें जर श्रीयुत मित्र यांना दिसून आलें, तर प्लेटोचें मर्म जाणणाऱ्या कोणातरी विद्वानाच्या हस्तें, तत्त्वज्ञानी साक्रेटिसाची आणि महाराष्ट्रवाचकांची ओळख करून दिल्याशिवाय ते रहाणार नाहींत, अशी माझी खात्री आहे.

तत्त्वज्ञानी साक्रेटिसाचे प्लेटोनें लिहिलेले संवाद आपल्या आंगच्या स्वाभाविक तेजानें सर्व जगाचें वाङ्मयरत्नभांडार सुशोभित करीत असतां आमच्या सरस्वतीमंदिरांत त्याची आज जी उणीव भासत आहे ती ईश्वरीकृपेनें लौकरच नाहींशी होवो असें इच्छून, आमचे वाचक आणि ‘ **साक्रेटीस आणि त्याचे विचार** ’ यांच्यामधील हा पडदा दूर करितों.

महाड,
ता. ३१ जुलई, १९१५.

**लेखक.**

# सॉक्रेटीस.

"न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते."

आपल्या ज्ञानामृतानें, भूपृष्ठावर सर्वत्र चैतन्य उत्पन्न करणारा महात्मा गौतम आमच्या आर्यावर्तांत होऊन गेल्यांस पुरीं शंभर वर्षे झालीं असतील नसतील, तोंच ग्रीस देशाला ललामभूत असा साक्रेटीस नांवाचा महात्मा, तेथें अथेन्सनजीक आलोपेसी नामक परगण्यांत इसवीसनापूर्वी ४६९ व्या वर्षी जन्मास आला. साक्रेटिसासारखा जगद्विख्यात महात्मा ग्रीस देशांत आजवर जन्मलाच नाहीं, असें ह्मटलें असतां चालेल. असें असतांहि, त्याच्या चरित्राविषयक माहितीची उणीव असावी, हें खरोखरच मोठें दुर्दैव होय !

साक्रेटिसाच्या बापाचें नांव सोफ्रोनिस्कस असें असून तो दगडी पुतळे खोदण्याचें काम करीत असे. त्याच्या आईचें नाव फेनॅरिटी असें होतें, आणि ती सुईणपणाचा धंदा करीत होती. सोफ्रोनिस्कस जरी मूर्तिकार होता, तरी तत्कालिन प्रसिद्ध मूर्तिकारांत त्याची गणना झालेली दिसत नाहीं; आणि सुईणपणाच्या धंद्यांत फेनॅरिटीला परोपकारजनित पुण्याईवांचून दुसरा कांहीं लाभ झाला असेल, असें वाटत नाहीं. एकंदरींत पहातां, साक्रेटीस अठरा विश्वे दारिद्र्यांत जन्मला होता, ही गोष्ट उघड आहे. त्याचें घराणेंहि त्या वेळच्या प्रसिद्ध घराण्यांत मोडत नव्हतें.

आपल्या आंगच्या दातृत्व आणि शौर्यादि गुणांनीं सकल महाभारताला भूषणास्पद झालेल्या कर्णाच्या हीन कुलाचा उच्चार करून अश्वत्थाम्यानें त्याला चिडविलें असतां, वेणी संहार नाटकांत, तो भरसभेंत त्याला ह्मणाला—

सूतो वा सूतपुत्रो वा यो वा को वा भवाम्यहम् ।
दैवाधीनं कुले जन्म ममाधीनं च पौरुषम् ॥

" मी सारथी वा सारथीपुत्र किंवा कोणीहि असो ! जन्म हा मनुष्याला त्याच्या दैवाप्रमाणें मिळत असतो; पण पौरुषाचें तसें नाहीं. तें दाखविणें आपल्या स्वतःच्या हातचें आहे."

साक्रेटिसाचा जन्म जरी अगदीं सामान्य कुळांत, दरिद्री आईबापांच्या पोटीं झाला होता, तरी या प्रतिकूल परिस्थितीला न जुमानतां आपल्या आंगच्या असामान्य पौरुषानें त्यानें आपली कीर्ति जगांत अजरामर करून ठेविली आहे.

ज्या समाजांत मनुष्याच्या जन्मजात कुळावरून अथवा जातीवरूनच मनुष्याची योग्यता ठरविण्यांत येते, अशा समाजांतील हलक्या मानलेल्या जातींत जन्मलेला मनुष्य थोड्याशा योग्यतेला चढला असतां, आपल्या वाडवडिलांचा धंदा सांगण्यास शरमतो, त्याला त्या धंद्याची मोठी लाज वाटते; पण साक्रेटिसाचें तसें नव्हतें. तो मोठा होऊन लोकांत जिकडेतिकडे त्याची मान्यता वाढल्यानंतरहि तो लोकांनां ह्मणत असे, कीं, "मूर्तिकार आपल्या कौशल्यानें अचेतन पाषाणाला मनुष्याचें सादृश्य आणितो; पण आह्मी मनुष्यें पाषाणाशीं असलेलें आपलें सादृश्य ज्ञानादि साध-

नांनीं घालविण्याचा प्रयत्न करीत नाहीं, हें केवढें आश्चर्य आहे ? आणि असें आहे ह्मणूनच माझ्या वडिलांच्या मूर्तिकाराच्या धंद्याबद्दल मला मोठा अभिमान वाटतो. माझी आई जसा बायकांचा सुईणपणा करीत असे, तसा मी लोकांच्या मनाचा सुईणपणा करून, तेथें गुप्तरूपानें असलेले अनेक सद्गुण उदयाला आणितों." साक्रेटिसानें प्रसंगोपात्त काढिलेल्या या उद्गारांवरून, त्याला त्याच्या आईबापांच्या धंद्याबद्दल लाज वाटत नसून, उलट मोठा अभिमानच वाटत होता, ही गोष्ट वाचकांच्या सहज लक्ष्यांत येईल.

या वेळीं ग्रीस देशांतील शिक्षणक्रमांत, मल्लविद्या, गायनवादनादि ललितकला, तत्त्वज्ञान, गणीत, ज्योतिष, तर्क, नीतिशास्त्रें आणि वक्तृत्वकला इत्यादि, नागरिक बनविण्याला अवश्य अशा विषयांचा समावेश झालेला होता. परंतु हा सर्व शिक्षणक्रम पुरा करण्याला जरूर त्या द्रव्याचा अभाव असल्यामुळें, सोफ्रोनिस्कसनें आपल्या मुलाला साधारण जरूरीपुरती मल्लविद्या आणि गणीत यांचें शिक्षण झाल्यावर आपल्या हाताखालीं मूर्ति घडविण्यास बसविलें. ॲक्रापोलीस नामक अथेन्सच्या किल्ल्यांत, पाजेनियस राजाच्या वेळीं साक्रेटिसाच्या हातच्या मर्क्युरी आणि ग्रेसस या देवतांच्या मूर्ति ठेविलेल्या होत्या. यावरून थोडे दिवस आपल्या वडिलांच्या देखरेखीखालीं काम करून, साक्रेटिसानें या कलेंत चांगलेंच प्राविण्य संपादिलें होतें, असें दिसतें. गणीत विद्येंत तर त्याची चांगलीच प्रगति झालेली

होती, आणि सर्व आयुष्य या गणीतशास्त्राला वाहून घेण्यापेक्षां तें यापेक्षांहि अनेकपट उपयुक्त विषयांत खर्च करणें अधिक श्रेयस्कर आहे, असें त्याचें मत नसतें, तर साक्रेटीस खरोखरच आज मोठा गणीती ह्मणून प्रसिद्धीला आलेला असता. शिल्प आणि गणीत या दोनहि विद्यांत जरी साक्रेटीस चांगला निष्णात झाला होता, तरी मनापासून तत्त्वज्ञान शिकण्याची त्याची फार इच्छा होती.

आपल्या लहानशा शिल्पशाळेंत बसून, एकदां तो एक मूर्ति घडीत असतां क्रीटो नांवाचा एक श्रीमंत गृहस्थ तेथें गेला. साक्रेटिसाचें आणि त्याचें बराच वेळ बोलणें झालें. त्यावरून क्रीटोला वाटलें, कीं, केवळ पैशाच्या अभावीं या बुद्धीवान् मुलानें, आपली सर्व संग्राहक बुद्धिमत्ता, दगड फोडण्यांत खर्च करावी हें चांगलें नाहीं. लागलीच त्यानें सोफ्रोनिस्कसची परवानगी घेऊन साक्रेटिसाला आपल्याबरोबर नेलें, आणि अॅनक्झगोरस आणि आर्किलस यांच्याकडून त्याला तत्त्वज्ञानाचें शिक्षण देवविण्याला आरंभ केला. हाच क्रीटो पुढें साक्रेटिसाचा मोठा भक्त, शिष्य आणि हितकर्ता झाला.

साक्रेटिसाच्या तत्वज्ञान शिक्षणाला कसा आरंभ झाला, त्याची ही वरील हकीकत त्याच्या कांहीं चरित्रकारांनीं दिली आहे. झेनोफनप्रमाणेंच—पण त्यापेक्षां फारच महत्त्वाचें—साक्रेटिसाचें संवादात्मक चरित्र त्याचा सुप्रसिद्ध शिष्य प्लेटो यानें लिहिलें आहे. त्यापैकीं 'फीडो' नामक संवादांत

साक्रेटिसाचें ह्मणून जें भाषण दिलें आहे, त्यावरून तो अॅनॅक्झेगोरसचा प्रत्यक्ष शिष्य नसून, त्यानें, केवळ त्याच्या ग्रंथांचा अभ्यास केला होता, असें दिसतें. दुसऱ्या एके ठिकाणीं साक्रेटीस कॅलिअसला थट्टेनें ह्मणाला कीं, "तूं खूप पैसा खर्च करून तत्वज्ञानी झालास, आणि मी केवळ माझ्या मनाशीं विचार करून स्वतःचा गुरु स्वतःच बनून तत्त्वज्ञान शिकलों." यावरून पहातां साक्रेटीस कसा तत्वज्ञानी बनला हें एक जरी गूढच राहिलें आहे असें दिसतें, तरी पहिल्या माहितीपेक्षां ही दुसरीच माहिती अधिक विश्वसनीय वाटत असल्यामुळें, तो स्वतःच्या परिश्रमांनीं आणि विलक्षण प्रतिभासंपन्नत्वानें, स्वतःसिद्ध तत्वज्ञानी झाला होता, असें मानण्यास हरकत दिसत नाहीं.

साक्रेटिसाच्या चरित्रांतील पुढील गोष्टी समजण्याकरितां ग्रीस देशाची तत्कालिन राज्यव्यवस्था समजणें फार जरूरीचें आहे. या देशाचा विस्तार अवघा २५ हजार चौरस मैल असून लोकसंख्या जवळ जवळ २४ लक्ष आहे. यावरून पहातां, आमच्या इलाख्यांतील दोनतीन जिल्ह्यांपेक्षां, तो फारसा मोठा नाहीं, ही गोष्ट वाचकांच्या सहजच लक्ष्यांत येईल. राजाच्या दृष्टीनें एकछत्री राज्य, किंवा लोकांच्या दृष्टीनें एकराष्ट्रीयत्व, असें ज्याला ह्मणतां येईल तशा प्रकारची राज्यव्यवस्था, साक्रेटिसाच्या काळीं किंवा त्यापूर्वीं केव्हांहि ग्रीस देशांत नव्हती. प्रत्येक मनुष्याला आपल्या राज्यव्यवस्थेंत सामील होतां येऊन, मोठ्या राष्ट्रां-

तील व्यक्तींस ज्या राजकीय सुखाचा अनुभव मिळण्याचा संभव नसतो, तें सुख आपल्या राज्यांतील सर्व व्यक्तींस मिळावें अशी प्राचीन ग्रीक लोकांची समजूत असल्यामुळें ग्रीस देशांत या वेळीं प्रांतिक अथवा नागरीक राज्यव्यवस्था होती. अथेन्स, स्पार्टा, कारिंथ वगैरे प्रत्येक प्रांत आपआपलें राज्य स्वतंत्रपणें चालवीत असे. त्यांचें हें पृथःकरण इतकें विलक्षण होतें, कीं, एका प्रांतांतील मनुष्याला दुसऱ्या प्रांतातील जमीन अथवा घरदार विकत घेतां येत नसे, दोन प्रांतांतील वधुवरांचें लग्न होत नसे, आणि या प्रांतांतील मनुष्यास त्याप्रांतांतील न्यायसभेपुढें दावा आणितां येत नसे. असें जरी होतें, तरी, सर्व ग्रीक लोकांचें कुल एक होतें. त्यामुळें कुलाभिमानानें ते एकमेकांस सूज्ञ समजून, ग्रीकेतरास रानटी ह्मणत असत. त्यांची भाषा एक होती, त्यांचा धर्म एक होता, देवता एक होत्या आणि राष्ट्रीय उत्सवहि एकच होते. या सामाजिक बंधनांनीं बद्ध झाल्यामुळें, परकीय शत्रु आला असतां ग्रीस देशांतील संस्थानें आपसांतील दुही विसरून त्याला जेरीस आणण्याकरितां एकत्र होत. साक्रेटिसाच्या जन्मापूर्वीं कांहीं वर्षें, ह्मणजे इसवीसनापूर्वीं पांचशें वर्षांच्या सुमारास इराणचा बादशहा दायरस यानें ग्रीस देशावर स्वारी केली असतां, वर लिहिल्याप्रमाणें सर्व संस्थानें एक झालीं, आणि त्यांनीं इराणी लोकांच्या अवाढव्य सैन्याचा आणि विस्तीर्ण आरमाराचा मेराथान येथें चांगलाच पराभव करून दायरस बादशहाला ग्रीस देशाच्या हद्दीपार हांकून लाविलें.

इतका पराभव झाला तरी, दायरसची खूमखूम जिरली नाहीं. त्यानें ग्रीसदेशावर स्वारी करण्याची पुनः तयारी चालविली; पण ईश्वरी संकेत कांहीं वेगळाच होता. त्याची ही तयारी पुरी झाली नाहीं तोंच, कृतांत महाराजांचें त्यास निकडीचें निमंत्रण येऊन त्याला परलोकची वाट सुधारावी लागली. त्याच्यामागून त्याचा मुलगा जर्कसिज, हा गादीवर बसला, आणि बापाची मरणसमयींची इच्छा पूर्ण करण्याकरितां त्यानें ग्रीस देशावर स्वारी केली. पुनः ग्रीक संस्थानें एकवटली आणि त्यांनीं दायरसप्रमाणें जर्कसीजला पराभूत करून ग्रीस देशाबाहेर पिटाळून लाविलें.

परकी लोकांच्या स्वाऱ्या अशा वारंवार होऊं लागल्यास, त्यांचा प्रतिकार करण्याकरितां वारंवार नवें एकीकरण करीत बसण्यापेक्षां ग्रीस देशांतील सर्व संस्थानांनीं आपःसांतील दुही विसरून जाऊन कायमचें एकीकरण करावें, असा विचार ग्रीक पुढाऱ्यांच्या आणि मुत्सद्यांच्या मनांत येऊन त्या दृष्टीनें प्रयत्न होऊं लागले. स्पार्टा संस्थानचे लोक मोठे रणबहाद्दर होते, तेव्हां या कायमच्या एकीकरणांत स्पार्टाला मुख्य स्थान असावें असें कांहीं लोकांचें ह्मणणें होतें; पण आरमारी युद्धांत अथेन्सचा हात धरणारे कोणी नसून, ग्रीस देशांतील सुप्रसिद्ध वक्ते, तत्त्वज्ञानी, चितारी आणि मूर्तिकार यांची अथेन्स हीच जन्मभूमि असल्यामुळें, मुख्य स्थान अथेन्सलाच मिळालें पाहिजे, असा कांहीं लोकांचा आग्रह पडला. शेवटीं बरीच भवतिनभवति

होऊन, सर्वांनुमतें संयुक्त ग्रीस देशांत, अथेन्सला अग्रस्थान मिळालें. हें अग्रस्थान वस्तुतः व्यवस्थेकारितां असून, संयुक्त संस्थानांनीं एकमेकांशीं समान हक्कानेंच वागावयाचें, असा ऐक्य करतेवेळचा खरा हेतु होता; पण मूळ हेतूचा विपर्यास जसा बहुधा सर्वत्र आणि सर्वच बाबतींत झालेला दिसतो, तसा तो या संयोगाच्या बाबतींतहि झाला. कांहीं वर्षें इतर संस्थानांनीं ठरलेल्या रकमा आणि लढाऊ जहाजें यांचा पुरवठा अथेन्सला करितांच, महत्त्वाकांक्षी अथेन्समधील लोकांची बुद्धि फिरली, आणि ते आपल्या दोस्त संस्थानांनां आपलीं मांडलीक संस्थानें समजून त्यांच्याशीं उद्धटपणानें वागूं लागले. दुसऱ्या संस्थानांनां अर्थात्च अथेन्सची ही दांडगाई खपली नाहीं, आणि त्यांनीं स्पार्टाला पुढारी नेमून त्याच्या नेतृत्वाखालीं अथेन्स संस्थानाशीं युद्धाला सुरुवात केली. हें युद्ध राहून राहून सत्तावीस वर्षें चाललें होतें. याला '**पेलापोतिशियन युद्ध**' असें ह्मणतात. या युद्धामुळें अथेन्स जें एकदां पारतंत्र्याच्या खाड्यांत पडलें, तें कायमचेंच पडलें! पुनः त्याचें डोकें वर निघालें नाहीं. पेलापोतिशियन युद्ध सुरू झालें, तेव्हां पेरिक्लीज हा अथेन्सच्या प्रजासत्तात्मक राज्याचा मुख्य होता. तो इ. स. पूर्वीं ४२९ व्या वर्षीं अथेन्समध्यें उद्भवलेल्या महामारीच्या भयंकर सांथीला बळी पडला. हा अॅनॅक्झेगोरसचा शिष्य असून केवळ आपल्या अंगच्या अलौकिक वक्तृत्वशक्तीनेंच, अथेन्सचा राज्यसूत्रचालक झाला होता. पेलापोतिशियन युद्ध याच्याच चिथावणीनें आणि आग्रहानें चालू झालें, असें पुष्कळ इतिहासकारांचें मत आहे.

अथेन्सच्या प्रजासत्तात्मक राज्यांतील सर्व पुरुषांनीं लष्करी शिक्षण घेऊन, कांहीं मुदतीपर्यंत मोहिमेवर हजर असलेंच पाहिजे, असा कायदा असल्यामुळें, पेला पोतिशयन युद्धांतील पोटीडा, डेलीयम आणि अॅम्फीयोलीस या तीन लढायांत साक्रेटीस, अथेन्सचा एक योद्धा ह्मणून हजर राहिला होता. यापैकीं पोटीडाचा वेढा दोन वर्षें चालून त्यांत अथेन्स विजयी झालें; पण बाकी दोनहि ठिकाणीं अथेन्सचा सपशेल पराभव होऊन, त्याच्या सैनिकांना आणि सेनापतींना भीतीनें आणि लज्जेनें आपलीं तोंडें खालीं घालावीं लागलीं.

पोटीडाच्या लढाईंतील, साक्रेटिसाच्या वर्तनासंबंधानें 'सिम्पाझिअम' नामक संवादांत प्लेटोनें अलिसबायडीसच्या तोंडीं घातलेले उद्गार फारच महत्त्वाचे आहेत. तो ह्मणतो— "पोटीडाच्या लढाईंत साक्रेटीस आणि मी एकेच ठिकाणीं जेवीत होतों. त्याची ती श्रमसहिष्णुता पाहून मला खरोखरच फार आश्चर्य वाटलें. अन्नाचा तुटवडा पडण्याचे प्रसंग लढाईमध्यें नेहमीं येतातच, तसा प्रसंग यावेळीं आमच्यावर आला आणि कांहीं दिवस आह्मांला अन्नावांचून काढावे लागले. या प्रसंगीं साक्रेटिसानें दाखविलेला धीम्मेपणा, मलाच काय पण सर्व सैन्यांत एकालाहि दाखवितां आला नाहीं. पोटीडाचा हिंवाळा कोण भयंकर! तेथें कित्येक दिवस बर्फाचा सारखा वर्षाव होत होता. आह्मी कोणी बहुधा बाहेर पडत नसूंच; आणि जरूरीच्या कामाकरितां बाहेर पडणें भागच झालें, तर पायाला लोकरीचे पट्टे गुंडाळून, चांगले मजबूत बूट

घालून, आणि एकावर एक चढविलेल्या पुष्कळशा कपड्यांनीं सर्व शरीर चांगलें आच्छादून घेऊन मग बाहेर पडत असूं; पण साक्रेटिसाचें तसें नव्हतें. बर्फाची वृष्टि जोरानें होत असतां तो आपल्या नेहमींच्या अगदीं साध्या पोषाकांत, अनवाणी बर्फ तुडवीत जातांना पाहून आश्चर्यचकित झाला नाहीं असा एकहि मनुष्य आमच्या सैन्यांत आढळणार नाहीं!"

डेलियम येथें बिओशियन्स लोकांशीं लढाई झाली त्या मोहिमेवर साक्रेटीस आपखुषीनें गेला होता. लढाईंत अथेन्सचा पराभव होऊन तो नेहमींप्रमाणें शांत आणि गंभीर मुद्रेनें रणमैदानावरून परत येत असतां, घायाळ होऊन पडलेला सेनोफन त्याच्या दृष्टीस पडला. लढाईंत पराभव झालेला आणि शत्रु लांडगेतोड करीत पाठीस लागलेला अशा स्थितींत आपले प्राण कसे वांचतात ही एकच गोष्ट मनात घोळून प्रत्येक सैनिक पळ काढीत असतां, साक्रेटिसानें झेनोफनला आपल्या खांद्यावर घेतलें, आणि शत्रूच्या टप्प्याआड आणून त्याच्या औषधपाण्याची व्यवस्था केली. साक्रेटीस ॲंफिपोलिसच्या लढाईवर गेला होता. अथेन्सचा पराभव होऊन या लढाईवरून तो परत आल्यावर आमरणांत त्यानें अथेन्स शहर केव्हांहि सोडलें नाहीं.

समरांगणावर उभे राहून शत्रूशीं लढत असतां वेळोवेळीं साक्रेटिसानें दाखविलेलें प्रसंगावधान आणि धैर्य, एकाद्या सेनानायकाला शोभण्यासारखें असून त्याच्या मुद्रेवर सदा शांतता दिसत असे, असें या तीनही लढायांत हजर असलेल्या एका अधिकाऱ्यानें आपलें मत लिहून ठेविलेलें आहे.

या पुस्तकाच्या ३८ व्या पृष्ठावर 'साक्रेटिसाची रहाणी' ह्मणून जो संवाद दिलेला आहे, त्यावरून लढाईवर असतांना साक्रेटिसानें दाखविलेल्या सहिष्णुतादि सद्गुणांचें इंगित वाचकांच्या लक्ष्यांत येईल. 'वासनाक्षयाच्या योगानें मनोजय साधून शीतोष्ण सुखदुःखादि द्वंद्वांवर विजय मिळवावा,' असा उपदेश ज्ञानेश्वरादि महात्म्यांनीं वारंवार केलेला आहे; पण व्यवहारज्ञ ह्मणून प्रौढी मारणारे पुष्कळ लोक हा उपदेश संसारी माणसांच्या कांहीं उपयोगाचा नाहीं, ज्यांना परमार्थ साधावयाचा असेल, संसार सोडून ज्यांना देवाचें ध्यान करीत गिरीकपाटीं बसावयाचें असेल, त्यांच्याच तो उपयोगाचा आहे, असें ह्मणतांना वारंवार आढळतात. साक्रेटीस उपरिनिर्दिष्ट संवादांत, हाच उपदेश ॲन्टीफानला करीत आहे, आणि त्या उपदेशाप्रमाणें स्वतः त्याची रहाणी असल्यामुळेंच त्याला या लढायांच्या प्रसंगीं, एकाद्या सेनाध्यक्षालाहि आश्चर्य वाटण्यासारख्या रीतीनें वागतां आलें. त्यानें आपली रहाणी साधी ठेवून आपल्या वासनांचा क्षय केला होता, मनाच्या अनिवार वृत्ति आपल्या ताब्यांत आणल्या होत्या, आणि ह्मणूनच लढाईवर अन्नाचा तुटवडा पडला असतां, त्याला कधीं भुकेचा उपद्रव झाला नाहीं. एक आंगरखा घालण्याची आणि अनवाणी चालण्याची नेहमींचीच सवय असल्यामुळें, बर्फाची वृष्टि होत असतांहि त्याला लोकरीचे कपडे आणि बूट घालण्याची कधीं इच्छा झाली नाहीं. 'मरण देहाला असतें, आत्मा अजरामर आहे'

असें आमच्या संतांप्रमाणेंच त्याचें तत्वज्ञान त्याला सांगत असल्यामुळें, रणमैदानांवर शत्रूच्या. अगदीं माऱ्याखालींहि भीतीनें त्याच्या काळजाला कधीं स्पर्श केला नाहीं. 'स्वतःच्या प्राणापेक्षां परोपकाराची किंमत जास्त आहे', असें आमच्या संतांप्रमाणेंच या ग्रीक तत्वज्ञान्याला वाटत असल्यामुळें, पाठलाग करीत येणाऱ्या शत्रूची पर्वा न बाळगतां त्यानें झेनोफनचे प्राण वांचविण्याचें धाडस केलें. संतांचा उपदेश एकदेशी आहे, व्यवहारी माणसाला त्याप्रमाणें वागतां यावयाचें नाहीं, आणि कोणी वागलाच तर त्याचा व्यवहारांत कांहीं उपयोगहि नाहीं, असें ह्मणणारे आमच्या समाजांत जे कोणी असतील, त्यांनीं साक्रेटिसाचा हा उपदेश, त्याचें त्या उपदेशाप्रमाणें वर्तन, आणि लढाईसारख्या व्यावहारिक गोष्टींत झालेला त्याचा उपयोग, या गोष्टींचा विचार करून आपल्या मताच्या सत्यासत्यतेचा निर्णय करावा, इतकीच आमची त्यांनां विनंति आहे.

आमच्या तुकाराममहाराजांच्या आणि साक्रेटिसाच्या विचारांत जितकें साम्य होतें, त्यापेक्षांहि त्यांच्या गृहस्थितींत अधिक साम्य होतें. सोफ्रोनिस्कसला मूर्तिकाराच्या धंद्यांत जरी विशेष प्राप्ति होत नव्हती, तरी त्यानें मरतेसमयीं दोन हजार रुपयांची माया आपला मुलगा साक्रेटीस याला आपल्यामागें राखून ठेविली होती; परंतु मुलगा या मायेंत सांपडण्यासारखा नव्हता. त्यानें ती रक्कम आपल्या एका गरजू मित्राला दिली, आणि

ज्या कामाकरितां त्यानें ती घेतली होती तें काम फसलें असें पाहून साक्रेटिसानें ती रक्कम त्याजपाशीं परत मागितली नाहीं. तुकारामबोवांनीं आपले कर्जरोखे असेच इंद्रायणीला अर्पण केल्याची आख्यायिका आहे. साक्रेटिसाच्या घरांतील सर्व चीजवस्त मिळून १२० रुपयांवर नव्हती. तुकारामाच्या घरांतील गाडगींमडकीं आणि फाटक्या गोधड्या इतक्या किंमतीच्या तरी होत्या किंवा नाहीं, याची शंकाच आहे. शिवाजीमहाराज आणि तुकाराम यांच्यासंबंधानें जी एक दंतकथा आहे, तशीच एक अगदीं हुबेहुब गोष्ट साक्रेटिसाविषयीं घडल्याची हकीकत त्याच्या चरित्रकारांनीं लिहून ठेविली आहे. साक्रेटिसासारखें नररत्न आपल्या संग्रहीं असावें असें वाटून, मासिडोनिया प्रांताचा राजा आर्चिलेअस यानें बऱ्याच मोठ्या नजराण्यानिशीं आपला वकील त्याला आणण्याकरितां त्याजकडे पाठविला; पण नजराण्याला न शिवतां साक्रेटिसानें त्याची ताबेदारी पतकरण्याचें नाकारिलें. लोकांपासून पैसे घेऊन किंवा पैशाकरितां लोकांची ताबेदारी पतकरून आपल्या तत्त्वज्ञानाचा विक्रा करावा, अशी कल्पना साक्रेटिसाच्या मनाला कधींहि शिवली नाहीं. "आशाबद्ध वक्ता लोकांनां ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगत असतां, हा आपल्याजवळ केव्हां कसली याचना करील, याच विचारानें श्रोत्यांचीं मनें भांबावून गेलेलीं असतात. तो काय सांगतो, इकडे त्यांचें मुळीं लक्षच नसतें. लोभाचें मांजर होऊन घरोघर भीक मागणारा तो वक्ताहि तोंडानें

ब्रह्मज्ञान बडबडत असतो इतकेंच; पण त्याचें सर्व लक्ष्य आपल्याला कोणाकडून काय मिळतें यांत गुतलेलें असतें. सारांश, आशाबद्ध वक्त्याचा उपदेश, आणि तो ऐकणारे श्रोते, ह्मणजे बहिऱ्यामुक्यांचाच कारभार," असें सांगून तुकाराम-बोवा ह्मणतात

"माप आणि गोणी, तुका ह्मणे रितीं दोन्ही"

पैसे घेऊन तत्त्वज्ञान शिकविणाऱ्या झोफिस्टांविषयीं साक्रेटीस नेहमीं असेंच बोलत असे, ही गोष्ट या पुस्तकांतील कांहीं संवाद वाचून वाचकांच्या सहज लक्ष्यांत येईल. घरीं अठरा विश्वे दारिद्र्य, आणि मनांत येतांच दारिद्र्याला घराबाहेर काढून लक्ष्मीला दासीप्रमाणें आपल्या घरीं राबावयाला लावण्याचें अंगांत सामर्थ्य असतां, तुकारामाप्रमाणेंच साक्रेटिसानेंहि अनेकवार पायांशीं चालत आलेल्या संपत्तीला झिडकारून दारिद्र्यामध्यें आनंदानें दिवस काढले.

तुकारामाच्या पत्नीप्रमाणेंच साक्रेटिसाची पत्नी झॅन्थीपी हिची कर्कशा ह्मणून प्रसिद्धि आहे. पुरुष सुशिक्षित आणि स्त्रिया अशिक्षित अशी स्थिति ज्या समाजांत आहे, त्या समाजांतील स्त्रिया गृहकार्यांत दक्ष असतात, मुलाबाळांचें संगोपन कसें करावें याची माहिती परंपरेनें त्यांनां झालेली असते, त्यांची दृष्टि बरीच संकुचित राहिल्यामुळें आपल्या संसारापलीकडे त्यांनां कांहीं दिसत नाहीं, यामुळें त्या मोठ्या संसारदक्ष आहेत असें आपणाला वाटतें; पण सुशिक्षित नवऱ्याच्या आचरणांतील रहस्य पुष्कळ वेळां त्यांनां

न समजल्यामुळें नवऱ्याशीं त्यांचे पटत नाहीं, आणि ह्मणूनच नवऱ्याच्या मैत्रीला त्या अंतरतात. स्त्रीशिक्षणाचा अभाव हें आजहि आमचा संसार निःसार होण्याचें कारण आहे. साक्रेटिसाच्या वेळीं ग्रीस देशाची स्थिति अशीच होती. अर्थात्, तुकारामाच्या पत्नीप्रमाणेंच साक्रेटिसाच्या पत्नीला त्याच्या आचरणांतील रहस्य जाणण्याचें ज्ञान नव्हतें. आपला नवरा संसारांत लक्ष्य घालीत नाहीं, सोन्यासारख्या मुलांबाळांचे कोडकौतुक पुरवीत नाहीं, चार पैसे कमवून आणून उत्तम घरदार, चांगलें भांडेकुंडें, उंची वस्त्रप्रावरणें यांची जोड करीत नाहीं; इतकेंच नव्हे, तर घरीं चालत आलेल्या लक्ष्मीला घराबाहेर खेंचून काढितो, हें पाहून त्या दोघींनांहि, त्या महापतिव्रता असतांहि, आपापल्या पतिराजांचा फार संताप येत असे, आणि त्यांजविषयींचें अंतःकरणांतील प्रेम घटकाभर बाजूला सारून त्या त्यांनां तोंडाला येतील त्या शिव्या देऊन त्यांची निर्भर्त्सना करण्यास मागेंपुढें पहात नसत. त्यांतून हे दोघेहि आपल्या मित्रमंडळींनां घरीं जेवावयाला बोलवीत. घरांत कांहीं नसावें, आणि अशा वेळीं चार पैसे न मिळविणाऱ्या नवऱ्यानें आपल्याबरोबर आपले चार स्नेही जेवावयाला आणावे, मग त्या बायकोला राग कां बरें येऊं नये? अशा वेळीं साक्रेटीस आपली पत्नी सँन्थीपी हिला ह्मणे "आपल्या घरीं चार मंडळी जेवायला आली, तर त्यांत आनंद मानावा; उगाच रागानें जळफळण्यांत काय अर्थ आहे? आपले पाहुणे जर विचारी असले,

तर आपण जें वाटूं त्यांत ते समाधान मानतील; आणि ते जर अवीचारी असले तर ते कांहीं जरी ह्मणाले तरी त्याबद्दल पर्वा करण्याचें आपल्याला कांहीं कारण नाहीं."

एकंदरींत पहातां तुकाराम आणि साक्रेटीस यांच्या विचारांत, आचरणांत आणि चरित्रांत बरेंच साम्य दिसतें. त्यांच्या स्त्रियांच्या कर्कशपणाबद्दल त्यांच्या चरित्रकारांनीं पुष्कळ लांबलचक वर्णनें लिहिलीं आहेत;पण त्यांच्या शिक्षणाचा विचार केला ह्मणजे त्या साध्वी स्त्रियांनां कांहीं दोष देतां येईल असें वाटत नाहीं. ते दोघेहि आपापल्या गृहस्थितींत समाधान मानून रहात असत. इतकेंच नाहीं, तर या पुस्तकाच्या ५९ व्या पृष्ठावरील 'मातापितरांचा सन्मान' हा संवाद, आणि तुकारामानें आपल्या पत्नीला केलेला उपदेश, वाचला असतां त्या दोघांनांहि आपल्या स्त्रियांविषयीं राग किंवा तिटकारा वाटत नसून कींवच येत होती, असें ह्मणावें लागतें.

ज्याप्रमाणें शिवाजीमहाराजांनां भवानी प्रसन्न असून ती वेळोवेळीं त्यांनां 'अमुक करा, अमुक करूं नका,' असें सांगत असे अशी समजूत आहे, त्याप्रमाणेंच साक्रेटिसाला एक 'डीमन' सांगत असे, अशी समजूत आहे. 'तुझ्या ज्ञानाचा उपदेश तूं लोकांनां कर,' अशी या डीमनचीच आज्ञा त्याला होती, असें ह्मणतात. प्लेटो आणि झेनोफन यांनीं साक्रेटिसाच्या तोंडीं या डीमनसंबंधानें घातलेल्या उद्गारांवरून असें दिसतें, कीं, त्याला तें कधीं प्रत्यक्ष दिसलें नव्हतें. विशेषतः अमुक गोष्ट करूं नको अशी निषेधार्थी

आज्ञा ते आपणाला करीत आहेत, असा त्याला भास होई; इतकेंच नव्हे, तर तसे शब्द त्याच्या कानीं पडत. साक्रेटिसाच्या डीमननें त्याला लोकशिक्षणाचें काम करावयाला सांगितलें असो, किंवा त्यानें आपल्या मनाशीं पूर्ण विचार करून ती कामगिरी आपणावर घेतली असो, पण इतकी गोष्ट खरी, कीं, साक्रेटीस सरासरी आपल्या वयाच्या चाळिसाव्या वर्षी या कामाला लागला.

वृद्धांचीं अंतःकरणें पारा उडालेल्या आरशाप्रमाणें असतात. या आरशांत जसें त्याच्यामागें बसविलेल्या फळीवांचून दुसरें कांहीं दिसत नाहीं, तसें वृद्धांच्या अंतःकरणांत त्यांच्या दृढमूल झालेल्या विचारांवांचून कांहीं दिसत नाहीं. तरुणांचें तसें नसतें. त्यांच्या अंतःकरणरूपी नव्या आणि स्वच्छ आरशापुढें जे जे विचार मांडावेत, त्यांचें त्यांचें प्रतिबिंब त्यांत सहज रीतीनें पडूं शकतें. वठलेल्या झाडाला पाणी घालणें ह्मणजे फलपुष्पाच्या लाभावांचून पाणी घालणाराचे श्रम मातीमोल करणेंच आहे. राष्ट्राचा अभ्युदय इच्छिणारानें जुन्या लोकांशीं माथेकूट करीत न बसतां नवीन पिढीचीं मनें सुसंस्कृत करणें इष्ट आहे, असा विचार करून साक्रेटिसानें आपल्या ज्ञानाचा प्रसार भावी पिढींत करण्याचा उपक्रम केला.

ज्ञानदान करण्याकरितां साक्रेटिसानें कांहीं कोठें शाळा काढली नव्हती, किंवा श्रोत्यांकरितां बांकें आणि खुर्च्या मांडून आपणाकरितां त्यानें कोठें एकादें व्याख्यानपीठहि तयार करून ठेविलेलें नव्हतें. त्याच्या उपदेशाची वेळ ठरलेली

नव्हती, किंवा अमुक वेळेला अमुक विषय शिकवावयाचा असें त्यानें कांहीं वेळापत्रकहि तयार केलेलें नव्हतें. उपदेशाबद्दल तो कोणा विद्यार्थ्याजवळ कांहीं वेतन मागत नसे, किंवा कोणापासून कांहीं बक्षीस उपटण्याचाहि विचार त्याच्या मनाला कधीं शिवला नव्हता. तरुण पिढीनें ज्ञान संपादन करावें, आणि आपल्या जन्मभूमीचा नांवलौकिक कायम राखावा, हीच काय ती त्याची एक इच्छा होती. "अहो येतां जातां उठत बसतां कार्य करितां" इत्यादि श्लोकांत वामन पंडितानें, भगवन्नाम केव्हां घ्यावें, याला जसा कांहींच निर्बंध ठेविला नाहीं, तसा साक्रेटिसाच्या उपदेशाला देखील कशाचाहि निर्बंध नव्हता. उठतांबसतां, जेवतांखातां, हंसतांखेळतां साक्रेटिसाला तुह्मीं केव्हांहि पहा, असतील तितक्या श्रोत्यांनां तो उपदेश करीत असलेलाच तुह्मांला दिसेल. परमेश्वर जसा सगळें जग व्यापून राहिलेला आहे, तसें सगळें अथेन्स शहर त्याची शाळा बनून राहिलेलें होतें. बाजाराच्या जागा, तालमींचे आखाडे, मुलांच्या शाळेजवळचीं मैदानें या सर्व साक्रेटिसाच्या शाळाच होत्या. फार काय, पण मरणाची शिक्षा होऊन तुरुंगांत पडल्यावर तेथली कोठडी देखील त्यानें आपली शाळा बनविली होती. खरोखर, केवढी ही शिक्षणाची हौस आणि काय हें स्वदेशावरील निस्सीम प्रेम !

तरुणांनां उपदेश करणें हा साक्रेटिसाचा जरी मूळ उद्देश होता, तरी साक्रेटिसाच्या या शाळेंत शिष्याच्या वयाची मर्यादा मुळींच नव्हती; आणि शिक्षणाबद्दल पैसा घ्यावयाचा

नसल्यामुळें, श्रीमंतांच्या मुलांनां लक्ष्यपूर्वक शिकवावयाचें, आणि गरीबांकडे दुर्लक्ष्य करावयाचें, असा भेदाभेदहि नव्हता. लोहार, सुतार, सोनार, महार, चांभार कोणताहि धंदा करणारा लहानथोर, श्रीमंतगरीब कसाहि मनुष्य ज्ञान-लालसा धरून साक्रेटिसाकडे गेला आणि त्यानें त्या माण-साला चार गोष्टी शिकविल्या नाहींत, असें कधींहि झालें नाहीं.

कोणाहिजवळ संभाषण करितांना, साक्रेटिसाचा उद्देश त्याला शिकवावें इतकाच नसून, साधल्यास दोन गोष्टी आपणहि त्याजपासून शिकाव्या असा असल्यामुळें, त्याच्या विद्यार्थ्यांनीं भक्तिपुरस्सर त्याला 'गुरुजी' ह्मटलेलें देखील त्याला आवडत नसे. तो ह्मणे "रोज नवींनवीं माणसें माझ्याकडे येणार, तीं माझ्यापासून जसें कांहीं शिकणार, तसें मीहि त्यांच्यापासून कांहीं शिकणार. तेव्हां अशा स्थितींत मी त्यांचा गुरु कसला, आणि ते तरी माझे शिष्य कसले?" असें होतें, तरी देखील अथेन्समधील, किंबहुना अथेन्स-बाहेरील सुद्धां पुष्कळ तरुणांनां साक्रेटिसाचे शिष्य ह्मणवून घेण्यांत मोठें भूषण वाटत असे. साक्रेटिसाचे गहन विषया-वरील विचार संवादरूपानें लिहून ज्यानें सर्व जगाला आपलें ऋणी करून ठेविलें आहे, तो प्लेटो नामक विद्वान्, सरासरी दहा वर्षेंच त्याच्या सहवासांत होता. मरणसमयीं ईश्वराची प्रार्थना करून तो ह्मणाला "देवा, माझ्यावर तुझे अनंत उपकार आहेत. प्रथम तूं मला विचारी अशा मनुष्यजन्माला

घातलेंस हा माझ्यावर तुझा मोठाच उपकार आहे.हा मनुष्य-जन्म जर तूं मला एकाद्या अडाणी देशांत दिला असतास, तर तो मिळून न मिळून सारखेंच झालें असतें; पण तूं मला ग्रीससारख्या सर्व प्रकारांनीं सुधारलेल्या देशांत जन्म दिलास, हा माझ्यावर तुझा दुसरा मोठा उपकार होय. ग्रीस देशांत जन्मूनहि साक्रेटिसासारख्या सद्गुरूचा सहवास जर मला घडला नसता, तर हें सारेंच व्यर्थ झालें असतें; ह्मणून साक्रेटिसाच्या हयातींत तूं मला जन्माला घातलेंस हा तुझा माझ्यावर सर्वांत मोठा उपकार झाला, असें मी समजतों." यावरून साक्रेटिसाच्या ठिकाणीं त्याच्या शिष्यांची किती भक्ति होती, हें वाचकांच्या लक्ष्यांत येईल.

विचारमाधुर्य आणि संभाषणाची शैली या जादूच्या दोन कांड्यांनीं ग्रीस देशांतील तरुणांचीं मनें साक्रेटिसानें अगदीं भारून टाकिलीं होतीं. अथेन्सनजीक मैगारा ह्मणून एक संस्थान होतें साक्रेटिसाच्या वेळीं अथेन्स आणि मैगारा यांचें इतकें वैर होतें, कीं, मैगारांतील कोणीहि मनुष्य अथेन्समध्यें आल्यास त्याला देहांतशिक्षा द्यावी, असा अथेनियन लोकांनीं कायदा केलेला होता. अशा स्थितींत मैगारांतील युक्लिड नांवाच्या तरुणाला साक्रेटिसाचें उपदेशामृत प्राशन करण्याची इतकी उत्कंठा झाली, कीं, तो मरणाला न जुमानतां स्त्रीवेष घेऊन संध्याकाळच्या वेळीं अथेन्समध्यें गेला, आणि रात्रभर साक्रेटिसाच्या उपदेशामृताचें आकंठपान करून पहाटेला पुनः स्त्रीवेषानेंच आपल्या गांवीं परत आला. असें त्यानें अनेक

वेळां केलें. कित्येक तरुणांनां ज्या दिवशीं साक्रेटिसाचें भाषण ऐकिलें नाहीं, तो आयुष्यांतील दिवस अगदीं फुकट गेला असें वाटत असे. तें मधुर आणि ज्ञानप्रचुर भाषण ऐकण्याला अडथळा येतांच कित्येकांनां अन्नाचा घांस गोड लागत नव्हता. केवढी विलक्षण ही साक्रेटिसाच्या भाषणांतील जादू !

आपण मोठे रागीट आहों, करारी आहों, आणि आपलें मत अमान्य केल्यास मोठा अनर्थ होईल, असें भासवून शिष्यांनां आपलीं मतें गृहण करावयाला लावणाऱ्या गुरूंपैकीं साक्रेटीस नव्हता. अगदीं सहजपणें आणि शांतपणें अत्यंत मधुर भाषण करून बोलतांबोलतां तो आपणांशीं भाषण करणाराच्या मनांतील कुकल्पना नाहींशा करी, आणि आपल्या मतांचा खरेपणा त्याच्या अंतःकरणांत बिंबवी. या पुस्तकाच्या प्राक्कथनांत सांगितल्याप्रमाणें सर्वमान्य सिद्धांताविषयीं कांहीं प्रश्न करून प्रथम तो ते सिद्धांत श्रोत्याकडून कबूल करून घेई; नंतर साक्रेटिस आतां आपणाला काय सांगणार या विचारांत श्रोता आहे तोंच, पहिल्या सिद्धांताला धरून असणाऱ्या, दुसऱ्या कांहीं सत्य सिद्धांताविषयीं तो त्याची संमति मिळवी; आणि अशा रीतीनें त्यानें कबूल केलेल्या गोष्टींच्या मागें त्याला जातां येणार नाहीं अशी स्थिति आली, ह्मणजे तो आपलें इष्ट मत, त्या श्रोत्यानें केलेल्या सिद्धांता-पासून कसें निघतें हें सांगून त्याला त्याच्या कबुलीप्रमाणेंच तें मान्य करावयास लावी. या पुस्तकांत साक्रेटिसाचे ग्रथित केलेले विचार त्यानें या संवादपद्धतीनें तरुणांच्या अंतःकर-

घातलेंस हा माझ्यावर तुझा मोठाच उपकार आहे. हा मनुष्य-जन्म जर तूं मला एकाद्या अडाणी देशांत दिला असतास, तर तो मिळून न मिळून सारखेंच झालें असतें; पण तूं मला ग्रीससारख्या सर्व प्रकारांनीं सुधारलेल्या देशांत जन्म दिलास, हा माझ्यावर तुझा दुसरा मोठा उपकार होय. ग्रीस देशांत जन्मूनहि साक्रेटिसासारख्या सद्गुरूचा सहवास जर मला घडला नसता, तर हें सारेंच व्यर्थ झालें असतें; ह्मणून साक्रेटिसाच्या हयातींत तूं मला जन्माला घातलेंस हा तुझा माझ्यावर सर्वांत मोठा उपकार झाला, असें मी समजतों." यावरून साक्रेटिसाच्या ठिकाणीं त्याच्या शिष्यांची किती भक्ति होती, हें वाचकांच्या लक्ष्यांत येईल.

विचारमाधुर्य आणि संभाषणाची शैली या जादूच्या दोन कांड्यांनीं ग्रीस देशांतील तरुणांचीं मनें साक्रेटिसानें अगदीं भारून टाकिलीं होतीं. अथेन्सनजीक मैगारा ह्मणून एक संस्थान होतें साक्रेटिसाच्या वेळीं अथेन्स आणि मैगारा यांचें इतकें वैर होतें, कीं, मैगारांतील कोणीहि मनुष्य अथेन्समध्यें आल्यास त्याला देहांतशिक्षा द्यावी, असा अथेनियन लोकांनीं कायदा केलेला होता. अशा स्थितींत मैगारांतील युक्लिड नांवाच्या तरुणाला साक्रेटिसाचें उपदेशामृत प्राशन करण्याची इतकी उत्कंठा झाली, कीं, तो मरणाला न जुमानतां स्त्रीवेष घेऊन संध्याकाळच्या वेळीं अथेन्समध्यें गेला, आणि रात्रभर साक्रेटिसाच्या उपदेशामृताचें आकंठपान करून पहाटेला पुनः स्त्रीवेषानेंच आपल्या गांवीं परत आला. असें त्यानें अनेक

वेळां केलें. कित्येक तरुणांनां ज्या दिवशीं साक्रेटिसाचें भाषण ऐकिलें नाहीं, तो आयुष्यांतील दिवस अगदीं फुकट गेला असें वाटत असे. तें मधुर आणि ज्ञानप्रचुर भाषण ऐकण्याला अडथळा येतांच कित्येकांनां अन्नाचा घांस गोड लागत नव्हता. केवढी विलक्षण ही साक्रेटिसाच्या भाषणांतील जादू !

आपण मोठे रागीट आहों, करारी आहों, आणि आपलें मत अमान्य केल्यास मोठा अनर्थ होईल, असें भासवून शिष्यांनां आपलीं मतें गृहण करावयाला लावणाऱ्या गुरूंपैकीं साक्रेटीस नव्हता. अगदीं सहजपणें आणि शांतपणें अत्यंत मधुर भाषण करून बोलतांबोलतां तो आपणांशीं भाषण करणाराच्या मनांतील कुकल्पना नाहींशा करी, आणि आपल्या मतांचा खरेपणा त्याच्या अंतःकरणांत बिंबवी. या पुस्तकाच्या प्राक्कथनांत सांगितल्याप्रमाणें सर्वमान्य सिद्धांताविषयीं कांहीं प्रश्न करून प्रथम तो ते सिद्धांत श्रोत्याकडून कबूल करून घेई; नंतर साक्रेटिस आतां आपणाला काय सांगणार या विचारांत श्रोता आहे तोंच, पहिल्या सिद्धांताला धरून असणाऱ्या, दुसऱ्या कांहीं सत्य सिद्धांताविषयीं तो त्याची संमति मिळवी; आणि अशा रीतीनें त्यानें कबूल केलेल्या गोष्टींच्या मागें त्याला जातां येणार नाहीं अशी स्थिति आली, ह्मणजे तो आपलें इष्ट मत, त्या श्रोत्यानें केलेल्या सिद्धांता-पासून कसें निघतें हें सांगून त्याला त्याच्या कबुलीप्रमाणेंच तें मान्य करावयास लावी. या पुस्तकांत साक्रेटिसाचे ग्रथित केलेले विचार त्यानें या संवादपद्धतीनें तरुणांच्या अंतःकर-

णांत कसे ठसविले, हें वाचकांनां सदर पुस्तक वाचतांवाचतां सहज कळून येणार आहे. आपलें मत प्रस्थापित करण्याकरितां ग्रीस देशांतील तत्कालीन नामांकित वक्त्यांप्रमाणें, तो कधीं मोठें जोरदार भाषण करीत नसे, किंवा त्याला आधार ह्मणून कांहीं मुद्देसूद प्रमाणेंहि तो आपल्या श्रोत्यांपुढें मांडण्याच्या भानगडींत पडत नसे.

आपल्या ज्ञानाचा गर्व वहाणारे सोफिस्ट, किंवा वक्तृत्व हाच सर्व ज्ञानाचा गड्डा असें मानणारे कोणी घमेंडखोर वक्ते साक्रेटिसाला भेटले ह्मणजे "मी अगदीं अडाणी आहें, मला ज्ञानभिक्षा घाला" असें ह्मणून नम्रपणानें साक्रेटीस एकादा सत्यसिद्धांत त्याजकडून कबूल करवून घेई. बऱ्याच मोठ्या भक्तगणासमक्ष त्यांनां एकादां प्रश्न विचारी, व त्या प्रश्नाचें उत्तर देऊन हे घमेंडानंदन त्याला शिकवूं लागले यांच्याजवळ जाई, आणि त्यांच्या भोंवती गोळा झालेल्या आणि पुनः त्याच्या उपसिद्धांताबद्दल त्यांनां प्रश्न करी. हा उपसिद्धांत कबूल करितांच ते साक्रेटिसाच्या बुद्धिचातुर्यानें तयार केलेल्या जाळ्यांत सांपडले जात, आणि अशा रीतीनें सर्वांसमक्ष शेवटीं त्यांनां आपलें अज्ञान कबूल करावें लागून साक्रेटिसाचें मत तितक्या वेळेपुरतें तरी मान्य करावें लागे. अशा प्रकारचेहि कांहीं संवाद या पुस्तकांत पुढें दिले आहेत. साक्रेटिसाला पुढें जे कांहीं शत्रु झाले, त्यांत अशा रीतीनें फजित झालेले घमेंडानंदन पुष्कळ होते.

या वेळच्या ग्रीक लोकांत पुष्कळ वेडगळ धर्मसमजुती होत्या. त्या सर्वांवरच जरी साक्रेटिसाचा विश्वास नव्हता,

तरी त्यांपैकीं बऱ्याच समजुती त्याला मान्य होत्या असें दिसतें. त्यांच्या देवस्थानांत देलफाय येथील अपालोचें देवस्थान अत्यंत पवित्र होतें. हा देव तेथील पुजारणीच्या अंगांत येऊन यात्रेकरूंच्या प्रश्नांचीं उत्तरें देतो आणि अर्थात्च तीं देवाचीं उत्तरें खरीं असतात, अशी एक त्यांची समजूत होती. एकदां चिरोफन नांवाचा साक्रेटिसाचा एक विद्यार्थी तेथें गेला आणि त्यानें त्या पुजारणीच्या अंगांत अपालो देवाचा संचार झाला असतां " साक्रेटिसाइतका शहाणा मनुष्य दुसरा कोणी आहे काय ?" असा प्रश्न तिला विचारला, व या प्रश्नाचें उत्तर तिनें " कोणी नाहीं " असें दिलें असतां त्याला परमावधीचा आनंद झाला. अथेन्सला गेल्यावर जेव्हां त्यानें ही बातमी साक्रेटिसाला सांगितली, तेव्हां, देवाचा शब्द खरा मानावा तर आपण तसे शहाणे नाहीं अशी त्याची प्रामाणिक समजूत होती; बरें, तो खोटा मानावा तर तिकडूनहि पंचाईत ! अशी त्याची मनाची मोठी चमत्कारिक स्थिति झाली, आणि तो या उत्तरांतील अभिप्राय काय असावा, याचा शोध करूं लागला.

प्रथम, तो मोठे शहाणे ह्मणून ज्यांची कीर्ति होती आणि ज्यांनां तो स्वत: फार शहाणे समजत असे, अशा कांहीं मुत्सद्द्यांकडे गेला; परंतु त्यांच्याशीं संभाषण करितांना त्याला असें आढळून आलें,कीं,ते शहाणे नाहींत. त्यानें त्यांचा मूर्खपणा त्यांच्या पदरांत घातला. नंतर तो तेथील कांहीं सुप्रसिद्ध कवींकडे गेला, आणि त्यांच्या कवितांचा अर्थ त्यांजपासून

समजावून घेऊं लागला. हे कवि आपापल्या कवितांची स्तुति करीत आणि दुसऱ्या कवींची निंदा करीत; पण विचारलेल्या त्यांच्याच कवितांचा अर्थ कांहीं त्यांनां समजावून सांगतां येईना. यावरून त्यानें असें ठरविलें, कीं, देवाचें वारें अंगांत आलेला मनुष्य, ज्ञानाच्या पुष्कळ गोष्टी सांगतो, पण त्याचा गंधहि त्याच्या अंगीं नसतो;इतकेंच नव्हे, तर या वेळीं, तो जे शब्द बोलतो त्यांचा पुरा अर्थहि त्याला समजत नसतो, तसें या कवींचें आहे. यांच्या कवितांत दिसून येणारें ज्ञान यांनीं शहाणपणानें संपादन केलेलें नसतें. तें केवळ ईश्वरी स्फूर्तीनें त्यांच्या लेखणींतून बाहेर पडतें. शेवटीं साक्रेटीस कांहीं कारागीरलोकांकडे गेला. तेथें त्याला पुष्कळ नव्या गोष्टींची माहिती मिळाली; पण ज्या दुसऱ्या कलांच्या ज्ञानाचा गंधहि त्यांनां नव्हता, त्या कलासंबंधानें ते लांब जीभ करून भळभळतें बोलतात असें पाहून तेहि मूर्खच आहेत, असें त्यानें ठरविलें. या सत्यसंशोधनामुळें, सोफिस्ट आणि घमेंडखोर वक्ते या त्याच्या पूर्वींच्या शत्रूंत आणखी पुष्कळ लोकांची भर पडली. ज्या शहाण्या मानलेल्या लोकांकडे साक्रेटीस गेला ते लोक अंगीं असलेल्या शहाणपणापेक्षां आपणांला अधिक शहाणे समजत होते; आणि तो स्वतः आंगीं शहाणपण असतांहि आपणाला कांहीं समजत नाहीं असें मानीत होता; आणि ह्मणूनच तो सर्वांपेक्षां शहाणा होता. साक्रेटिसानें डेलफायच्या पुजारणीचें भविष्य याच अर्थानें खरें आहे, अशी आपली समजूत करून घेतली.

साक्रेटिसाच्या शिष्यसमुदायाबरोबरच, निस्पृहपणामुळें त्याचा शत्रुसमुदायहि वाढत चालला होता. सर्व अथेन्स शहरासमोर साक्रेटिसाची फटफजिती करण्याच्या हेतूनें, नसते दोष त्याच्यावर लादून त्याच्या द्वेष्ट्यांनीं ॲरिस्टोफेनिस नामक एका नाटककाराकडून क्लाउडस (मेघमंडल) नांवाचें एक प्रहसन लिहविलें. साक्रेटिस हा या नाटकांतील एक नायक होता, आणि तो अथेन्सच्या तरुणांनां बिघडवून टाकणारा एक दुर्गुणाचा पुतळा आहे, असें त्या प्रहसनकर्त्यानें या नाटकांत त्याचें चित्र रेखाटलें होतें. या नाटकाचा प्रयोग झाला त्या वेळीं सर्व नाटकगृह प्रेक्षकांनीं अगदीं गजबजून गेलें होतें. विचारशक्तिहीन अडाणी बहुजनसमाजाला नेहमीं अशीच कांहीं तरी करमणूक लागते ! त्यांच्याप्रमाणें बोलणारा, त्यांच्यासारखा वागणारा, त्यांच्या कृत्यांनां उत्तेजन देणारा, त्यांच्या समजुतींची तरफदारी करणारा, सारांश, प्रत्येक बऱ्याबाईट गोष्टींत त्यांचा पक्ष जो उचलील तो त्यांचा पुढारी, त्यांचा अगदीं देवाधिदेव, असें त्यांनां वाटतें, आणि याच्या उलट, मनापासून या समाजाचें हित व्हावें म्हणून केव्हां त्यांनां बाबापुता करून तर केव्हां त्यांच्या डोळ्यांत चांगलें चरचरीत अंजन घालून सामाजिक, राजकीय वगैरे बाबतींत त्यांच्या हातून घडणाऱ्या चुका दाखवून त्यांनां ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या माणसाला ते आपला शत्रु समजतात. अशा वेळीं बहुजनसमाजाच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांच्या

देवत्वाला पात्र झालेले लोक, आपली प्रभावळ कायम राखण्याकरितां, ॲरिस्टोफिनिससारख्या नाटककाराकडून त्या समाजहितचिंतकांचीं नाटकें करवितात आणि अज्ञ समाजानें त्यांची हेटाळणी करून आपले गोडवे गावे म्हणून पैशाला लाचावलेल्या एकाद्या नाटक मंडळीस हाताशीं धरून त्या नाटकांचे प्रयोग रंगभूमीवर आणण्यांत मोठी धन्यता मानतात. हें साधलें नाहीं, तर चार गांवगुंड हाताशीं धरून कोठें त्यांच्या नांवाचें प्रेत करून त्याची मिरवणूक काढतात, तर कोठें गल्लीकुचींतील चार उनाड पोरें बगलेंत मारून, त्यांजकडून त्यांनां संगीत शिव्या देववतात. सारांश कालदेशवर्तमानाप्रमाणें साधनांत फरक पडो, पण आपलें स्वयंभू वर्चस्व कायम राखण्याकरितां, खऱ्या समाजहितकर्त्याला, अडाणी समाजाच्या डोळ्यांत धूळ फेंकून, त्याच्या योग्य स्थानापासून खालीं खेंचणें हें त्यांचें ध्येय मात्र सर्व देशांत आणि सर्व काळीं एकच असतें, यांत शंका नाहीं. ॲरिस्टोफिनिसचें 'मेघमंडळ' नाटक हा अशाच लोकांचा, दिवसांनुदिवस लोकादराला पात्र होणाऱ्या, खऱ्या समाजहितचिंतक साक्रेटिसाला खालीं ओढण्याचा एक प्रयत्न होता.

युरिपैडिसचें एकादें शोकपर्यवसायी नाटक असलें तर तें पहाण्याला मात्र साक्रेटिस कधींकधीं जात असे; पण आपलेंच सोंग आज रंगभूमीवर येणार, असें ऐकून साक्रेटीस हा प्रयोग पहाण्याकरितां कांहीं मित्रांबरोबर मुद्दाम नाटकगृहांत गेला, आणि अनोळखी लोकांनीं 'ज्याचें सोंग

आलें आहे, तो साक्रेटीस कोणता ?' असे वारंवार केलेले प्रश्न ऐकून त्यांची जिज्ञासा तृप्त करण्याकरितां, खेळ संपेपर्यंत, चांगल्या ठळक ठिकाणीं उभा राहिला. खेळ संपल्यानंतर कांहीं लोकांनीं त्याला "तुह्माला तुमचें हें हिडिस चित्र पाहून राग नाहीं का आला ?" असें विचारलें, तेव्हां तो ह्मणाला "मला राग आला नाहीं; इतकेंच नव्हे, तर आज येथें जमलेल्या माझ्या हजारों देशबांधवांना, मी करमणुकीची ही एक मोठी मेजवानीच दिली, याबद्दल मला फारच समाधान वाटलें." साक्रेटिसाचें हें उत्तर ऐकून त्या परोत्कर्षासहिष्णु लोकांची, इतकी खटपट करून शेवटीं सूर्यावर थुंकणारांप्रमाणें फजिती झाली, यांत आश्चर्य काय ?

साक्रेटिसानें आपलें सर्व आयुष्य लोकशिक्षणाला वाहिलें असल्यामुळें, आपल्या संस्थानांतील एकादी हुद्दयाची जागा त्यानें पत्करिली नाहीं, किंवा उदरनिर्वाहाचा दुसराहि एकादा धंदा केला नाहीं. त्याच्या कुटुंबाचें योगक्षेम, ज्यानें लहानपणीं त्याच्या शिक्षणाला मदत केली तो क्रीटोच चालवीत होता, असें कांहीं ग्रंथकार ह्मणतात, आणि तेंच खरें दिसतें. अथेन्सच्या कायद्याप्रमाणें, दोन वेळां त्याला न्यायसभेंत बसावें लागलें. या दोनहि प्रसंगीं तुकारामाप्रमाणेंच साक्रेटिसानें "सत्याअसत्यासी मन केलें ग्वाही, मानियेलें नाहीं बहुमता" सदसद्विवेकबुद्धीला वाटला तो निकाल संस्थानच्या कायद्याला अनुसरून सांगितला. अर्जिनसी आरमारी युद्धांत मरण पावलेल्या शिपाई लोकांस मूठमाती देण्याच्या

कामीं हयगय केल्याबद्दल आरमारावरील वरिष्ठ अधिकाऱ्यांस देहांतशासन करावें असा अथेन्समधील प्रमुख सरदारांचा आग्रह असतां, व बहुमताचा कल या सरदारांच्या बाजूला असतां, साक्रेटिसानें कायद्याप्रमाणें सर्व आरोपींबद्दल एकदम एकमतानें निकाल करितां येत नाहीं, असें सांगितलें. यामुळेंहि त्याच्या वाढत्या शत्रुसमुदायांत अधिक भर पडली.

पेलापोतिशियन युद्धाच्या शेवटीं, स्पार्टाच्या लिसँडर नामक सरदारानें, अथेन्सला वेढा घालून तें घेतलें; आणि तेथें आपल्या तर्फेचे तीस जुलमी अम्मलदार नेमून त्यांजकडून तेथील सर्व राज्यकारभार चालविला. यानंतर सुमारें चार वर्षांनीं थ्रॅसिब्युलस या पराक्रमी पुरुषानें ॲनिटस वगैरे सारख्या कांहीं लोकसत्तात्मक राज्यपद्धतीच्या अभिमान्यांच्या मदतीनें या जुलमी अम्मलदारांनां हांकून लावून अथेन्समध्यें पुन: प्रजासत्ताक राज्यपद्धति सुरू केली. साक्रेटिस, विशिष्ट शासनपद्धतीचा अभिमानी नव्हता. तो ह्मणे, कीं, शास्तेपणाचा अधिकार तीस लोकांच्या स्वाधीन असो किंवा अथेन्सच्या मामूल शिरस्त्याप्रमाणें तो पांचशें लोकांच्या स्वाधीन असो, प्रश्न संख्येचा नाहीं, ज्ञानाचा आहे. राज्यव्यवस्था शहाण्या लोकांच्या हातांत असली पाहिजे. अडाणी लोकांच्या मताधिक्याच्या बळावरच, राज्यांतील जबाबदारीच्या अधिकारांची खैरात करणें परिणामीं घातकच झालें पाहिजे. साक्रेटिसाचें हें शिक्षण, लोकसत्ताक पद्धतीच्या, ॲनिटसादि अभिमान्यांनां रुचलें नाहीं, आणि त्यांचीहि भर साक्रेटिसाच्या शत्रुवर्गांत झाली.

साक्रेटीस सत्तर वर्षांचा वृद्ध झाला होता. अशा वेळीं त्याच्या शत्रूंपैकीं, उपरिनिर्दिष्ट ॲनिटस, मिलिटस नांवाचा एक कवि, आणि लायकोन नामक एक अप्रसिद्ध वक्ता या तिघांनीं अथेन्सच्या न्यायसभेपुढें त्याजवर एक फिर्याद आणिली. या फिर्यादींत, साक्रेटिसावर तीन आरोप केलेले होते. पहिला आरोप असा होता, कीं, तो संस्थानच्या देवतांवर भरंवसा ठेवीत नाहीं; नवेनवे देव मानावे असें लोकांनां सांगतो, हा त्याच्यावर दुसरा आरोप होता; आणि तो अथेन्सच्या तरुणांनां बिघडवितो, हा तिसरा आरोप होता; आणि या सर्व अपराधांबद्दल आरोपीला मरणाची शिक्षा मिळावी असें फिर्यादींनीं शेवटीं मागणें मागितलें होतें.

अथेन्सच्या न्यायसभेंत पांचशें सभासद असत. या सभेपुढें आरंभीं फिर्यादीतर्फे मिलिटसनें फिर्यादींत केलेले आरोप मोठ्या आर्जवयुक्त भाषेनें आणि मधुर वाणीनें तिखटमीठ लावून वर्णन करून सांगितलें. साक्रेटिसाच्या मित्रांनीं, एका उत्तम वकीलाकडून या फिर्यादीवर देण्याचा जबाब तयार करवून तो साक्रेटिसाला दाखविला; पण त्यानें त्याच्या भाषेची आणि त्यांतील मुद्द्यांची तारीफ करून तो आभारपूर्वक परत केला. तो ह्मणाला " माझ्या हातून आजपर्यंत घडलेलें सद्वर्तन आणि माझें निष्कलंक चारित्र्य हाच त्या फिर्यादीवरील माझा जबाब आहे. मी निराळा जबाब देऊन यापुढें जगावें असा ईश्वरी संकेत दिसत नाहीं. माझ्या जगण्यांत आतां माझा किंवा माझ्या देशाचा कांहींच फायदा

नाहीं. वृद्धपणामुळें मंदावत चाललेली माझी दृष्टि जर अजिबात गेली, मला जर कानांनीं ऐकूं येईनासें झालें, तर अशा पराधीन स्थितींत मी जगून काय करणार ? आज मला अन्यायानें शिक्षा होणार आणि माझा न्याय करणारांनां कायमचा कलंक लागणार. असें झालें ह्मणजे लोक मजबद्दल जास्त सहानुभूति दाखवितील आणि त्यांची प्रगति करणारा त्यांचा शिक्षक ह्मणून ते माझी स्तुतीच करतील. ”

चौकशीच्या दिवशीं फिर्यादीचा पुरावा वगैरे संपल्यावर न्यायाधिशांच्या आज्ञेवरून साक्रेटीस बोलावयाला उभा राहिला. या वेळचें त्याचें भाषण प्लेटोनें अक्षरशः लिहून घेतलें. तें ‘ ॲपालजी ऑफ साक्रेटीस ’ या नांवानें प्रसिद्ध असून जगांतील उत्तम ग्रंथांत आज त्याची गणना झालेली आहे. स्थलसंकोचास्तव त्याचा नुसता गोषवाराहि येथें देतां येत नाहीं, याबद्दल वाचकांनीं क्षमा करावी. हें भाषण संपल्यावर पांचशें पैकीं २८१ सभासदांनीं, साक्रेटिसाला दोषी ठरवून मरणाची शिक्षा सांगितली. ग्रीस देशच्या या वेळच्या कायद्याप्रमाणें, सांगितलेल्या शिक्षेच्या मोबदल्यांत दुसरी शिक्षा मागण्याचा अधिकार आरोपीला ठेवलेला होता; अर्थात् न्यायाधिशानीं तसा प्रश्न साक्रेटिसाला केला; तेव्हां तो जें बोलला त्याचा सारांश अगदीं थोडक्यांत खालीं दिला आहे.

“ माझ्या देश बांधवांनो ! मला जी आज शिक्षा होत आहे ती केवळ माझ्या स्पष्टोक्तीमुळें होत आहे. जें मला खरें

वाटलें तें मी बोललों, लहानमोठी कसलीहि गोष्ट मीं तुमच्यापासून छपवून मनांतल्या मनांत दाबून ठेविली नाहीं, ह्मणून मला शत्रु उत्पन्न झाले आणि आजचा हा प्रसंग माझ्यावर आला. यावर आपण मला असें विचाराल, कीं, तुझ्या स्पष्टोक्तीचा परिणाम तुला पूर्वींच कळला असला पाहिजे. तसा जर तो तुला कळला होता, तर तूं आपलें तें धोरण बदललेंस कां नाहीं ? आपला हा प्रश्न बरोबर आहे. पण महाराज, मनुष्यानें कोणतीहि गोष्ट करतांना, फक्त त्या गोष्टीच्या बरेवाईटपणाबद्दल विचार करावा ! ती केल्यानें आपल्याला सुख होईल कीं दुःख होईल, आपण जगूं कीं मरूं हा स्वार्थाचा विचार क्षणभरहि मनांत आणूं नये. जें काम आपण होऊन आपल्या अंगावर घेतलें असेल, किंवा जें आपल्या खुषीनें आपणांवर सोंपविण्यांत आलें असेल, तें करीत असतां आपण आपल्या बेअब्रूवांचून कशाला सुद्धां—मृत्यूलाहि भिण्याचें कांहीं कारण आहे, असें मला वाटत नाहीं. तुह्मांला शिक्षण देण्याचें, तुमच्या मुलांबाळांनां ज्ञानामृत पाजण्याचें पवित्र काम ईश्वरानें माझ्यावर सोंपविलें होतें— तुमची इच्छा असेल तर मी स्वतःच तें अंगावर घेतलें होतें, असें ह्मणा—तें मीं गेलीं तीस वर्षें सत्यावांचून कोणाचीहि भीडमुर्वत न ठेवतां यथामति आणि यथाशक्ति केलें. असलें हें पवित्र कर्तव्य मी मृत्यूसारख्या यःकश्चित् गोष्टीला भिऊन सोडीन, असें तुह्मांला वाटतें ? असें कधींहि होणार नाहीं ! मृत्यु जो आह्मां सर्वांनां मोठा दुःखदायक वाटतो, तो सुख-

परिणामी नसेल, असें कोणाला तरी खात्रीनें सांगतां येईल का ? दुःखदायक मृत्यूला कांहीं माणसें भितील, हें खरें आहे; पण मृत्यु जर सुखदायकहि असण्याचा संभव आहे, तर त्याला आह्मीं कां ह्मणून भ्यावें ? मी शिक्षणाचें काम सोडतों असें कबूल केल्यास, आपण मला कदाचित् जिवंत ठेवण्याचें कबूल कराल; पण मी आपल्याला खात्रीनें सांगतों, कीं, आपण मला आज सोडलेत, कीं, उद्यां पुनः मी आपल्या उद्योगाला लागलोंच. असो. मरणावांचून दुसरी कोणती शिक्षा मला पसंत आहे, असें आपण मला विचारलें, या प्रश्नाचें उत्तर मला जें योग्य दिसलें तें मी देतों. मला हांजी हांजी करून दरबारीपद्धतीनें बोलतां येत नाहीं. कदाचित् माझा हा दुर्गुणहि असूं शकेल; पण असें बोलून तुह्मांला उगाच चिडवावें असा माझा हेतु नाहीं. माझ्या पद्धतीनें मी बोलतों. तुमच्या पद्धतीनें बोलून जिवंत राहण्यापेक्षां माझ्या पद्धतीनें बोलून मरण्यालाहि मी तयार आहें. मीं आपलें सर्व आयुष्य माझ्या देशबांधवांनां शिक्षण देण्यांत खर्च केलें, हाच जर माझा अपराध असेल तर अथेन्स संस्थानानें माझा आणि माझ्या कुटुंबाचा सर्व खर्च चालवून माझी या न्याय-सभेच्या अध्यक्षस्थानीं कायमची नेमणूक करावी. माझ्या गुन्ह्याला हीच शिक्षा योग्य आहे!

साक्रेटिसाचें हें भाषण ऐकून सर्व सभासद चिडले आणि त्यांनीं त्याला हेमलाक नांवाचे विष पाजून ठार मारण्याचा हुकूम केला. तुरुंगाकडे जात असतां न्यायसभेकडे पाहून

तो ह्मणाला बंधुहो, माझी आपणाला एक शेवटची विनंति आहे. माझे मुलगे सद्गुणांपेक्षां द्रव्याला किंवा दुसऱ्या कशालाहि अधिक मान देतात असें तुह्मांला वाटलें, किंवा ते अंगीं नसलेल्या गुणांबद्दल प्रौढी मिरवितांना तुह्मांला आढळले तर तुह्मी त्यांची क्षमा न करितां तुह्मांला वाटेल ती शिक्षा तुह्मी त्यांनां द्या. असो. मी आतां मरावयाला जातों आहें आणि तुह्मी सर्व जगण्याला जाणार ! पण मरणें आणि जगणें यांत अधिक सुखदायक कोणतें, हें एक त्या परमेश्वराला माहित !

यानंतर एक महिन्यानें सक्रेटिसाची शिक्षा अमलांत आली. हा महिना तुरुंगवासांत त्यानें मोठ्या आनंदानें काढला. त्याच्या हितचिंतकांनीं एकदां अवश्य त्या सर्व तजविजी करून ठेवल्या आणि त्याला तेथून पळून जाण्याची मसलत दिली; पण त्यानें ती मान्य केली नाहीं. एक महिनाभर त्याची कोठडी ह्मणजे सरस्वतीदेवीचें एक मंदिरच बनली होती. तेथें घडलेल्या सर्व गोष्टींची प्लेटोनें लिहिलेली हकीकत अत्यंत सुंदर, उपदेशपर आणि हृदयद्रावक आहे. साक्रेटिसाच्या कुटुंबांतील मनुष्यें येथें दोन वेळां त्याच्या भेटीला गेलीं होतीं. त्याला तीन मुलगे होते. शेवटच्या दिवशीं शांतवनपूर्वक साक्रेटिसानें आपल्या कुटुंबांतील मंडळीला निरोप दिला. त्याच्या शिष्यमंडळीपैकीं, क्राटो, फीडो, प्लेटो वगैरे पुष्कळ मंडळी नेहमीं तेथें बसलेलीच असत. संध्याकाळच्या वेळीं स्नान करून, मोठ्या आनंदी मुद्रेनें साक्रेटिसानें सर्वांसमक्ष विष प्राशन केलें आणि या कष्टद मृत्युलोकची आपली यात्रा संपविली.

# साक्रेटिसाचे विचार.

## प्राक्कथन.

साक्रेटिसाजवळ संभाषण करण्याचे अनेक प्रसंग आल्यामुळें प्रमाणपूर्वक वादविवाद करण्यांत त्याचे मित्र चांगले प्रवीण झाले होते. कोणत्याहि विषयाची पूर्ण माहिती करून घेतल्यावांचून जो मनुष्य त्या विषयावर वादविवाद करितो, तो आपण स्वतः फसून दुसऱ्यांसहि फसवितो, असें साक्रेटिसाचें मत असल्यामुळें, कोणत्याहि विषयावर संभाषण करितांना साक्रेटीस आपल्या मित्रांस त्या विषयाची उत्तम माहिती करून देत असे. असें करणें हें तो कर्तव्यच समजत होता; आणि तें बजावतांना त्याला कधीं त्रास वाटत नव्हता. खात्री पटण्यासारखें कारण न दाखवितां जेव्हां कोणी साक्रेटिसाच्या विरुद्ध मत प्रतिपादन करी, तेव्हां साक्रेटीस असल्या वादाच्या चर्चेस आरंभापासून सुरुवात करून सत्यसंशोधनाच्या मार्गाला लागे.

कोणत्याहि विषयावर संभाषण करावयाचें ह्मणजे साक्रेटीस सर्वसाधारण आणि सर्वमान्य अशा सिद्धांतापासूनच आपल्या भाषणाला आरंभ करी. वादविवादाचें मुख्य रहस्य यांतच आहे, असें त्याचें मत होतें. 'आपल्या ह्मणण्याची सत्यता लोकांच्या मनांत बिंबवून त्याला अगदीं सहजांत आपल्या बाजूला वळविणारा साक्रेटिसासारखा मनुष्य मीं आजवर पाहिला नाहीं,' असें 'साक्रेटीस याचे विचार,' नामक पुस्तकाचा कर्ता आणि सुप्रसिद्ध ग्रीक इतिहासकार झेनोफन नेहमीं ह्मणत असे. होमरनें युलिखेसविषयीं ह्मटलें आहे, कीं, तो

'सर्वमान्य सिद्धांतांच्या पायावर आपल्या वादविवादाची रचना करून आपलीं तत्त्वें लोकांच्या मनांत अचूक रीतीनें भरवून तीं त्यांला मान्य करण्याला लावणारा एक उत्कृष्ट वक्ता होता.' साक्रेटिसा-विषयींहि अक्षरशः असेंच ह्मणतां येईल.

साक्रेटिसानें प्रतिपादिलेल्या सर्व विषयांची माहिती या लहानशा पुस्तकांत देतां येणें शक्य नाहीं. ह्मणून त्याच्या सप्रमाण वाद-विवाद-पद्धतीचे कांहीं थोडे नमुने मात्र पुढें दिले आहेत.

# निर्व्यसनिता.

झेनोफन ह्मणतो "निर्व्यसनिता हा मनुष्याच्या अंगचा निःसंशय एक गुण आहे." तथापि या गुणासंबंधानें साक्रेटिसाचें जें काय ह्मणणें आहे त्यानें आपल्या मनास कांहीं जास्त बोध होतो कीं नाहीं, हें पाहूं.

साक्रेटीस एकदां ह्मणाला "आपण लढाईमध्यें गुंतलों असतां ज्याला संकटें भोगण्याचें व श्रम करण्याचें सामर्थ्य नाहीं, व जो दारू आणि स्त्रिया यांच्या ठिकाणीं अतिशय लंपट आहे, अशा माणसाला सेनाधिपति नेमूं काय? असा सेनाधिपति आपलें सत्रांचे संरक्षण करून आपल्या शत्रूंस जिंकू शकेल काय? अथवा असें समजूं, कीं, आपण अगदीं मरणोन्मुख झालों आहों, आणि आपणाला आपल्या पश्चात् आपल्या मुलांबाळांची व्यवस्था पाहण्यास व त्यांस सुशिक्षित करण्यास कोणी तरी माणूस नेमावयाचा आहे; अशा प्रसंगीं आपण आतां सांगितल्या प्रकारचा व्यसनी मनुष्य त्या कामासाठीं निवडूं काय? आपल्या मुलांबाळांच्या वर्तनावर देखरेख करण्यास व त्यांनां उत्तम रीतभात लागावी ह्मणून त्यांनां अशा व्यसनी माणसाच्या स्वाधीन आपण कधीं करूं काय? आपलीं गुरेंढोरें, आपला दाणागोटा संभाळण्याचें काम अशा दारुड्याच्या हातीं आपण कधीं तरी देऊं काय? कोणचें तरी काम जें नीटपणीं व्हावें असें आपणाला वाटतें, तें अशा माणसाच्या अंगावर आपण कधीं तरी सोंपवूं काय? फार कशाला, अशा तऱ्हेचा व्यसनी गुलाम कोणीं आपणाला नजर केला तर आपण त्याला पतकरितांना हा ह्याचा व्यसनीपणा ही मोठी अडचण आहे असें आपण समजणार नाहीं काय? तर मग यःकश्चित् गुलामाच्या अंगचा देखील व्यसनीपणा जर

'सर्वमान्य सिद्धांतांच्या पायावर आपल्या वादविवादाची रचना करून आपलीं तत्त्वें लोकांच्या मनांत अचूक रीतीनें भरवून तीं त्यांला मान्य करण्याला लावणारा एक उत्कृष्ट वक्ता होता.' साक्रेटिसा-विषयींहि अक्षरशः असेंच ह्मणतां येईल.

साक्रेटिसानें प्रतिपादिलेल्या सर्व विषयांची माहिती या लहानशा पुस्तकांत देतां येणें शक्य नाहीं. ह्मणून त्याच्या सप्रमाण वाद-विवाद-पद्धतींचे कांहीं थोडे नमुने मात्र पुढें दिले आहेत.

# निर्व्यसनिता.

झेनोफन ह्मणतो "निर्व्यसनिता हा मनुष्याच्या अंगचा निःसंशय एक गुण आहे." तथापि या गुणासंबंधानें साक्रेटिसाचें जें काय ह्मणणें आहे त्यानें आपल्या मनास कांहीं जास्त बोध होतो कीं नाहीं, हें पाहूं.

साक्रेटीस एकदां ह्मणाला "आपण लढाईमध्यें गुंतलों असतां ज्याला संकटें भोगण्याचें व श्रम करण्याचें सामर्थ्य नाहीं, व जो दारू आणि स्त्रिया यांच्या ठिकाणीं अतिशय लंपट आहे, अशा माणसाला सेनाधिपति नेमूं काय? असा सेनाधिपति आपलें सर्वांचे संरक्षण करून आपल्या शत्रूंस जिंकूं शकेल काय? अथवा असें समजूं, कीं, आपण अगदीं मरणोन्मुख झालों आहों, आणि आपणाला आपल्या पश्चात् आपल्या मुलांबाळांची व्यवस्था पाहण्यास व त्यांस सुशिक्षित करण्यास कोणी तरी माणूस नेमावयाचा आहे; अशा प्रसंगीं आपण आतां सांगितल्या प्रकारचा व्यसनी मनुष्य त्या कामासाठीं निवडूं काय? आपल्या मुलांबाळांच्या वर्तनावर देखरेख करण्यास व त्यांनां उत्तम रीतभात लागावी ह्मणून त्यांनां अशा व्यसनी माणसाच्या स्वाधीन आपण कधीं करूं काय? आपलीं गुरेंढोरें, आपला दाणागोटा संभाळण्याचें काम अशा दारुड्याच्या हातीं आपण कधीं तरी देऊं काय? कोणचें तरी काम जें नीटपणीं व्हावें असें आपणाला वाटतें, तें अशा माणसाच्या अंगावर आपण कधीं तरी सोंपवूं काय? फार कशाला, अशा तऱ्हेचा व्यसनी गुलाम कोणीं आपणाला नजर केला तर आपण त्याला पतकरितांना हा त्याचा व्यसनीपणा ही मोठी अडचण आहे असें आपण समजणार नाहीं काय? तर मग यःकश्चित् गुलामाच्या अंगचा देखील व्यसनीपणा जर

आपणांला अगदीं खपत नाहीं, तर आपण कधींहि अशीं व्यसनें जडवून न घेण्याबद्दल फार काळजी घेण्यास नको काय ? असें पहा, धनलोभ हें एक व्यसन आहे; परंतु धनलोभी मनुष्याचें एवढें तरी एक असतें, कीं, त्याला द्रव्यार्जनांत समाधान वाटतें. तो दुसऱ्याच्या द्रव्याचा अपहार करितो, परंतु त्याच्या योगानें त्याचें स्वतःचें द्रव्य तरी वाढत असतें; परंतु व्यसनी मनुष्य आपला स्वतःच तोटा करितो आणि दुसऱ्याचाहि करितो. इतकेंच नव्हे, तर त्याचा उपद्रव सर्व जगाला पोहोंचतो, असें ह्मटलें तरी चालेल. आपल्या स्वतःच्या कुटुंबाचा—इतकेंच नव्हे, तर आपल्या स्वतःच्या शरीराचा व आत्म्याचाहि नाश तो करून घेतो. ज्याला खाण्यापिण्याखेरीज दुसरें कांहीं सुचत नाहीं, आपल्या स्नेह्यांशीं संभाषण करण्यापेक्षां वेश्यांशीं संभाषण करणें ज्याला बरें वाटतें, त्याच्या संगतींत कोणाला तरी आनंद होईल काय ? निर्व्यसनिता हा सर्व सद्गुणांचा पाया आहे, ह्मणून आपल्या अंगीं ती आणण्याचा आपण प्रथम प्रयत्न केला पाहिजे. असें केलें नाहीं तर जें काय ह्मणून चांगलें, जें काय ह्मणून श्लाघ्य, तें आपल्या अंगीं आपणाला कसें आणितां येईल ? जो मनुष्य दुर्व्यसनांत अगदीं बुडून गेला आहे, त्याच्या मनाची व शरीराची अत्यंत वाईट अवस्था असते, हें खरें ना ? खरोखर, मला तर असें वाटतें कीं, कोणाहि स्वतंत्र मनुष्यानें दुर्व्यसनी चाकर केव्हांहि ठेवूं नये; आणि जे चाकर अशा पशुतुल्य व्यसनांत निमग्न असतील त्यांनीं आपणांला दयाळू धनी मिळावा, अशाबद्दल नेहमीं परमेश्वराचा धांवा करीत असावें. कारण, असा धनी त्यांनां मिळाला नाहीं तर त्यांची मुळींच धडगत लागावयाची नाहीं. ”

साक्रेटीस या विषयासंबंधानें जें काय नेहमीं ह्मणत असे तें हें. तो निर्व्यसनीपणा या सद्गुणाची इतकी स्तुति करीत असे, व त्या-

विषयीं आपलें इतकें प्रेम दाखवीत असे; पण त्याची ही स्तुति आणि हें प्रेम केवळ भाषणांतच नव्हे तर त्याच्या सर्व कृतींत उत्तम तऱ्हेनें दिसत आहे. इंद्रियसुखांचा मोह त्याच्या मनाला यत्किंचितहि बाधा करूं शकत नसे. तसेंच तो द्रव्यप्राप्तीच्या साधनांचाहि त्याग करीत असे. कारण तो असें ह्मणे, कीं, जो कोणी दुसऱ्याचा पैसा घेतो तो त्या पैसेवाल्याचा पक्का गुलामच बनतो. त्याची तब्यत जसजशी लागेल, तसतसें याला वांकावें लागतें. ही गुलामगिरी प्रत्यक्ष गुलामगिरीपेक्षांहि जास्त वाईट नाहीं, असें कोण ह्मणेल?

[library stamp]

# साक्रेटिसाची राहणी.

एकदां ॲान्टिफान नांवाचा सोफिस्ट* साक्रेटिसाच्या श्रोत्यांनां आपल्या बाजूला वळविण्याच्या उद्देशानें त्यांजकडे गेला व त्यांच्यासमक्ष साक्रेटिसाला ह्मणाला "साक्रेटिसबोवा, आजपर्यंत मला वाटत होतें कीं, तत्त्वज्ञानी लोक इतर लोकांपेक्षां जास्त सुखी असतात; पण तुमची स्थिति तर याच्या उलट दिसते. तुमच्या शहाणपणामुळेंच तुह्मीं इतरांपेक्षां ज्यास्त दुःखी आहांत, असें मला आतां वाटूं लागलें आहे. काय तुमची ही रहाण्याची तऱ्हा! एकादा चाकर देखील, त्याचा धनी त्याला अशा रीतीनें वागवील तर तो आपल्या चाकरीवर लाथ मारून दुसरी पहाण्याला कमी करणार नाहीं! तुमचें खाणेंपिणें भिकारी, एकाद्या भिकाऱ्याप्रमाणें तुमचा उन्हाळ्याचा आणि हिंवाळ्याचा पोषाख एकच, आणि या तुमच्या पायांची आणि जोड्याची तर मला वाटतें कधीं गांठच पडली नाहीं! बरें, इतकेंहि असून जो पैसा मिळाल्यानें सुखासमाधानांत आयुष्य घालवितां येतें, तो पैसा तर तुह्मांला मुळींच नको. या सगळ्या गोष्टींचा विचार केला ह्मणजे मला असें वाटतें, कीं, सर्व कलांचे विद्यार्थि जसे आपल्या गुरूजीच्या वळणावर जातात, त्याप्रमाणें तुमचीं भाषणें ऐकणारी ही मंडळी जर तुमच्या वळणावर गेली, तर मग तुह्मीं त्यांनां कष्टी होण्याच्या मार्गांवाचून दुसरें कांहींएक शिकविलें नाहीं, असें ह्मणावें लागेल."

---

* प्राचीन ग्रीसमध्यें पैसे घेऊन वक्तृत्व, तत्त्वज्ञान आणि राज्यशासनविद्या शिकविणारे लोक हे सोफिस्ट होत. हे आपल्या दिखाऊ परंतु खोट्या प्रमाणांनीं सत्यशोधकांस घोटाळ्यांत घालीत, त्यांची श्रद्धा ढळवीत आणि यामुळें लोकांच्या तिरस्काराला व द्वेषाला पात्र होत.

## साक्रेटिसाची राहणी.

साक्रेटीस ह्मणाला "अँन्टिफान, मी फार भिकार तऱ्हेनें राहतों. अशा तऱ्हेनें रहाण्यापेक्षां मरण बरें, असेंहि तूं कदाचित् ह्मणशील ! पण माझ्या रहाण्याच्या पद्धतींत चमत्कारिक आणि कठीण तें काय आहे ? मी पैसा घेत नाहीं, याबद्दल तूं मला दोष देतोस ! पैसा घेणाऱ्या माणसाला कराराप्रमाणें वागणें भाग पडतें; आणि मी पैसा घेत नाहीं, यामुळें मला योग्य वाटतील त्यांच्याशींच मी संबंध ठेवितों. हा दोषच का ? तुला माझें खाणेंपिणें आवडत नाहीं, असें कां बरें ? तें तुझ्या अन्नाप्रमाणें चांगलें आणि पौष्टिक नाहीं ह्मणून ? का तें थोडें आणि महाग मिळतें ह्मणून ? किंवा तुझें अन्न तुला मोठें उत्तम वाटतें ह्मणून ? अरे बाबा, ज्याला खाल्लेलें अन्न आणि प्यालेलें पाणी आवडतें, तो दुसऱ्या खाण्यापिण्याची मुळींच पर्वा करीत नाहीं ! माझ्याबद्दल जें तुझें ह्मणणें आहे, त्यावरून या बाबतींत तुझी समजूत पडली नाहींसें दिसतें. हवेच्या मानानें आपण पोषाखांत फरक करतों, आणि त्रास न होतां चालतां यावें ह्मणून जोडे घालतों, हें तुला ठाऊक आहेना? परंतु थंडीनें माझ्या बाहेर जाण्याला हरकत आलेली तूं कधीं पाहिली आहेस का ? तसेंच, उन्हाळ्यामध्यें मला तूं कधीं सावलीकडे धांवतांना पाहिला आहेस का? मी अनवाणी जातों, पण त्यामुळें माझ्या जाण्याला कधीं तरी हरकत आली आहे का ? कांहीं नाजूक प्रकृतीचे लोक सततच्या व्यायामानें आपली जन्मतः आलेली अशक्तता नाहींशी करून, हाडापेरानें चांगल्या, परंतु जन्मतः मेहनत करून अंगीं दार्ढ्य आणून न घेतलेल्या लोकांपेक्षां श्रमाचीं कामें अगदीं सहज करूं शकतात. असें जर आहे, तर तूं श्रमाची संवय न केल्यामुळें तुला तें जड वाटणें साहजिक आहे. मी आपलें सर्व आयुष्य नानातऱ्हेचे श्रम करण्यांत मोठ्या आनंदानें घालविलें असतां मला आतां अशा तऱ्हेनें राहणें जड कां बरें वाटावें ?

चिरकाळ सुख आणि अविनाशी बक्षिस देणाऱ्या, अशा गोष्टींत मी आपला काळ अधिक आनंदानें घालवीत असल्यामुळें मला लज्जास्पद इंद्रियसुखांत आणि कुंभकर्णी झोपेंत कांहींच वाटत नाहीं, आणि मधुर पक्कानांची फाजील वासना मला कधींहि होत नाहीं. एकाद्या मनुष्यानें आरंभिलेलीं कार्यें चांगलीं चालत नसलीं, म्हणजे तो सदा अगदीं दुर्मुखलेला दिसतो; आणि ज्यांचा व्यापारधंदा, शेतीभाती किंवा दुसरा कांहीं हातीं घेतलेला उद्योग त्यांच्या मनाप्रमाणें चालतो, ते नेहमीं आनंदी दिसतात, हें तुला माहितच आहे. आपण दिवसेंदिवस सद्गुणी बनत आहों, आणि आपली व चांगल्याचांगल्या लोकांची ओळख होऊन ते आपले मित्र होत आहेत, अशी मनाची पक्की समजूत झाल्यानें होणाऱ्या आनंदाची बरोबरी कशानें तरी करवेल काय? आपल्या मित्रांचें किंवा देशाचें कल्याण करण्याच्या कामांत, माझ्या पद्धतीनें राहणारा मनुष्य, तुझ्या आवडत्या तऱ्हेनें वागणारापेक्षां जास्त उपयोगी नाहीं का पडणार? लढाईच्या प्रसंगीं चांगला कोण? ज्याला मिष्टान्न भोजन पाहिजे तो, कीं जो जें मिळेल त्यांत खुष राहतो तो? वेढ्यांत सांपडला तर जास्त टिकाव कोण धरील? लाडवांचा शोकी, कीं जें मिळेल त्यांत भूक भागवणारा? अँन्टिफान! चांगलें खाणेंपिणें, थाटामाटानें व खर्चिक रीतीनें रहाणें, यांतच काय तें सर्व सुख, असा तुझा समज झाला आहे असें वाटतें; परंतु माझ्या मतें म्हणशील, तर कशाचीहि इच्छा नसणें, याचेंच नांव सरूपता, आणि अगदीं थोडकी इच्छा असणें म्हणजे समीपता किंवा ईश्वरसान्निध्य! तेव्हां यापेक्षां जास्त तें काय पाहिजे?"

एका वेळीं अँन्टिफान साक्रेटिसाला म्हणाला "साक्रेटिसबुवा, आपण मोठे प्रामाणिक असून आपले उद्देश स्तुत्य आहेत, हें मला कबूल आहे; परंतु आपल्याला अगदीं थोडें, किंबहुना कांहींच कळत

नाहीं, असें मला वाटतें; आणि शिक्षणाबद्दल तुह्मी कांहीं घेत नाहीं, यावरून ही गोष्ट तुह्मालाहि कबूल असावी असें दिसतें. तुह्मी आपलें घर किंवा त्यांतील एकादा जिन्नस कांहीं मोबदला—अथवा कांहीं कां ?—योग्य मोबदला घेतल्याशिवाय कोणाला द्याल का ? मला वाटतें, खास देणार नाहीं ! कारण, त्याची कांहीं किंमत आहे, असें तुह्माला वाटतें. तशीच तुमच्या ज्ञानाची जर तुह्माला कांहीं किंमत वाटती, तर तें फुकट देण्याला तुह्मी कधींहि तयार झालां नसतां! ज्ञानदानाच्या कामांत एकाद्या लबाड दुकानदाराप्रमाणें तुह्मी द्वेषबुद्धीनें कोणाला फसवींत नाहीं. यावरून तुमचा प्रामाणिकपणा जसा लोकांनां कळतो, तसेंच तुह्माला कांहीं कळत नसून तुमची अक्कल मुळींच घेण्यासारखी नाहीं, असाहि त्यांचा समज तुमच्या या वर्तनामुळें होतो."

साक्रेटिसानें यावर उत्तर दिलें "सौंदर्य आणि तत्त्वज्ञान यांत बरेंच साम्य आहे. एकांत जें वंद्य तें दुसऱ्यांत वंद्य, आणि एकांत जें निंद्य तें दुसऱ्यांत निंद्य ! एकादी स्त्री आपल्या सौंदर्याचा जर विक्रा करील, तर आपण तिला कसबीण ह्मणूं; परंतु ती जर कुलवान्, सुशिक्षित आणि सद्गुणी अशा मनुष्याची आपणावरील प्रीति जाणून केवळ त्या प्रीतिकरितांच त्याच्याशीं संबंध ठेवील, तर आपण तिला नीतिज्ञ ह्मणूं. तत्त्वज्ञानाचें अगदीं असेंच आहे ! त्याचें दुकान घालणारे जे सोफिस्ट लोक ते वेश्येप्रमाणें आहेत; परंतु जो तत्त्वज्ञ आपलें ज्ञान एकादा बुद्धिवान् पाहून त्याला शिकवितो, त्याला आपण चांगला आणि सद्गुणी मनुष्य समजतों. ज्याप्रमाणें कांहीं लोकांनां उत्तम घोडे, शिकारी कुत्रे आणि मधुर गाणारे सुंदर पक्षी जवळ असणें आवडतें, त्याप्रमाणें मला माझ्या सद्गुणी मित्रांच्या सहवासांत आनंद वाटतो. मला ज्या ज्या चांगल्या गोष्टी कळतात, त्या त्या मी त्यांनां शिकवितों, आणि जे त्यांनां उत्तम स्थितीला

पोहोंचविण्याच्या कामांत मदत करतील असें मला वाटतें, त्यांची मी त्यांना ओळख करून देतों.जो मोलवान् खजिना आपल्या पूर्वजांनीं आपणांकरितां ठेविला आहे,त्याचा आह्मी सर्व मिळून उपभोग घेतों, आणि त्यांचे सर्व ग्रंथ वाचून त्यांतून चांगलें असेल त्याकडे लक्ष्य देऊन तेवढेंच आह्मी निवडून घेतों. सारांश, आह्मी एकमेकांवर प्रीति करूं लागल्यापासून आमचा पुष्कळ फायदा झाला आहे."

हें त्याचें उत्तर ऐकून साक्रेटीस मोठा सुखी आहे अशी ॲन्टिफानची खात्री झाली.

एकदां ॲन्टिफाननें साक्रेटिसाला विचारले "तुह्मी दुसऱ्यांना राजनीति शिकवण्यासारखे जर तींत प्रवीण आहांत, तर एकादी जागा पत्करून राष्ट्रीय कामांत तुह्मी मन कां घालीत नाहीं?"

यावर साक्रेटीस ह्मणाला "जें मी एकटाच करूं शकेन व ज्यामध्यें माझा सर्व वेळ जाईल असें एकादें काम पत्करल्यानें मी देशाच्या जास्त उपयोगी पडेन, कीं, सध्याप्रमाणें शिक्षण देऊन मजप्रमाणेंच देशसेवा करणारे पुष्कळ लोक शिकवून तयार केल्यानें माझा जास्त उपयोग होईल?"

# दंभ आणि वृथाभिमान.

साक्रेटीस नेहमीं ह्मणे, कीं, वैभवाचा खरा मार्ग ह्मणजे सद्गुणी दिसणें हा नसून सद्गुणी बनणें, हा होय. हें सिद्ध करण्याकरितां तो ह्मणे " कल्पना करा, कीं, एकादा मनुष्य गाणारा नसून त्याला गवय्या ह्मणवून घेणें आहे, तर तो काय करील? त्याला त्या विशेष गुणावांचून इतर सर्व गोष्टींत गवयीलोकांची ऐट आणली पाहिजे. त्यांनां लागणारीं उत्तम प्रकारचीं सर्व वाद्यें त्यानें आपल्या जवळ बाळगलीं पाहिजेत, आणि तो ज्या ज्या ठिकाणीं जाईल, तेथें तेथें त्यानें आपल्याबरोबर आपली वाहवा करणारी मंडळी नेली पाहिजे. मात्र समाजामध्यें त्यानें नुसता सूरहि काढतां उपयोगी नाहीं! कारण, तसें झालें असतां लोकांनां त्याचें अज्ञान कळून येईल; इतकेंच नाहीं, तर त्याचा पोकळ डौल आणि मूर्खपणा हीं तेव्हांच त्यांच्या लक्ष्यांत येतील; आणि असें झालें ह्मणजे आपल्या अपकीर्तीकरितां त्यानें येवढी संपत्ती खर्च केल्याबद्दल लोक त्याला नांवें ठेविल्यावांचून राहणार नाहींत. त्याप्रमाणेंच एकादा मनुष्य अंगीं सामर्थ्य व ज्ञान नसतां जर सेनानायकाचा किंवा नौकावाहकाचा आव घालील, तर त्याचा काय बरें परिणाम होईल? एक तर त्याला त्याच्या सोंगाची बतावणी बरोबर करतां आली नाहीं तर त्याला फार त्रास वाटेल; आणि दुसरें, जर त्याला ती बरोबर करतां आली, तर त्याहूनहि वाईट परिणाम घडेल! कारण, त्याच्या सोंगाला भाळून त्याला जर कोणी सैन्याचा नायक किंवा गलबतावरील मुख्य नेमिलें, तर कामांत फजिती होऊन, प्रसंगीं त्याच्या हातून त्याच्या चांगल्या मित्रांचा घातहि होईल. आपण श्रीमंत, शूर किंवा बलाढ्य नसतां लोकांनां तसें भासविणें, हें फार धोक्याचें आहे. कारण, असा लोकसमज झाला असतां ते आपणावर आपल्या खऱ्या शक्तीच्या बाहेरील कामें

सोंपवितील, आणि तीं जर व्हावीं तशीं आपल्या हातून झालीं नाहींत, तर त्यासारखा घोर अपराधच नाहीं! या अपराधापासून कशानेंहि मुक्ति होणार नाहीं! आपल्या शेजाऱ्याच्या मालाची किंवा पैशाची अफरातफर करून त्याला फसविणें हा जर गुन्हा आहे, तर एकाद्या यःकश्चित् मनुष्यानें आपण सर्व राज्यकारभार चालविण्याच्या योग्यतेचे आहों असें खोडसाळपणानें साऱ्या जगाच्या मनांत भरविणें, हा केवढा गुन्हा होईल?"

या व अशाच तऱ्हेच्या पुष्कळ प्रमाणांनीं साक्रेटीस त्याजकडे जाणाऱ्या लोकांच्या मनांत दंभ आणि वृथाभिमान यांविषयीं तिटकारा उत्पन्न करी.

# राजाचा शिक्षणक्रम.

साक्रेटीस आपल्या श्रोत्यांचें मन, अति तृष्णा व क्षुधा यांचा प्रतिकार करण्याकडे, प्रीतीचे पाश आणि आळस यांपासून दूर राहण्याकडे, आणि सर्व प्रकारचे श्रम सोसण्यासारखें काटक बनण्याकडे, मोठ्या कौशल्यानें लावीत असे. या मंडळीपैकीं ॲरिस्टीपस नांवाचा एक गृहस्थ फाजील चैनींत असतो, असें ऐकल्यावरून साक्रेटिसानें त्याला विचारलें "जर एक राजपुत्र, व एक साध्या मनुष्याचा मुलगा, अशीं दोन मुलें तुझ्याकडे पाठविलीं, तर तूं त्यांनां कसें शिक्षण देशील ? अगदीं त्यांच्या खाण्यापिण्यापासून आरंभ कर. कारण, खाणेंपिणें हा सगळ्या गोष्टींचा पाया आहे."

ॲरिस्टिपस ह्मणाला "तुमचें ह्मणणें अगदीं खरें आहे. आपलें सर्व आयुष्य खाण्यावरच अवलंबून आहे. तें मिळालें नाहीं, कीं, आपली गठडी वळली ह्मणून समजा !"

साक्रेटीस ह्मणाला "त्यांनां तूं नियमित वेळीं खाण्यापिण्याला शिकविशील कीं नाहीं ?"

ॲरिस्टिपस ह्मणाला "होय, अर्थात् असेंच करीन."

साक्रेटीस ह्मणाला "परंतु एकादें महत्त्वाचें काम करण्याकरितां कोणत्या मुलाला त्याचें खाणें झालें नाहीं तोंच मध्यें उठण्याला तूं शिकविणार ?"

ॲरिस्टिपस ह्मणाला "त्याच्या उशिरामुळें राज्याचें नुकसान न व्हावें ह्मणून अर्थातूच राजपुत्राला मी ही सवय लावीन."

साक्रेटीस ह्मणाला "तसेंच तहान मारणें, थोडी झोंप घेणें, उशिरां निजणें, लौकर उठणें, रात्रीच्या रात्री जाग्रणें करणें, पवित्रपणानें रहाणें, आपल्या इच्छांच्या स्वाधीन न होणें, आणि श्रम करण्याला

टंगळमंगळ न करितां मोठ्या उत्सुकतेनें तें करणें या गोष्टी तरी तूं कोणाला शिकविणार?"

ॲरिस्टिपस ह्मणाला "त्यालाच."

साक्रेटिस ह्मणाला "शत्रूंचा पराजय करण्याची जर एकादी कला असेल तर ती कोणाला शिकविणें योग्य आहे?"

ॲरिस्टिपस ह्मणाला "राजपुत्राला शिकविणेंच जास्ती योग्य. कारण, ही कला नसेल तर बाकीचें शिक्षण अगदींच फुकट होईल!"

साक्रेटीस ह्मणाला "कांहीं मादक द्रव्याला भुलून, कांहीं खाण्याच्या आशेनें, कांहीं जबर कामवासनेच्या तडाक्यांत सांपडून असे कोट्यवधि लहानथोर प्राणी भयाचा किंवा संकटाचा विचार न करितां, अगदीं स्वल्पायासानें शत्रूच्या पाशांत सांपडतात, आणि त्यांचा भयंकर परिणाम होतो. असें जरी आहे, तरी आपण ह्मणतों त्या रीतीनें शिक्षण मिळालेला मनुष्य असा अगदीं सहज शत्रूच्या स्वाधीन कधींहि होणार नाहीं, असें मला वाटतें."

ॲरिस्टिपस ह्मणाला "तुमचें ह्मणणें खरें आहे."

साक्रेटीस ह्मणाला "असें जर आहे, तर ईश्वरानें ज्याला विचार-शक्ति दिली आहे, अशा मनुष्यप्राण्यानें बुद्धिहीन पशुपक्ष्यांप्रमाणेंच या घातक गोष्टींला भुलून पाशांत पडावें, हें किती निंद्य आहे! आपण मोठ्या धोक्याचें काम करीत आहों, या गुन्ह्यासंबंधानें कायदा फार कडक आहे, आपलें हें दुष्कृत्य कदाचित् कोणी पहात असेल, जर आपण कोणाच्या तावडींत सांपडलों तर आपलें टाळकें फुटल्या-वांचून रहाणार नाहीं! सारांश, शिक्षा आणि अपकीर्ति हीं असल्या गुन्ह्याच्या मागोमाग ठेवलेलींच आहेत. हें पक्कें ठाऊक असून, आणि असल्या घाणेरड्या कृत्यांपेक्षां हजारों सन्माननीय कृत्यें करण्या-सारखीं आहेत अशाविषयीं ज्ञान असूनहि, जे लोक संधि साधून

विवाहित स्त्रियांना भ्रष्ट करण्याच्या उद्देशानें त्यांच्या शयनगृहांत छपून रहाण्याचें जिवावरचें साहस करितात, त्यांच्या कृति ह्मणजे दुष्टपणा आणि नीच साहस यांचीं ढळढळीत उदाहरणें नाहींत काय ? "

ॲरिस्टिपस ह्मणाला "मला असेंच वाटतें."

साक्रेटीस ह्मणाला "आपल्या आयुष्यांतील अवश्य आणि महत्त्वाचीं कृत्यें ह्मटलीं ह्मणजे लढाई आणि शेती हीं उघड्या मैदानांत आणि शेतांत होत असून, पुष्कळ लोक ऊन, तहान, थंडीवारा आणि पाऊसपाणी यांचा कडकपणा सोसण्याची सवय करून घेत नाहींत, हा आळस नव्हे काय ? आणि पुष्कळ लोकांवर हुकूम चालवूं इच्छिणाऱ्या माणसानें हे श्रम सोसण्याची तयारी करावयाला नको काय ? "

ॲरिस्टिपस ह्मणाला "होय, त्यानें अवश्य अशी तयारी केली पाहिजे."

साक्रेटीस ह्मणाला " आतां मला असें सांग, कीं, जर धीराचे आणि कष्टाळू लोकच धुरीणत्व स्वीकारण्याला योग्य आहेत, तर यांचा गंधहि नसणाऱ्या लोकांनीं आपण या अधिकाराला पात्र आहोंत असें मानणें ह्मणजे मूर्खपणा नव्हे काय ? "

आरिस्टिपसनें हें कबूल केल्यावर साक्रेटीस पुढें ह्मणाला "तर मग या दोघांपैकीं कोणाची स्थिति तुला आवडते ?"

आरिस्टिपस ह्मणाला " मी लोकांवर ताबेदारी ठेवण्याचें काम कधींच पतकरणार नाहीं. ज्यांना इच्छा असेल त्यांनीं तें काम खुशाल पतकरावें. मी त्यांचा हेवा मुळींच करणार नाहीं. आपल्या गरजा भागविणेंच आपणाला जड जात असून आणखी लोकांच्या गरजांचें ओझें आपल्या डोक्यावर घेणें, आणि इच्छित वस्तु न मिळाल्यामुळें

अतृप्त राहणें भाग पडत असतां लोकांनां अवश्य वस्तु न पुरवि- त्याचा दोष आपल्या माथीं ओढणें, हा मोठा मूर्खपणा आहे असें मला वाटतें. माझ्या चाकरांनीं माझा हुकूम होतांच चाहील ती वस्तु मला आणून द्यावी, परंतु एकीचाहि त्यांनीं स्वतःकरितां उपयोग करूं नये, असें जसें मला वाटतें, तसेंच स्वतंत्र संस्थानांतील लोकांनां त्यांच्या अधिकाऱ्यांविषयीं वाटतें. त्या बिचाऱ्यांनीं यांनां लागतील त्या गोष्टी यथास्थित पुरवाव्या, परंतु स्वतःच्या फायद्याचें असें त्यांनीं कांहींच करितां कामां नये. याकरितां ज्यांनां स्वतः पुष्कळ कामें करणें आणि लोकांवर हुकूम करणें आवडत असेल, आणि ज्यांनां आपण ह्मटलेल्या प्रकारचें शिक्षण मिळालें असेल, ते मात्र या अधिकाराला पात्र आहेत. माझ्याविषयीं ह्मणाल तर शांतपणें आणि सुखानें आयुष्य घालविणेंच मला आवडतें."

साक्रेटीस ह्मणाला "प्रजेपेक्षा राजाचें आयुष्य जास्त सुखावह असतें कीं काय, हें आपण आतां पाहूं या. आशियांतील सिरियन्स् वगैरे लोक इराणच्या ताब्यांत आहेत; यूरोपांतील मिसियन्स हे सिथियन लोकांच्या अमलाखालीं आहेत; आणि बहुतेक ऑफ्रिके- वर कार्थेजियन लोक आपला अम्मल चालवितात. आतां या सर्वांत जास्त सुखी कोण? आपण आपल्या ग्रीस देशाचीच स्थिति पाहूं या. यामधील जीं संस्थानें दुसऱ्यावर अम्मल चालवितात त्यांमधील लोकांची, किंवा जीं दुसऱ्याच्या ताब्यांत आहेत त्यांतील लोकांची स्थिति स्पृहणीय आहे, असें का तुला वाटतें?"

ॲरिस्टिपस ह्मणाला "मी गुलामगिरी तर कधींच पतकरणार नाहीं! परंतु हुकमत आणि ताबेदारी यांच्या मधला स्वातंत्र्याचा जो मार्ग त्यानें जाण्याचा माझा नेहमींचा प्रयत्न असतो. कारण, खऱ्या सुखाला आणि विश्रांतीला पोहोंचणारा जवळचा रस्ता तोच आहे, असें मला वाटतें."

साक्रेटीस ह्मणाला "हुकमत आणि ताबेदारी यांपैकीं एकहि नसतां आपणाला मनुष्यांत कसें राहतां यावें ? तेव्हां हा तुझा मार्ग मनुष्यसमाजाला अत्यंत दूरचा आहे असें जर तूं ह्मणतोस, तर तें कांहीं शोभलें असतें. अरे बाबा, 'बळी तो कानपिळी' या न्यायानें शक्ति, पैसा किंवा अधिकार यानें संपन्न लोक, अशक्त गरीब आणि घरकामी लोकांवर, ते जुलमाखालीं जेर होऊन रडत-ओरडत असतांहि, पराकाष्टेचा जुलूम करतात, याचीं हजारों उदाहरणें तूं पाहिलीं नाहींस का ? अशा जबरदस्त लोकांशीं प्रसंग येतांच हूं कीं चूं न करितां, जे या जुलमाच्या जोखडाखालीं आपली मान देत नाहींत त्यांच्या देशाची, हे थोर लोक कशी नासाडी करितात, त्यांच्या शेताभाताची कशी धूळधाण करून टाकतात, त्यांच्या झाडामाडाची कशी वाट लावितात, आणि त्यांच्यावर हल्ला करून त्यांच्या बायकापोरांची काय दशा करितात, हें तुला ठाऊक नाहीं काय ? ही दोन राष्ट्रांची गोष्ट झाली; परंतु मनुष्याच्या खासगी व्यवहारांतहि बळी तो कानपिळी हा प्रकार नेहमीं चाललेला आहे."

ॲरिस्टिपस ह्मणाला "असें होऊं नये ह्मणून तर मी कोणत्याहि स्वतंत्र संस्थानाशीं संबंध न ठेवतां आज येथें तर उद्यां तेथें, याप्रमाणें जेथें जाईन तेथें नवा, अशा रीतीनें राहत असतों."

साक्रेटीस ह्मणाला "ही तुझी युक्ति खूप विलक्षण आहे बुवा ! चोरांच्या नायकांच्या निःपातामुळें प्रवाशी लोकांच्या मार्गांत आतां पहिल्यासारखीं विघ्नें राहिलीं नाहींत, असेंच का तुला वाटतें? स्थायिक लोकांच्या कल्याणाकरितां नानाप्रकारचे कायदे आहेत. त्यांचे नातेवाईक आणि मित्र त्यांच्या रक्षणासाठीं तयार असतात, व त्यांच्या शहराला तटबंदी असून त्यांच्याजवळ हत्यारांचा

संग्रहहि चांगला असतो; आणि विशेष गोष्ट ही, कीं, शेजारच्या सर्व मंडळींची त्यांना मदत असते. इतक्या गोष्टींचें साहाय्य असतां, दुष्ट लोकांचे त्यांना त्रास देण्याचे प्रयत्न आजहि चालू आहेत! नेहमीं संकटमय प्रवास करणाऱ्या यःकश्चित् रहिवाशापेक्षांहि हा तूं स्वीकारलेला मार्ग फारच कमी दर्जाचा आहे. तूं शहरांत कधीं जात नाहींस, दुसऱ्याच्या जीवावर चरितार्थ चालविणाराप्रमाणें तूं अगदींच अप्रसिद्ध आहेस, मग अशा स्थितींत तुझी काय अवस्था होईल, याची तुला कल्पना तरी आहे काय? तूं कोणी परका मनुष्य आहेस, अथवा तुला सरकारांतून निर्विघ्न प्रवासाबद्दल वचन मिळालें आहे, ह्मणून तूं सुरक्षित राहशील असें का तुला वाटतें? दुर्दैवानें कोणी तुला पकडून गुलाम केलें, आणि तूं निरुपयोगी ठरलास, तर तुझा धनी तुला चांगल्या रीतीनें वागवील का? आळशी असून चैनींत राहण्याची इच्छा करणारा मनुष्य कोणी तरी आपल्या कुटुंबांत ठेवील? असल्या गुलामांना त्यांचे धनी कसे वागवितात, हें आतां आपण पाहूं."

साक्रेटीस पुढें ह्मणाला "आशाळभूत गुलामांचें खाणें बेतावर येईपर्यंत ते त्यांना उपास काढावयाला लावतात. चोरांच्या आटोक्यांतील वस्तू मोठ्या काळजीनें कुलपांत ठेवून ते त्यांना चोऱ्या करूं देत नाहींत. पळपुट्यांना सांखळदंडानें बांधून ठेवितात, आणि आळशांना चाबकांच्या फटक्यांचें बक्षीस देतात. गड्या, तुझा स्वतःचा गुलाम जर असा कवडीमोल असता तर त्याला ताळ्यावर आणण्याकरितां तूं हे असलेच उपाय योजले नसतेस का?"

ॲरिस्टिपस ह्मणाला "तो माझी योग्य चाकरी करूं लागेपर्यंत मीं त्याला मोठ्या कडक रीतीनें वागविला असता; परंतु साक्रेटीसबुवा, आतां आपण आपला पहिलाच विषय चालवूं या.

ज्या राज्यशासनविद्येत तुह्माला मोठें सौख्य वाटतें, तीमध्यें प्रवीण झालेल्या मनुष्यांत आणि दारिद्र्यपीडितांत काय अंतर आहे ? कारण, तुह्मी ह्मणतां त्यांनीं आपली भूकतहान मारण्याची सवय केली पाहिजे, थंडीवारा, ऊनतहान त्यांनां सोसतां आलें पाहिजे, त्यांनीं अगदीं थोडी झोंप घेतली पाहिजे, आणि दुसरीं हजारों श्रमाचीं कामें करण्याला तयार झालें पाहिजे. आतां खुषीनें आणि जबरीनें चाबकाचे तडाके खाऊन निरनिराळ्या दोन रस्त्यांनीं शरीराला त्रास देण्यांत काय फरक आहे, हें मला समजत नाहीं. उलट खुषीनें दुःख सोसणें हा मूर्खपणा आहे !"

साक्रेटीस ह्मणाला "खुषीच्या आणि जुलमाच्या गोष्टींतील फरक तुला कसा कळत नाहीं ? ज्याला न खाण्यांत आनंद वाटतो, तो त्याच्या मनांत येईल तेव्हां आपली भूक शमवील, आणि जो खुषीनें तहान मारतो, तो त्याला वाटेल तेव्हां ती भागवील; परंतु ज्याला जुलमानें किंवा जरूरीमुळें भूक-तहान मारावी लागते, त्याला इच्छा होतांच आपली तृप्ति करून घेतां येईल काय ? आशेमुळें मनुष्याला जो जोम उत्पन्न होतो, त्याच्या योगानें मोठ्या श्रमाचीं कामें आपण होऊन करीत असतांहि, त्याला फार आनंद वाटत असतो. शिकार करणाराला पारधीच्या आशेमुळें शिकारीचे श्रम भासत नाहींत. मिळावयाचें फल श्रमाच्या मानानें कितीहि अल्प असलें तरी असाच प्रकार घडतो. असें आहे ह्मणून ज्यांनां चांगल्याची संगति करावयाची असते, ज्यांनां आपल्या शत्रूवर जय मिळवावयाचा असतो, ज्यांनां आपल्या कुटुंबावर आपला अम्मल बसवावयाचा असतो, आणि ज्यांनां आपल्या देशाची सेवा करावयाची असते, त्यांनीं आत्मसंयमन करून, व आपलें मन आणि चांगले लोक आपणांला बरें ह्मणतील इतक्याचवर भरंवसा ठेवून, मोठ्या आनंदानें

श्रम करण्याला तयार झालें पाहिजे. 'जे श्रम सहज करतां येतात व ज्यांमध्यें आरंभींच सुख होतें, त्यांच्या योगानें महत्कार्याला लागणारी तरतरी आणि शक्ति अंगांत येत नाहीं, किंवा चांगलें ज्ञान मिळूं शकत नाहीं. सुप्रसिद्ध कृत्यें अथवा ज्ञानार्जन धीर धरून जोरानें आणि सतत केलेल्या श्रमावांचून होत नाहींत,' असें पुष्कळ विद्वानांचें मत आहे. हेसिअड एका ठिकाणीं ह्मणतो ' दुर्गुणांचें घर अगदीं जवळ असून मार्ग फार सोपा आहे; परंतु सद्गुणांचें तसें नाहीं. त्याचें घर लांब-उंच एका शिखरावर असून तेथें पोहोंचण्याला अविश्रांत श्रम करावे लागतात. अंगांतून घामाच्या धारा चालल्या-वांचून तें कोणाला सांपडावयाचें नाहीं!' ऍपिचर्मस यानें एका ठिकाणीं अशाच अर्थानें ह्मटलें आहे ' ईश्वराचा आशीर्वाद श्रमांवांचून मिळत नाहीं!' तो दुसऱ्या ठिकाणीं ह्मणतो 'अरे आळसाच्या मुला! चैनीचे पाश तोडून टाक, नाहीं तर तुला दुःखच भोगावें लागेल!'

# सद्गुण आणि मोह.

प्राडिकस नांवाच्या एका ग्रीक ग्रंथकारानें हर्क्युलिसच्या चरित्रांत सद्गुण आणि मोह हे स्त्रीरूपानें त्याजकडे जाऊन त्याची मनधरणी करीत आहेत, असा प्रसंग आणून ह्मटलें आहेः—

"मनुष्य तरुण वयामध्यें आला ह्मणजे कोणत्या मार्गानें जावयाचें तें तो ठरवितो, आणि त्या त्याच्या आवडीनिवडीच्या परिणामाप्रमाणेंच त्याचें सर्व आयुष्य सद्गुणांत किंवा दुर्गुणांत जातें. हर्क्युलिस, ही वेळ येतांच दोहोंपैकीं कोणत्या मार्गाचा स्वीकार करावा, याचा विचार करण्याकरितां एका शांत अशा एकांत स्थळीं जाऊन बसला.

"तेथें तो विचार करीत बसला असतां साधारण स्त्रियांपेक्षां भव्य आकृतीच्या अशा दोन स्त्रिया त्यानें आपल्याकडे येतांना पाहिल्या. पहिलीचा तो सभ्य आणि मोहक चेहरा, तें जातिवंत सौंदर्य, तें निर्मल आणि गोंडस शरीर, ती लज्जेनें जमिनीकडे लागलेली दृष्टि, विनयशील वर्तन, मंदगति आणि तो शुभ्र पोषाख तिला फारच शोभवीत होता. दुसरीच्या अंगीं स्त्रीजाती सहज सुबकता मुळींच नसून चैनीनें आणि सुखानें तिला वाजवीपेक्षां फाजील स्थूलता आली होती. तिनें आपला वर्ण चांगला दिसावा ह्मणून अंगाला रंग फांसला होता. फाजील हावभावानें ती प्रेक्षकांनां मोह पाडण्याचा प्रयत्न करीत होती तिच्या दृष्टींत नम्रता मुळींच नसून फाजील विश्वास मात्र दिसत होता. तिचा पोषाख भपकेदार असून ती आपल्या शरीराकडे वारंवार पाही, आणि आपल्या नटण्याचा लोकांवर कांहीं परिणाम झाला आहे किंवा नाहीं, हें पाहण्याकरितां ती जवळ असतील त्यांकडे नजर फेंकी व पुनःपुनः आपल्या सावलीकडे पाही.

"त्या दोघीहि जवळजवळ येऊं लागल्या. पहिलीनें आपली मंदगति कायम ठेविली होती, परंतु दुसरीनें तिच्या पूर्वी पोहोंचण्याच्या

उद्देशानें हर्क्युलिसाकडे धांव मारली. त्याच्याजवळ जाऊन ती त्याला ह्मणाली 'प्रिया हर्क्युलिसा, आयुष्यांत आतां कोणत्या मार्गानें जावें, याविषयीं तुला मोठा विचार पडल्यासारखें दिसतें. जर तूं माझा मित्र होऊन मजबरोबर येशील, तर किंचित्‌हि श्रम न पडतां आयुष्यांतील सर्व सुखें मिळतील अशा ठिकाणीं मी तुला नेईन. तेथें जाण्याचा मार्ग सोपा आणि आनंदकारक आहे. उत्तम प्रकारच्या खाद्यपेयांनीं आपल्या जिभेची, सुंदर पदार्थांच्या दर्शनानें नजरेची, उत्तम सुगंधी द्रव्यांनीं आपल्या घ्राणांची, उंच उंच पराच्या गाद्यांवर शयन करून विश्रांतीच्या इच्छेची अशा सर्व इंद्रियांची व इच्छांची तृप्ति केव्हांकेव्हां आणि कसकशी करून घ्यावी हें ठरविण्यावांचून तेथें तुला दुसरी कोणत्याहि प्रकारची राजविषयक अथवा संसारविषयक काळजी रहाणार नाहीं. आतां, ज्यापासून हीं सर्व सुखें मिळणार तो झरा कांहीं दिवसांनीं नाहींसा होईल, आणि मग आपल्याला नेहमीं कष्ट करावे लागतील असा तुला संशय आला असेल, तर मी तुला खात्रीनें सांगतें, कीं, हीं सर्व सुखें तुला केवळ तुझ्या हुकुमानें दुसऱ्याच्या श्रमापासून मिळतील.'

"आपल्याला अशा देणग्या देणारी स्त्री आहे तरी कोण, हें जाणण्याची इच्छा साहजिकच होऊन हर्क्युलिसनें तिला तिचें नांव विचारलें. ती ह्मणाली 'माझे मित्र आणि ओळखीचे गृहस्थ, तसेच माझ्या तंत्रानें चालणारे लोक मला **सुखदेवता** ह्मणतात. परंतु माझे शत्रु आणि ज्यांच्या मनांत माझी बेअब्रु व्हावी अशी इच्छा आहे त्यांनीं मला **मोहदेवता** असें नांव दिलें आहे.' .

"हें बोलणें संपतें आहे, तोंच दुसरी स्त्री त्याच्याजवळ येऊन त्याला ह्मणाली ' मीहि तुला मदत करण्याच्या इच्छेनें आलें आहें. तुझे जन्मगुण मला चांगले अवगत आहेत, आणि तुझ्या लहानपणा-

पासून तुझ्या स्वभावाचें मोठ्या बारकाईनें मीं अवलोकन केलें आहे. त्यावरून मला असें वाटतें, कीं, तूं जर माझ्या मार्गानें आलास तर मोठमोठीं कृत्यें करण्याची इच्छा उत्पन्न होऊन तीं तूं मोठ्या मानानें शेवटाला नेशील, आणि त्यांच्यायोगानें मानवी प्राण्यांत माझी मोठी कीर्ति होईल; परंतु तुझीमाझी मैत्री होण्यापूर्वी मी तुला मनापासून असें स्पष्ट सांगतें, कीं, **श्रमावांचून आणि कष्टावांचून जें मिळतें त्यांत मोलवान् असें कांहींच नसतें.** हें सत्य अगदीं ठरल्यासारखें आहे. खऱ्या आणि सन्माननीय सुखाला ईश्वरानें किंमत ठेविली आहे. जर आपणावर ईश्वरप्रसाद व्हावा असें तुला वाटत असेल, तर त्याची भक्ति तुला केली पाहिजे. जर तुझ्या मित्रांनीं तुजवर प्रीति करावी असें तुला वाटत असेल, तर तूं त्यांच्यावर उपकार करण्याला शिकलें पाहिजे. एकाद्या शहरानें तुझा सन्मान करावा असें तुला वाटत असेल, तर त्याच्या कल्याणाकरितां तुला झटलें पाहिजे. जर तुझ्या शहाणपणाबद्दल आणि पराक्रमाबद्दल साऱ्या ग्रीस देशानें तुझे गोडवे गावे असें तुला वाटत असेल, तर त्याची कांहीतरी महत्त्वाची सेवा करण्याकरितां तुला मेहनत घेतली पाहिजे. जर आपलीं शेतें सुपीक होऊन आपणाला विपुल धान्य मिळावें असें तुला वाटत असेल, तर त्याप्रमाणें जमिनीची मशागत करण्याचे श्रम तुला घेतले पाहिजेत. आपल्या गुरांढोरांवर श्रीमंत होण्याची तुझी इच्छा असेल तर त्यांची योग्य काळजी घेण्याचें तुला शिकलें पाहिजे. आपल्या शत्रूंनां शरण आणून आणि आपल्या बद्ध मित्रांनां स्वातंत्र्य देऊन आपलें राज्य तलवारीच्या जोरावर वाढविण्याची इच्छा असल्यास फक्त युद्धकलाप्रविणाजवळ शिकूनच तुझें भागणार नाहीं, तुला स्वतः युद्धाचा अनुभव घेतला पाहिजे; आणि जर आपलें शरीर उत्तम व्हावें

असें तुला वाटत असेल, तर तें आपल्या मनाच्या पूर्णपणें आटोक्यांत ठेवून कष्टाचीं आणि श्रमाचीं कामें करून तूं त्याला वळण दिलें पाहिजेस.'

"हिचें बोलणें होतें आहे तों मध्येंच पहिली स्त्री ह्मणाली 'प्रिया हर्क्युलिसा, पाहिलेंस ना किती अडचणीच्या वाटेनें ही बाई तुला तिच्या आनंदाकडे नेणार? माझ्या मागून ये, मी तुला सुखाचा अगदीं जवळचा आणि सोपा मार्ग दाखवितें.'

"तिरस्कारयुक्त मुद्रेनें सद्गुणदेवता ह्मणाली 'तूं असें कोणतें सुख देणार? आणि हर्क्युलिस, तूं तरी त्याच्या प्राप्तीसाठीं कांहींएक खटपट न करितां असा कोणत्या आनंदाचा अनुभव घेणार! सुखोत्पादक गोष्टींची इच्छा होण्यापूर्वींच तुमच्यापैकीं पुष्कळ लोक त्याचा यथास्थित अनुभव घेतात. भूक लागण्यापूर्वींच जेवतात, तहान लागण्यापूर्वींच पाणी पितात, अशा तुह्मां लोकांचें जिव्हालौल्य शांत करण्यासाठीं तुमचीं पक्वान्नें आणि पेयें बनविण्याकरितां उत्तम आचारी पाहिजेत, तुह्माला उन्हाळ्याच्या दिवसांत शीतपेयांचें पान करण्याकारितां बर्फाच्या जागा शोधल्या पाहिजेत, तुमच्या झोंपेंत अडथळा येऊं नये ह्मणून तुह्मांला उत्तम छपरी पलंगावर मऊमऊ परांचे बिछाने पाहिजेत, आणि तुमच्या घरांतील जिन्याच्या पायऱ्या चढतांना तुह्मांला त्रास होऊं नये ह्मणून त्या अत्यंत मृदु असल्या पाहिजेत! परंतु ईश्वर जाणें, कदाचित् हें सर्व उणें पडून तुह्मीं झोंप येण्यासारखें कांहींएक न केल्यामुळें, आणि फक्त दुसरें कांहीं करण्याला नाहीं ह्मणून तिच्यासाठीं लागल्यामुळें ती तुह्मांला येणारहि नाहीं! प्रीतिविषयक सुखाचेंहि असेंच आहे. त्यांतहि तुह्मी आपल्या वासनांप्रमाणें वागत नाहीं, तर सृष्टिनियमांच्या उलट जाऊन कृत्रिम उपायानें वासना उत्पन्न करितां व त्यांची तीव्रता राखतां. दुष्कर्में

करण्याकरितां सारी रात्र जागून दिवसाचा उपयोगी वेळ डुलक्या खाण्यांत खर्च करणाऱ्या तुमच्या अनुयायांनां तुमचें शिक्षण असतें, तें अशाच प्रकारचें! तुह्मी अमर झालां तरी अशा वागणुकीनें देवादिक तर काय, परंतु चांगले लोक देखील तुमचा तिटकारा करतील. सर्वांत गोड शब्द ह्मणजे आपली स्तुति तर तुमच्या कानीं कधींच यावयाची नाहीं. तुमच्या एकाद्या बोलण्याला मान तुकावील, तुह्मांला अडीअडचणींत मदत करील, अथवा तुमच्या मूर्ख मंडळींत शिरेल इतका शहाणा कोण आहे? तुमच्या अनुयायांची शक्ति तरुणपणीं, आणि अक्कल ह्मातारपणीं नाहींशी होते. तरुणपणीं ते आळसांत, नाजूकपणांत आणि फाजील उधळपट्टीनें चैन करण्यांत आपलें आयुष्य घालवितात, आणि ह्मातारपणीं कृतकर्मांची लाज वाटून कर्तव्याचें ओझें पडून आणि पूर्ववयांत सांठवून ठेवलेल्या दुःखाचा अनुभव घेऊन आपलें आयुष्य दुःखांत आणि अडचणींत घालवितात. आतां माझ्याविषयीं ह्मणशील, तर मी नेहमीं देवाजवळ आणि चांगल्या लोकांजवळ मात्र बोलतें, आणि माझ्या साहाय्यावांचून त्यांनां एकहि सत्कार्य करतां येत नाहीं. ते माझा अत्यंत गौरव करून मला सर्वांहून अधिक मान देतात, व मी त्यांच्या मानाला पात्रच आहें. कारागिरांची आवडती सखी, कुटुंबवाहकाच्या विश्वासाची जागा, नोकरलोकांची दयाळू साहाय्यकर्ती, शांततेंतील कलांची उपयोगी सहगामिनी, युद्धप्रसंगींच्या श्रमांचें खात्रीनें शमन करणारी आणि उत्तम प्रकारची मैत्री जोडून देणारी अशी मी आहें. माझे आनुयायी भूक लागल्यावर खात असल्यामुळें त्यांनीं जरी खाणेंपिणें मिळविण्याकारितां श्रम केले नसले, तरी त्यांत त्यांनां आनंद होतो. त्यांची झोंप आळशी आणि निरुद्योगी लोकांपेक्षां गोड होऊन एकदां जागें झाल्यावर पुनः ती त्यांनां घेरीत नाहीं, किंवा आपल्याकरितां आयुष्यांतील इतर कृत्यांस फांटा देण्याला

लावीत नाहीं. माझ्या तरुण अनुयायांनां वृद्धांची शाबासकी मिळून मोठा आनंद होतो, आणि वृद्धांनां तरुणांकडून योग्य मान मिळाल्यानें तेहि खुष होतात. वयातीत लोक आपल्या तरुणवयांतील कृत्यांकडे मोठ्या समाधानानें पाहतात, आणि ज्ञातारपणचीं कामें करण्यांत मोठा आनंद मानतात. माझ्या भक्तांवर ईश्वर कृपा करितो, त्यांचे मित्र त्यांच्यावर प्रेम करितात, आणि त्यांचे देशबांधव त्यांनां मान देतात. आयुष्य संपलें ह्मणजे त्याबरोबरच नांवहि संपावयाचें, अशी स्थिति न होतां त्यांच्या मरणानंतर कित्येक पिढ्या लोक त्यांची स्तुति गात असतात. हे पवित्र कुलांत जन्मलेल्या हर्क्युलिसा! जर तूं प्रामाणिकपणानें श्रम आणि उद्योग केलास, तर तुला याप्रमाणें प्रत्येकाला हवी असणारी अशी ही पूर्ण सुखाची स्थिति प्राप्त होईल."

# मातापितरांचा मान.

एके दिवशीं साक्रेटिसाचा वडील मुलगा आपल्या आईवर अतिशय रागावला असतां साक्रेटीस त्याला ह्मणाला "मुला, इकडे ये. तूं कधीं कृतघ्न माणसाच्या गोष्टी ऐकल्या आहेस काय?"

मुलानें उत्तर केलें "होय, अनेक वेळां."

साक्रेटीस ह्मणाला "बरें, त्यांनां कृतघ्न कां ह्मणतात, हें तुला सांगतां येईल?"

त्या तरुण मनुष्यानें उत्तर केलें "लोकांनीं त्यांजवर केलेले उपकार तो प्रसंग आला असतांहि फेडीत नाहींत ह्मणून."

साक्रेटीस ह्मणाला "तर मग कृतघ्नता ह्मणजे एक प्रकारचा अन्याय होय, असें ह्मणण्याला कांहीं हरकत आहे का?"

मुलगा ह्मणाला "नाहीं."

साक्रेटीस ह्मणाला "हा अन्याय कोणत्या प्रकारचा आहे याचा तूं कधीं विचार केला आहेस काय?"

"आपल्या मित्रांनां वाईट रीतीनें वागविणें हा अन्याय, आणि त्याच्या उलट आपल्या शत्रूंनां त्यांच्या वर्तनाबद्दल शासन करणें हा न्याय."

"या न्यायानें पाहूं गेलें असतां आपल्या मित्रांशीं कृतघ्नतेनें वागणें ह्मणजे अन्याय, आणि शत्रूशीं तसें वागणें ह्मणजे न्याय, असें ह्मटलें पाहिजे."

यावर मुलगा ह्मणाला "पूर्ण विचाराअंतीं मला असें वाटतें, कीं, दोघांपैकीं कोणाशींहि अन्यायाचें वर्तन करणें ह्मणजे गुन्हाच आहे."

यावर साक्रेटीस ह्मणाला, "आतां कृतघ्नता हा जर अन्याय आहे, तर ज्या मानानें आपणावरील उपकार मोठा असेल त्या मानानें तो न स्मरण्याचें पातकहि मोठें होईल."

त्याच्या मुलानें हें कबूल केल्यावर साक्रेटीस ह्मणाला "आइ-बापांकडून मुलांवर जे उपकार झालेले असतात त्यापेक्षां महत्त्वाचे दुसरे उपकार असण्याचा संभव तरी आहे का? मुलांनां आधीं जन्म मिळतो तो आईबापांपासून. सृष्टींतील अनेक चमत्कार पहाण्याला आणि ईश्वरानें दयाळू होऊन आपणापुढें मांडलेल्या अनेक सुंदर, मनोवेधक आणि ज्यांनां सोडणें फार भयंकर वाटतें अशा वस्तूंचा उपभोग घेण्याला तींच त्याला शिकवितात. मनुष्याला हें जग सोडून जाणें फार भयंकर वाटतें ह्मणूनच सरकारानें तरी अत्यंत मोठ्या गुन्ह्याला मरणाची शिक्षा ठेविली आहे. मनुष्यजाती कायम रहावी ह्मणून स्त्रीपुरुषांच्या ठिकाणीं जी अभिलाषवृत्ति ईश्वरानें उत्पन्न केली आहे, तिची तृप्ति करणें हा कांहीं लग्न करण्याचा मुख्य हेतु नव्हे. त्या वासनेची तृप्ति थोड्या खर्चांत अगदीं गल्लोगल्लीं होण्यासारखी असते. लग्नाचा मुख्य हेतु आपली संसारयात्रा सुखाची होऊन आपली संतति निरोगी, सुरूप आणि सुशील व्हावी असा असतो, आणि याला अनुसरूनच आपण आपल्याकरितां सद्गुणी आणि सुंदर पत्नीची निवड करितों. लग्न झाल्यानंतर आपल्या स्त्रीचें चांगल्या रीतीनें पालन करून मुलांनां लागतील त्या अवश्य वस्तु शक्तिनुसार पुरविणें हें प्रत्येक गृहस्थाचें, आणि गरोदरावस्थेंत आपल्या गर्भस्थ मुलाचें रक्षण करण्याकरितां त्रास सोसून काळजी घेणें हें त्याच्या पत्नीचें, मुख्य कर्तव्य आहे. या वेळीं ती आपल्या भावी बालकाला आपल्या अन्नाचा आणि आयुष्याचा कांहीं अंश देत असते. बाळंत होतेवेळीं तिला अतिशय

भयंकर अशा प्रसववेदना सोसाव्या लागतात. पुढें ती त्याला आपल्या अंगावर पाजते आणि त्याची काळजी घेऊन त्यावर प्रीति करते. आणि हें सर्व, ज्याला उपकर्त्रीचें ज्ञान मुळींच नसून आपल्या गरजा मुळींच कळत नाहींत, अशा अर्भकाकरितां असतें! आपल्या श्रमांबद्दल आपणांला किंचित् तरी मोबदला मिळेल अशी मुळींच आशा नसतां, मोठ्या ममतेनें मुलाच्या सुखाकरितां आणि कल्याणाकरितां ती आपला सर्व वेळ खर्च करीत असते. यानंतर मुलें शिकण्यायोग्य झालीं ह्मणजे बाप आपले अकलेप्रमाणें त्यांनां चांगलें शिक्षण देऊन, पुढें खर्चाकडे विशेष लक्ष्य न देतां आपणापेक्षां हुषार अशा एखाद्या शिक्षकाकडे त्यांनां पाठवितो, आणि त्यांच्या वर्तनावरून आपलीं मुलें सद्गुणी आणि प्रामाणिक झालेलीं पहाण्यांत त्याला महदानंद होतो."

यावर लॅम्प्राक्लेस (तो मुलगा) ह्मणाला "या सर्व, किंबहुना याच्या शतपट गोष्टी जरी माझ्या आईनें केल्या असल्या, तरी तिचीं तीं दुर्भाषणें कोणीहि मनुष्य सहन करणार नाहीं!"

यावर साक्रेटिसानें त्याला विचारलें "पशूचा राग आईच्या रागापेक्षां सहन करण्याला कठिण नाहीं का?"

मुलगा ह्मणाला "असल्या आईच्या रागापेक्षां खास नाहीं!"

साक्रेटीस ह्मणाला "असें विलक्षण तें तिनें काय केलें? पशु रागावले ह्मणजे जसे चावतात किंवा लाथा मारतात तसें कांहीं तिनें तुला केलें काय?"

लॅम्प्राक्लेसनें उत्तर दिलें "तिचें तोंड असें कांहीं विलक्षण आहे, कीं, तें कोणाच्यानेंहि धरवणार नाहीं."

साक्रेटिसानें उत्तर केलें "तूं लहान असतां रडूनओरडून आणि भलभलते हट्ट धरून तिला किती तरी त्रास दिला आहेस! रात्रींचीं

तिला किती जागरणें पाडिलीं आहेस! दिवसा तिला कसें भंडावलें आहेस आणि तुझें दुखणें काढतांना तिला किती दुःखें भोगावीं लागलीं आहेत बरें?"

लॅम्प्राक्लेस ह्मणाला "तें कसेंहि असलें, तरी माझ्या करण्यानें किंवा बोलण्यानें तिला कधीं मान खालीं घालण्याचा प्रसंग खास आला नाहीं."

साक्रेटीस ह्मणाला "प्रहसनांतील पात्रें रंगभूमीवर एकमेकांनां वाटेल त्या निंदक शब्दांनीं बोलतात. तीं बोलणीं सहन करण्यांत त्यांनां जड जात नसून तुला तुझ्या आईचे रागाचे चार शब्द सोसणें इतकें जड जातें ना? याला काय ह्मणावें! आपण एकमेकांनां वाईट बोलतों तें कोणाच्या मनाला लागावें ह्मणून, किंवा एकमेकांनां भीति दाखवितों ती कोणाला इजा व्हावी ह्मणून नाहीं, हें त्या नटाला पूर्णपणें माहीत असतें. त्याप्रमाणेंच आपल्या आईच्या हेतूंची पूर्ण ओळख असतां, आणि ती जे कडक शब्द बोलते त्यांची उत्पत्ति द्वेषापासून नसून उलट प्रेमापासून आहे हें तुला पक्कें ठाऊक असतां तूं तिच्यावर कसा रागावतोस? तिच्या मनांत तुझें नुकसान व्हावेंसें आहे अशी, का तुझी कल्पना आहे?"

लॅम्प्राक्लेस ह्मणाला "छे! छे! बिलकुल नाहीं. अशी कल्पना माझ्या मनांत कधींच आली नाहीं."

साक्रेटीस ह्मणाला "अरे, जी तुझ्यावर प्रीति करते, जी तुझ्या आजारीपणांत तुझी प्रकृति सुधारावी ह्मणून जिवापाड मेहनत करते, जी तुला कसलीहि उणीव पडूं नये ह्मणून सतत काळजी घेते, जी तुझ्याकरितां देवाला शेंकडों नवस करते, त्या तुझ्या आईला तूं वाईट ह्मणतोस! खरोखर तिला सोडून रहाणें ह्मणजे सुखाची व आपली जन्माची फारकत करून घेणें होय. दुसऱ्या कोणाविषयीं

आपल्या मनांत पूज्यबुद्धि असावी असें तुला वाटतें का? अथवा कोणाच्या मर्जीची किंवा सदिच्छेची तुला मुळींच पर्वा नाहीं?"

लॅम्प्राक्लेस ह्मणाला "छे! छे! मी तर याच्या उलट सर्वांची मर्जी संपादन करण्याविषयीं अगदीं तत्पर असतों."

साक्रेटीस ह्मणाला "तुझ्या शेजाऱ्यानें तुला उसनेपासनें द्यावें, किंवा संकटसमयीं तुला मदत करावी, इतक्याकारितां कदाचित् तूं त्याची मर्जी संपादन करशील; परतु आपल्या प्रवासांतील सोबत्याच्या मैत्रीसंबंधानें अगदींच बेफिकीर रहाणें तुला बरें वाटेल काय?"

"मुळींच नाहीं!"

साक्रेटीस ह्मणाला "तर मग, त्याच्या मर्जीकारितां इतकी खटपट करून, यांच्या सहस्रपट जिचे उपकार, तिच्या कृपेकारितां कांहींच न करण्याइतका का तूं नीच आहेस? आपल्या राज्यांत साधारण कृतघ्नतेकडे दुर्लक्ष्य करून झालेल्या सत्काराची फेड न करणारांस कोणी शासन करीत नाहींत; परंतु आईबापांची अमर्यादा करणाऱ्या कृतघ्नाला कायद्यानें हद्दपार करण्याची आणि हुद्याच्या जागेला अपात्र ठरविण्याची शिक्षा ठेविली आहे, हें तुला ठाऊक आहेना? आपल्यांत अशी एक सर्वमान्य ह्मण होऊन बसली आहे, कीं, अपवित्र हस्तांनीं दिलेल्या आहुतींचें देवता ग्रहण करीत नाहींत, आणि त्यापासून देशाचें कांहीं कल्याण होत नाहीं. असला मनुष्य एकादें मोठें आणि योग्य काम करील, किंवा सद्गुणी न्यायाधिशाचें कर्तव्य त्याच्या हातून बजाविलें जाईल, असें कोणालाहि वाटत नाहीं. आईबापांच्या मरणानंतर त्यांच्या क्रिया चांगल्या रीतीनें न करणारांनाहि हीच शिक्षा ठरविली आहे, व या सर्व गोष्टींची चौकशी विशेषतः मंडळी नोकरीकारितां अर्ज घेऊन गेली असतां होते. ह्मणून माझ्या मुला, तूं जर शहाणा असशील, आणि देवांनीं न रागावतां तुजवर कृपा

करावी असें तुला वाटत असेल, तर आजपर्यंत तूं आपल्या आईचे जे अपराध केले असशील ते क्षमा करण्याबद्दल ईश्वराची प्रार्थना कर. तसेंच तूं आपल्या आईविषयीं आजपर्यंत दाखविलेला तिरस्कार उघडकीला येऊन लोकांनीं दोष देऊन तुला झिडकारूं नये म्हणून तो झांकण्याचा प्रयत्न कर. कारण, तूं आईबापांनींहि तुजवर केलेले उपकार स्मरत नाहींस असा संशय आला असतां, लोक, आपण केलेले उपकार तर हा मुळींच स्मरणार नाहीं, असें समजतील!"

# दोघां भावांचें सख्य.

चेरिफान व चेरिक्रेटीस या नांवाच्या दोघां भावांत अतिशय वैर असून, ते दोघेहि साक्रेटिसाच्या चांगल्या ओळखीचे होते, त्यांच्यामध्यें सख्य करावें असा त्याचा फार दिवसांचा हेतु होता. एके दिवशीं चेरिक्रेटसची व साक्रेटिसाची गांठ पडली; तेव्हां ही संधि ठीक आहे असें पाहून साक्रेटीस त्याला ह्मणाला "आपल्याला भाऊ असण्यापेक्षां आपण श्रीमंत असणें चांगलें, असें का तुला वाटतें? संपत्ति निर्जीव असल्याकारणानें तिच्या रक्षणासाठीं आपल्याला मेहनत घ्यावी लागते; परंतु भाऊ हा आपला रक्षक आहे, हा विचार नाहीं का कधीं तुझ्या मनांत आला! अरे, दुनियेंतला सर्व पैसा आपल्या भावाजवळच असतो काय? त्याच्या मालमत्तेचा उपभोग त्यानें आपल्याला घेऊं दिला नाहीं ह्मणजे त्यानें आपला मोठा अपराध केला असें समजणें ही फाजील तृष्णा नव्हे काय? अरे, असेंच समजावयाचें असेल तर जगांतील सर्व लोक आपली मालमत्ता आह्मांला घेऊं देत नाहींत ह्मणून ते सर्वच आमचा मोठा गुन्हा करितात, असेंच कां समजूं नये? परंतु असें कोणी समजत नाहींत. त्यांना शेजाऱ्यापाजाऱ्यांचें असेल नसेल तेवढें आपल्या घरांत भरून एकलकोंडे रहाणें, कांहीं नियमित संपत्तीचे मालक होऊन समाजांत संगतिसुखाचा अनुभव घेत रहाण्यापेक्षां जास्त धोक्याचें आहे, असें वाटतें; परंतु भावाच्या संपत्तीविषयीं हा विचार यांच्या मनांत येत नाहीं. ते श्रीमंत असले, तर आपली चाकरी करण्याकरितां गुलाम विकत घेतात; प्रसंगीं सहाय्य व्हावें ह्मणून पुष्कळांची मैत्री संपादन करितात; परंतु भावाची मात्र हेळसांड! जणूं काय मैत्री संपादन करण्यास भाऊ नालायक आहेत. खरें ह्मटलें

असतां एका आईबापांपासून उत्पन्न होणें, आणि त्यांच्या नजरेखालीं लहानाचें मोठें होणें, या गोष्टींची मैत्री उत्पन्न होऊन ती दृढ होण्यास चांगलाच उपयोग झाला पाहिजे. एका गोठ्यांत वाढणाऱ्या जनावरांचा देखील एकमेकांकडे ओढा असतो; मग बुद्धिवान् मनुष्य-प्राण्याचा कां राहूं नये? शिवाय, जुटीनें रहाणारे भाऊ असले म्हणजे त्यांच्या वाटेला बहुशा कोणी जात नाहीं हें आपल्याला ठाऊक आहे."

यावर चेरिक्रेटस म्हणाला "चांगला भाऊ हा सुखाचा ठेवा आहे, हें तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे. भावांनीं एकमेकांचें अपराध पोटांत घालून कांहीं तसें मोठें कारण झाल्याशिवाय यःकश्चित् गोष्टीवरून उगाच एकमेकांशीं वैर धरणें हें मलाहि पसंत नाहीं; परंतु एक भाऊ अगदीं कर्तव्याला मुकून विरुद्ध दिशेचें वर्तन करूं लागला, तरी देखील दुसऱ्यानें त्याशीं प्रेमानें वागावें, असें कधींच होणार नाहीं."

साक्रेटीस म्हणाला "तुझा भाऊ जसा तुझ्याशीं तसा सगळ्या जगाशीं वांकड्या रीतीनेंच वागतो का? सगळें जग त्याला दोष देत आहे का?"

चेरिक्रेटस म्हणाला "त्याबद्दलच तर त्याचा मला मोठा राग येतो! अहो, तो सगळ्या दुनियेची मैत्री संपादन करील आणि सगळ्यांला तो गोड. पण त्याची आणि माझी गांठ पडली पुरे, कीं, त्याचें पित्त खवळून तो भांडावयाला उठलाच म्हणून समजा!"

साक्रेटीस यावर म्हणाला "मी तरी हेंच म्हणतों. अरे, एकाद्याला घोडा पाळण्याची मोठी हौस, पण त्याला वागवावा कसा, हें माहीत नाहीं. असें असलें आणि त्यानें तो पाळला, तर त्याला त्यापासून कांहीं सुख होईल का! तसेंच भावाशीं कसें वागावें हें माहीत नसल्यावर त्याच्यापासून दुःख झाल्यावांचून राहील का?"

चेरिक्रेटस ह्मणाला " अहो, तो आपल्या शब्दांत आणि कृतींत मजविषयीं जितकें प्रेम आणि आदर दाखवितो तितकाच मीहि त्याजविषयीं दाखवीत असतों. असें असतां मला माझ्या भावाशीं कसें वागावें हें ठाऊक नाहीं अशी कल्पनाच आधीं तुह्मी कां करितां? जो मनुष्य मजजवळ कृतघ्नपणानें वागतो त्याजविषयीं देखील मीं मोठी चांगली बुद्धि दाखवावी असें का तुह्मांला वाटतें? असें मात्र मी कधींहि करणार नाहीं!"

साक्रेटीस ह्मणाला " तुझ्या या बोलण्याचें मला मोठें आश्चर्य वाटतें. समज, कीं तुझा मेंढरें राखणारा एक कुत्रा आहे. तो तुझ्या चाकरमाणसांनां पाहून लडिवाळपणानें शेपटी हालवितो आणि तुझ्या मात्र अंगावर रागानें गुरगुरतो. आतां मला सांग, कीं, तूं त्याला रागावशील किंवा तुला त्यानें ओळखावें ह्मणून कांहीं प्रयत्न करशील? चांगला भाऊ हा सुखाचा ठेवा आहे. तसेंच परोपकार ह्मणजे काय, आणि तो कसा करतात, हें तुला ठाऊक आहे असें तूं ह्मणतोस; परंतु चेरिफानशीं सख्य करून त्याचा अनुभव तूं आह्मांला दाखवीत नाहींस!"

चेरिक्रेटस ह्मणाला " तुह्मी ह्मणतां तशी अक्कल माझ्यांत नसेल."

साक्रेटीस ह्मणाला " त्याला कांहीं विशेष अक्कल नको आहे! त्यानें तुझें कल्याण चिंतावें आणि तुला योग्य मान द्यावा, असें त्याचें मन बनवण्याला तुझी आहे ती अक्कल अगदीं पुरेशी आहे."

चेरिक्रेटस ह्मणाला "लोकांनां मी आवडता होईन अशी कांहीं युक्ति तुमच्याजवळ असली तर तेवढी ताबडतोब सांगा. कारण, यापूर्वी ती माझ्या ध्यानांत कधींच आली नाहीं."

साक्रेटीस ह्मणाला "मला आधीं हें सांग, कीं, तुझ्या एकाद्या मित्रानें त्याच्या घरीं कांहीं हव्यकव्य झालें असतां तुला निमंत्रण द्यावें, अशी तुझी इच्छा असल्यास तूं काय करशील?"

चेरिक्रेटस ह्मणाला "त्याला आधीं आपणाकडे बोलावूं लागेन."

साक्रेटीस ह्मणाला "बरें, तूं प्रवासांत असतां एकाद्यानें तुझ्या घरची व्यवस्था पहावी अशी तुझी इच्छा असली, तर तूं काय करशील?"

"तो प्रवासांत असतां आधीं मी त्याच्या घरची व्यवस्था पाहूं लागेन."

"बरें, परक्या ठिकाणीं एकाद्यानें तुझें स्वागत करावें असें तुला वाटत असल्यास तूं काय करशील?"

"तो आमच्या गांवीं आला असतां प्रथम मीं त्याचें आदरातिथ्य करीन, व पुढें माझ्या कामांत त्यानें मदत करावी ह्मणून मीं त्याच्या कामांत त्याला साहाय्य करीन."

साक्रेटीस ह्मणाला "तुला स्वतःच्या कल्याणाच्या इतक्या गोष्टी माहीत असतां त्यांचा उपयोग तूं करूं नयेस, हें मोठें आश्चर्य आहे! तसें करण्याला तुझ्या मनांत शंका कां येते? आपल्या भावाशीं प्रथम तूं ममतेनें वागूं लागलास, तर लोक तुला हलक्या मनाचा, खुशामती ह्मणून नांवें ठेवतील त्याची का तुला भीति वाटते! मित्रा, माझ्यावर जर तुझा भरंवसा असेल, तर मी सांगतों, कीं, असें कधींहि होणार नाहीं! इतकेंच नव्हे, तर आपण आपल्या मित्रांनां ममतेच्या योगानें वाईट गोष्टींपासून दूर करणें हें मोठ्या थोरपणाचें कृत्य आहे असें मी समजतों. तुह्मांमध्यें सख्य करण्याची सूचना तुझ्यापेक्षा चेरिफानला करणें जर मला योग्य दिसतें, तर मीं त्याजकडून तुझें मन वळविण्याचा प्रयत्न केला असता; परंतु तसें करण्याला तूंच मला जास्त योग्य दिसलास, आणि माझी पक्की खात्री आहे, कीं, तूं हें काम त्याच्यापेक्षां लवकर करशील!"

चेरिक्रेटस ह्मणाला "तुमचें हें बोलणें तुह्माला शोभत नाहीं. तें अगदीं चुकीचें आहे. मी धाकटा भाऊ असून मला तुह्मी आरंभ करण्याला सांगतां? कोणत्याहि गोष्टीला आरंभ करण्याचा मान सर्व राष्ट्रांनीं थोरल्या भावाकरितां राखून ठेविला आहे, हें तुह्मी विसरलां वाटतें?"

साक्रेटीस ह्मणाला "अरे, धाकट्यानें थोरल्याला मान द्यावा, तो आला असतां त्याला ताजीम द्यावी, त्याला चांगली जागा द्यावी, आणि आपण मौनव्रत धरून त्याला बोलूं द्यावें, हें खरेंना? तर मग मी ह्मणतों तसें तावडतोब कर जा, आणि आपल्या भावाला शांत करण्याचा प्रयत्न कर, कीं, त्यानें तुला दोन्ही बाहू उचलून आलिंगन दिलेंच ह्मणून समज! त्याचा स्वभाव मानी आणि उदार आहे, तेव्हां तो असें करणारच! कारण, जसे गरीब भिकाऱ्यांकडून नांव मिळविण्याला औदार्यासारखा दुसरा मार्ग नाहीं, तसा सन्मान आणि प्रेम दाखविल्यावांचून मानी मनुष्याकडून वाहवाहि मिळत नाहीं!"

चेरिक्रेटस ह्मणाला "तुमच्या ह्मणण्याप्रमाणें मी वागलों आणि त्याच्या स्वभावांत अंतर पडलें नाहीं, तर कसें?"

साक्रेटीस ह्मणाला "त्यांत तुझें काय नुकसान आहे? तुझ्या या वर्तनामुळें तुझा चांगुलपणा आणि तुझें त्याजवरील प्रेम, तसेंच त्याचा वाईट स्वभाव आणि उपकाराला अपात्रता, मात्र लोकांनां दिसून येईल; परंतु मला वाटतें, असें होणारच नाहीं! तूं त्याच्याशीं चांगल्या रीतीनें वागतोस व त्याजवर उपकार करतोस असें जर त्याला कळलें, तर तो या कामांत तुझा पाडाव करण्याची इच्छा धरील! तुमची सध्याची स्थिति फारच वाईट आहे. परमेश्वरानें जे हात एकमेकांनां मदत करण्याकारितां दिले आहेत त्यांचा उपयोग एकमेकांनां मारण्याकडे करावा, किंवा दयाळु ईश्वरानें जे पाय

एकमेकांच्या साहाय्यार्थ धांवण्यासाठीं दिले आहेत त्यांचा उपयोग एकमेकांचा गति कुंठविण्याकडे करावा, तसें तुमचें झालें आहे! जें आपल्या हिताकरितां दिलें आहे तें नुकसान करण्याकडे लावणें, ह्मणजे अज्ञान आणि दुर्दैव नाहीं काय? ईश्वर आपल्याला बंधु देतो तो आपल्या कल्याणाकरितां देतो, यांत कांहीं शंका नाहीं. तसेंच दोन हात, दोन पाय, दोन डोळे वगैरे आपणाला असणाऱ्या कोणत्याहि इंद्रियांच्या जोडीपेक्षां भावांची जोडी एकमेकांच्या जास्त उपयोगाची आहे. कारण, अनेक वांव अंतरावरील दोन वस्तूंना हातांच्यानें एकदम स्पर्श करवणार नाहीं; पायांच्यानें एकदम त्यांजकडे जाववणार नाहीं. तसेंच दूरवर नजर पोंचविणाऱ्या डोळयाला एकाच वस्तूचा पुढचामागचा भाग एकदम पाहतां येणार नाहीं. परंतु जे दोघे बंधु मित्रत्वानें राहतात, त्यांच्यामध्यें कितीहि अंतर असलें तरी ते एकमेकांच्या उपयोगी पडल्यावांचून रहाणार नाहींत."

# मित्रत्व.

आपण मित्र मिळवावे कसे व राखावे कसे यासंबंधानें साक्रेटिसाचा महत्त्वाचा संवाद पुढीलप्रमाणें आहे. साक्रेटीस एकदां ह्मणाला "मित्र हा एक अत्यंत मोलवान् खजिना आहे, ही गोष्ट सर्व लोक कबूल करितात; परंतु असें असूनहि तो मिळविण्याकरितां अल्पहि श्रम कोणीच घेत नाहीं. आपण आपल्याकरितां घरदार, जमीन-जुमला, चाकरमाणसें, गुरेंढोरें आणि दुसरें पुष्कळ सामान खरेदी करण्याची खबरदारी घेतों, आणि नंतर त्यांना मोठ्या मेहनतीनें जपतों. मित्र हा वरील कोणत्याहि गोष्टीपेक्षां जास्त सुखकर असतां आमच्यापैकीं कितीजण तो मिळविण्याची, आणि मिळाला असतां त्याची मैत्री राखण्याची खटपट करतात बरें? अहो, हें राहोच, पण कांहीं तर इतके मूर्ख आहेत, कीं ते आपल्या मित्रांपेक्षां गुलामांचीच जास्त काळजी घेतात. असें नसतें तर मित्र व गुलाम एकाच अवस्थेंत असतां, ह्मणजे ते दोघेहि कांहीं संकटांत असतां किंवा आजारी असतां, मित्राबद्दल त्यांची निःकाळजी, व गुलामाबद्दल विशेष काळजी कां बरें दिसून आली असती? काळाच्या तडाक्यांत सांपडून दोन्ही मेले तर मित्रापेक्षां गुलामांच्या मरणाचें दुःख त्यांना विशेष! आणि त्यांच्याच थडग्यावर ते जास्त अश्रु ढाळतात. कारण त्याकरितां रकम खर्च झालेली असते! मित्रां-वांचून सर्व बारीकसारीक गोष्टींची—ज्याच्याबद्दल काळजी करण्याचें मुळींच कारण नाहीं अशा गोष्टींची देखील ते फार लक्ष्य लावून काळजी घेतात. परंतु मित्राची काळजी घेण्याची आवश्यकता असतांहि ते त्याजकडे लक्ष्य देत नाहींत. सारांश, त्यांच्या ताब्यांतील हजारों गोष्टींची अगदीं नांवनिशीवार यादी ते देतील, परंतु त्यांच्या

अगदीं थोड्या मित्रांची संख्या देखील त्यांनां पुरेशी माहीत नसते. ‘ तुमच्या मित्रांचीं नांवें सांगा ’ असें जर त्यांनां कोणीं विचारलें तर ते लागलेच घोंटाळतात, इतकें त्यांचें मित्रांकडे दुर्लक्ष्य असतें. असें जरी आहे, तरी चांगल्या मित्रांची बरोबरी कशाच्यानेंहि होणार नाहीं. कोणताहि गुलाम आपली किंवा आपल्या हिताची इतकी काळजी घेणार नाहीं, आणि कोणताहि घोडा आपली एवढी कामगिरी बजाविणार नाहीं. सारांश, सर्व प्रसंगीं उपयोगीं पडणारा असा काय तो एकटा मित्रच! खरा मित्र आपल्या सर्व गरजा भागवून आपल्या हांकेला तयार असतो. तो आपलीं कामें करतो, इतकेंच नव्हे, तर दुसऱ्यांचीं कामें करण्याला तो आपणाला मदत करतो. म्हणजे कोणी आपणावर चाल करून आला असतां तो उड्या टाकीत येऊन आपणाला सोडवितो, किंवा आपल्या मनांत एकाद्याला मदत करण्याचें घोळत असतां तो आपल्याला तसें करण्याचा मार्ग दाखवितो. एकादे वेळीं तो आपणाला पैशाची मदत करितो; एकादे वेळीं तो आपणाला आपल्या बलाचें साहाय्य देतो, किंवा एकादे गोष्टीविषयीं तो आपलें मन वळवितो. केव्हां ती करण्याला तो आपणाला भाग पाडतो. आपल्याला वैभव आलें असतां आपल्या सुखाचा वांटेकरी होऊन तो आनंद पावतो, आणि आपल्या विपत्कालीं आपल्या दुःखाचा वांटेकरी होऊन तो तें दुःख कमी करतो. एका मित्राचा दुसऱ्याला जितका उपयोग होतो तितका कोणालाहि त्याच्या हात, पाय, कान, डोळे इत्यादि इंद्रियांपासूनहि होत नाहीं. आपल्या हिताहिताचा संबंध असतां आपण आपल्या फायद्याकरितांहि जी गोष्ट करीत नाहीं, ज्या कोणाची आपण गांठ घेत नाहीं, आणि जो विचार कधींच मनांत आणीत नाहीं, ती गोष्ट आपण आपल्या मित्राकरितां करतों. पुढें फळें मिळतील या आशेनें लहानशी

बाग लावण्याकरितां भिकार जमिनीवर खूप मेहनत करावयाची, आणि जी जमीन वैभवशाली व सुपीक आहे, जीमध्यें उत्तम तऱ्हेचीं सुंदर फळें मिळावयाची खात्री आहे त्या मैत्रीरूप जमिनीची लागवड करण्यांत मुळींच श्रम करावयाचे नाहींत, ह्मणजे केवढा मूर्खपणा !"

# मित्राची योग्यता आणि किंमत.

या संभाषणांत साक्रेटिस ह्मणतो "प्रत्येकानें आपली स्वतःची परीक्षा करून आपले मित्रांनीं आपणाला किती मान द्यावा हें ठरवावें."

एकानें आपल्या मित्राला दारिद्र्यावस्थेंत सोडिलें, तेव्हां त्याला मंडळीमध्यें गांठून साक्रेटिसानें असा प्रश्न पुढें आणिला "जशी आपण गुलामांची किंमत ठरवितों, तशी आपणांला मित्रांची किंमत ठरवितां येईल का? एका गुलामाची वीस पौंड किंमत होते, तर दुसऱ्याचे कोणी पांचहि पौंड देत नाहीं. एका प्रकारच्या गुलामास पन्नास पौंड पडतात, तर दुसऱ्याचे शंभरहि येतात. एकानें तर आपल्या रुप्याच्या खाणींची देखरेख करण्याकरितां एक गुलाम साडे सहाशें पौंडाला विकत घेतल्याचें मीं ऐकिलें आहे. तर अशा तऱ्हेनें मित्रांची किंमत कारितां येईल, असें तुह्मांला वाटतें का?"

यावर त्या मंडळींपैकीं एकानें उत्तर दिलें "होय, अशी किंमत ठरवितां येईल, असें मला वाटतें. कारण, असे कांहीं लोक आहेत कीं, ते जर मजवर प्रीति करतील तर मी पंचवीस पौंड मोठ्या खुषीनें खर्चीन; परंतु दुसऱ्याकरितां पांच पौंड खर्च करणेंहि मला जड वाटेल. शिवाय, कांहीं असेहि आहेत कीं, त्यांच्या प्रीतीकरितां मजपाशीं असेल नसेल तेवढें जरी मला खर्च करावें लागलें तरी कांहीं वाटणार नाहीं."

साक्रेटीस ह्मणाला "असें जर आहे, तर प्रत्येकानें आपले मित्र आपली काय किंमत करतील याचा विचार करून त्यांनीं आपणांला शेवटपर्यंत अंतर देऊं नये या उद्देशानें त्यांच्या उपयोगीं पडवेल तितकें पडण्याचा प्रयत्न करावा. एक ह्मणतो, माझ्या मित्रानें माझा गळा कापिला; आणि दुसरा ह्मणतो, ज्याच्यावर माझा पूर्ण

विश्वास त्यानें अगदीं थोड्या फायद्यासाठीं माझी मैत्री तोडली! अशा गोष्टीचा विचार करूं लागलें म्हणजे मला वाटतें कीं, जसें आपण आपल्या निरुपयोगी गुलामाला येईल ती किंमत देऊन विकून टाकितों, त्याप्रमाणेंच थोडासा फायदा होतो आहे असें वाटतांच मनुष्य आपल्या दुष्ट मित्राची संगती सोडितो. चांगल्या गुलामांनां कोणी दूर करीत नाहीं. तसेंच विश्वासु मित्रांचाहि कोणी कंटाळा करीत नाहीं."

# मित्रांची निवड.

साक्रेटिसाचें क्रिटोब्युलसबरोबर जें भाषण झालें त्यावरून मित्रांची परीक्षा कशी करावी, आणि कोणाशीं मैत्री करणें चांगलें, हें आपणास शिकतां येईल. साक्रेटिस त्याला ह्मणाला "मित्राची निवड करावयाची असतां आपण कोणती खबरदारी घेतली पाहिजे? चैनी, दारूबाज, व्यभिचारी, किंवा आळशी असा मनुष्य मित्रत्वाला योग्य आहे का? अशा दुर्गुणी माणसाचा त्याच्या मित्राला तर नाहींच, परंतु स्वतः त्याचा त्याला देखील उपयोग होत नाहीं. याकरितां हे दोष ज्यामध्यें नाहींत असा मनुष्य शोधून काढणें अवश्य नाहीं का?"

क्रिटोब्युलस ह्मणाला "तुमचें ह्मणणें अगदीं खरें आहे."

साक्रेटीस ह्मणाला "तर मग, जवळ कांहीं नसतां श्रीमंतीच्या थाटानें राहूं इच्छिणारा, आणि ह्मणूनच वारंवार आपल्या मित्राजवळ पैशाकरितां दांत विचकून आपण दिलेला पैसा अगदीं अनाठायीं गेला असें आपल्या कृतीनें त्याला दाखविणारा, आणि एकादी वेळ त्याची गरज न भागविल्यास विषाद मानणारा, असा कोणी मनुष्य आपणाला आढळला असतां तो मित्रत्वाला अगदीं नालायक आहे, असें नाहीं का तुला वाटत?"

क्रिटोब्युलस ह्मणाला "तुह्मी ह्मणतां त्याबद्दल मला मुळींच संशय वाटत नाहीं."

साक्रेटीस ह्मणाला "बरें, आदा पाहून खर्च करणारा, परंतु येईल तें घशांत उतरण्याविषयीं तत्पर राहून उलट देण्याची केव्हांहि इच्छा न करणारा, असा एकादा, कोणत्याहि प्रकारच्या व्यवहाराला अपात्र, लोभी मनुष्य आढळला, तर तो कसा काय?"

क्रिटोब्युलस ह्मणाला "हा तर पहिल्यापेक्षां कुचकामाचा!"

" बरें ज्याची श्रीमंत होण्याची इच्छा इतकी अनावर आहे, कीं, जो सदा मिळेल तितकें जमविण्यांतच गुंतलेला असतो, अशा मनुष्याची गांठ पडली तर?"

क्रिटोव्युलस ह्मणाला "अशा मनुष्याशीं तर संबंधच उपयोगी नाहीं। कारण, आपल्या हितापलीकडे त्याला कांहींच दिसत नाहीं."

साक्रेटीस पुढें ह्मणाला "ज्याला रोज नव्यानव्या कुरापती आणि भांडणें काढून आपल्या मित्रांनां त्यांत गोंवणेंच आवडतें, अशा भांडखोराबद्दल तुझें काय ह्मणणें आहे?"

क्रिटोव्युलस ह्मणाला "त्याची संगती कधींहि धरूं नये, असें माझें मत आहे."

साक्रेटीस ह्मणाला "बरें, आतां सांगितलेल्या दोषांपैकीं एकहि अंगीं नसतां ज्याला दुसऱ्याकडून उपकार करवून घेणें मात्र आवडतें, परंतु प्रत्युपकाराचें केव्हां नांवहि स्मरत नाहीं त्याजबद्दल तूं काय ह्मणतोस?"

क्रिटोव्युलस ह्मणाला "असा मनुष्य देखील उपयोगी नाहीं."

साक्रेटीस ह्मणाला "आतां इतक्या लोकांची मैत्री नाकारल्यावर सख्य करावें तरी कोणाशीं, हें सांगण्याचें कांहीं विशेष कारण आहे, असें मला वाटत नाहीं. मीं आतां ज्यांचें वर्णन केलें त्यापेक्षां निराळें वर्तन असेल तोच मनुष्य मैत्री संपादण्याला योग्य आहे. त्याच्या वर्तनांत नियमितपणा असावा, त्याच्या वचनांत सत्यता दिसून यावी, त्याचीं सर्व कृत्यें मोठ्या कळकळीनें व्हावीं, त्याला दुसऱ्याकडून फाजील उपकार करून घेण्यांत शरम वाटावी, आणि सर्वांस त्याच्याजवळ व्यवहार ठेवण्यांत भूषण वाटावें."

क्रिटोव्युलस ह्मणाला "परंतु हे सर्व गुण त्याच्या अंगीं आहेत किंवा नाहींत याविषयींची खात्री, त्याची परीक्षा पाहिल्यावांचून कशी होणार?"

साक्रेटिसानें यावर उत्तर दिलें "आपण मूर्तिकारांनीं घडलेल्या पुतळ्यांची परीक्षा करीत असतां, ते आपणा स्वतःविषयीं काय बोलतात इकडे लक्ष न देतां फक्त त्यांच्या कामाचाच विचार करितों, व ज्यानें पूर्वी चांगलें काम केलें असेल, तो पुढेंहि तसेंच करील, असें अनुमान काढतों. त्याप्रमाणेंच जो आपल्या जुन्या मित्रांच्या चांगल्या उपयोगी पडला असेल, तो आपल्या नवीन मित्रांच्याहि तसाच उपयोगी पडेल, यांत कांहीं शंका नाहीं. उत्तम घोडे शिकविणारा चाबूकस्वार आपलें काम चांगलेंच करील, असें मानण्याला काय हरकत आहे?"

क्रिटोब्युलस ह्मणाला "परंतु आपणाला पसंत पडेल असा मनुष्य भेटल्यावर त्याशीं मैत्री कशी करावयाची?"

साक्रेटीस ह्मणाला " प्रथम ही गोष्ट देवाला * आवडते कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे."

क्रिटोब्युलस ह्मणाला "समजा, देव आपल्या मैत्रीच्या आड येत नाहीं. तर आतां ही मोठ्या किंमतीची शिकार कशी साधावी?"

साक्रेटीस ह्मणाला " सशाच्या शिकारीप्रमाणें पाठलाग करून उपयोगी नाहीं; पक्षाच्या शिकारीप्रमाणें जाळें पसरून चालावयाचें नाहीं; किंवा शत्रूच्या शिकारीप्रमाणें जुलुमाचेंहि काम नाहीं. कारण, कोणाचीहि मैत्री त्याच्या इच्छेविरुद्ध संपादणें फार कठिण आहे. गुलामाला थांबवून त्याला जसें जबरीनें आपण कारागृहांत टाकतों,

---

* आपल्या इकडे अंगांत देव येऊन जसें कांहीं बरेंवाईट सांगतात, त्याप्रमाणें ग्रीस देशांत पूर्वी चार प्रसिद्ध ठिकाणें होतीं, त्यांना ओऱ्याकल्स असें ह्मणत. तेथें देवभक्तीण बसल्यानंतर कांहीं वेळानें देवता तिच्या अंगांत प्रवेश करून जमलेल्या मंडळीच्या प्रश्नांचीं उत्तरें कवितारूपानें देते, असा त्या वेळच्या लोकांचा समज होता.

तसें मित्राविषयीं केलें असतां तो आपल्यांवर प्रीति तर करणार नाहींच, पण उलट आपलें वाईट चिंतील."

क्रिटोब्युलस ह्मणाला " तर मग आपण करावें तरी काय ?"

साक्रेटिसानें उत्तर दिलें "कांहीं शब्दांचें सामर्थ्य असें आहे ह्मणतात, कीं, तें ज्यांनां ठाऊक आहे त्यांनीं त्यांचा उच्चार केला असतां लोक त्यावर प्रीति करूं लागतात. "

क्रिटोब्युलस ह्मणाला " ते आपणाला कोठें बरें शिकतां येतील ?"

साक्रेटिस ह्मणाला " तूं होमरच्या काव्यांतील

'थांब थांब बा युलिसेस हे ग्रीसदेश भूषणा ॥

या ओळीनें आरंभ झालेल्या कविता वाचल्या नाहींस का ?"

क्रिटोब्युलस ह्मणाला " तुह्मी ह्मणतां तें बरोबर आहे; परंतु लोक अशीच हांक मारून नेहमीं आपल्या ओळखीच्या मनुष्याला थांबवितात. "

साक्रेटीस ह्मणाला " छे ! छे ! तसें बिलकूल नाहीं; अशा शब्दांनीं फक्त सद्गुणावर प्रीति करणाऱ्या थोर लोकांचींच मनें वळविलीं पाहिजेत. "

क्रिटोब्युलस ह्मणाला " तुह्मी काय ह्मणतां तें आतां माझ्या लक्ष्यांत आलें. तुमचा हा एकाद्याचें मन आपणाकडे वळवून आपल्या अगदीं स्वाधीन करून घेण्याचा मोठा सामर्थ्यवान मंत्र,ह्मणजे स्तुतिपलीकडे कांहीं नाहीं ! तुमचें ह्मणणें असें, कीं, आपण कोणाचीहि स्तुति अशी करावी, कीं,त्याला आपण त्याची थट्टा करतों असें वाटूं नये. तसें झालें असतां तो आपणावर प्रीति न करतां उलट आपला द्वेष मात्र करूं लागेल.कारण,एकाद्या अशक्त आणि खुजा माणसाच्या सौंदर्याची आणि बांधेसुदपणाची तारीफ करून त्याला तुह्मी चांगलें-

मजबूत आहां असें कोणीं ह्मटलें तर तें त्याला सहन होणार नाहीं. बरें, तुह्माला या तऱ्हेचे आणखी कांहीं मंत्र ठाऊक आहेत का?"

साक्रेटीस ह्मणाला "नाहीं."

क्रिटोब्युलस ह्मणाला "मीं असें ऐकिलें आहे कीं, पेरिक्लिसाला असले मंत्र पुष्कळ ठाऊक होते, आणि त्यामुळेंच त्यानें सर्व राष्ट्राचें मन वळवून त्यांच्याकडून वाहवा मिळविली. बरें, थेमिस्टॉक्लसानें तरी लोकमान्य होण्याला काय केलें?"

साक्रेटीस ह्मणाला "त्याचे मंत्र ह्मणजे त्यांनी बजावलेल्या देशाच्या मोठमोठ्या कामगिऱ्याच होत."

क्रिटोब्युलस ह्मणाला "यावरून असें ह्मणण्याला हरकत नाहीं, कीं, मोठ्या लोकांची मैत्री संपादन करावयाची असल्यास मोठमोठीं कृत्यें करण्याला शिकलें पाहिजे."

साक्रेटीस ह्मणाला "एकहि गुण अंगांत नसतां कोणालाहि चांगल्या लोकांच्या संगतीचा लाभ मिळेल, असें तुला वाटतें का?"

क्रिटोब्युलस ह्मणाला "कां नाहीं वाटणार बरें! अहो मीं सुप्रसिद्ध वक्त्यांनां, सभेमध्यें ज्यांच्या तोंडांतून शब्द निघण्याची मारामार अशांवर प्रीति करतांना पाहिलें आहे. आणि मोठमोठ्या शूर-सेनाध्यक्षांनां, लढाईसंबंधानें काडीचीहि अक्कल नसणारांशीं मोठ्या प्रेमानें वागतांना पाहिलें आहे."

साक्रेटीस ह्मणाला "परंतु आपला मुद्दा हा नव्हे. मी ह्मणतों, कीं, ज्यांच्या अंगीं कोणत्याहि प्रकारचा गुण नाहीं, अशा मनुष्याला चांगला मित्र मिळाल्याचें तूं कधीं पाहिलें आहेस काय?"

क्रिटोब्युलस ह्मणाला "नाहीं. असें उदाहरण कांहीं माझ्या पाहण्यांत आलें नाहीं; पण मी आतां असें विचारतों, कीं, जरी कवडीमोल माणसाला सदाचारी आणि गुणी माणसाच्या संगतीचा

लाभ होणें शक्य नाहीं, तरी जो मनुष्य सद्गुणी आणि थोर मनाचा असतो त्याची व त्याच्यासारख्या दुसऱ्या सर्व लोकांची मैत्री जुळतेच, असें तुह्मी सांगूं शकाल का?"

साक्रेटीस ह्मणाला "ज्यांना लौकिकाची सारखी चाड आहे, आणि जें नीच कृत्य करण्यापेक्षां मरणच चांगलें असें समजतात, त्या लोकांमध्यें पुष्कळ प्रसंगीं मैत्री न राहतां ते एकमेकांशीं तंटे करतात, आणि त्यांचें भांडण मिटविणें, हलकट लोकांतील भांडण मिटविण्यापेक्षांहि फार कठीण असतें. या गोष्टी तूं पाहिल्या असशील, आणि त्याच धोरणावर तूं हा प्रश्न विचारला आहेस, असें मला वाटतें."

क्रिटोब्युलस ह्मणाला "अशी गोष्ट तुमच्याआमच्यांत होती, तर कांहीं मोठी पंचाईत नाहीं. परंतु जीं दोन राष्ट्रें सद्गुणांला चाहणारीं, आणि दुर्गुणांचा तिरस्कार करणारीं असतात, त्यांच्यामध्यें असे तंटे उत्पन्न होतात, आणि मग त्यांचा निकाल भयंकर लढायांवांचून लागत नाहीं, हें मोठेंच दुर्दैव समजावयाचें. असले विचार मनांत घोळूं लागले ह्मणजे मैत्री संपादन करण्याकरितां कोठें जावें आणि काय करावें, हें कांहींच कळत नाहींसें होतें. कारण, दोघां हलकट मनुष्यांमध्यें खरें मित्रत्व कधींच होणें नाहीं. कृतघ्न, आळशी, लोभी, गळेकापू आणि व्यसनाधीन लोकांमध्यें कधीं खरी आणि चिरकाळ टिकणारी मैत्री होईल का? मला नाहीं वाटत, होईलशी. कारण, अशा तऱ्हेचे लोक आपल्या दुराचारांच्या भयंकर परिणामामुळें तेव्हांच एकमेकांच्या द्वेषाला कारण होतात, आणि परस्परांचीं उणीं काढून एकमेकांचा तिरस्कार करूं लागतात. तसेच सद्गुणी मनुष्य आणि त्याच्या उलट स्वभावाचा मनुष्य या दोघांमध्यें मैत्री जमणें तर किती कठीण आहे, हें तुह्मी चांगल्या रीतीनें

सिद्ध करून दाखविलेंच आहे. अहो ठीकच आहे. गुन्हे करणारांचें त्यांचा तिटकारा करणाराबरोबर सख्य व्हावें कसें ? परंतु साक्रेटीस बुवा, मला विशेष आश्चर्य वाटतें तें हेंच कीं, एकादी हुद्याची व कमाईची जागा मिळविण्याकरतां, चांगलीं माणसें देखील एक-मेकांनां त्रास देऊन, एकमेकांचा पाडाव करून, नाश करण्याकरितां त्यांच्यानें होईल तितका प्रयत्न करीत असतात. मैत्रीसंबंधानें विचार केला असतां असें कां व्हावें, तें कळत नाहीं. त्याप्रमाणेंच स्वहितपरायणतारूपी नीच कुठारप्रहारांनीं, मनोद्यानांतील सुंदर प्रीतीवृक्षाचीं, अनेक प्रसंगीं पार तोडून टाकलेलीं पाळेंमुळें पाहून, या जगांत खरी मैत्री कांहीं आहे किंवा नाहीं याविषयींच शंका उत्पन्न होते."

साक्रेटीस ह्मणाला "मित्रा, हा विषय मोठा भानगडीचा आहे. बारीक विचार केला असतां मला वाटतें परमेश्वरानें मित्रत्वाचीं आणि शत्रुत्वाचीं अशीं दोनहि तत्वें मनुष्यप्राण्यांत निर्माण केलीं आहेत. आपणांस एकमेकांची गरज लागते, एकमेकांची दुःखद स्थिति पाहून दया येते, जरूरीच्या प्रसंगीं आपण एकमेकांस साह्य करतों, परस्परांनीं परस्परांवर केलेले उपकार आपण स्मरतों, असें उघड दिसतें. यावरून आपणांत मैत्रीचें तत्व असावें, तसेंच वैराचेंहि तत्व आपणांमध्यें ईश्वरानें घातलें आहे, असें मी ह्मणतों; कारण, तसें नसतें तर एकच गोष्ट पुष्कळांस आवडून ती मिळावी ह्मणून ते परस्परांशीं भांडले नसते, परस्परांचीं मनें परस्परांविरुद्ध बनतील अशीं कृत्यें त्यांनीं केलीं नसतीं, आणि नानातऱ्हेची भीतीहि त्यांनीं एकमेकांस घातली नसती. याप्रमाणें राग आणि कलह यांपासून लढाई उत्पन्न होते, अतितृष्णेनें औदार्याला धक्का पोंचतो, आणि असूया ही द्वेषाला कारण होते; परंतु या सर्व अडचणींस

ऐन जुवानतां प्रीति ही सद्गुणी माणसांचा शोध लावून त्यांचा संबंध जोडते. कारण, सद्गुणांमुळें त्यांनां सर्व जगाचें राज्य उपभोगून लढाईच्या कटकटींत पडण्यापेक्षां गरीब स्थितींत शांतपणानें रहाणेंच जास्त आवडतें. तसेंच तहानेनें कंठ अगदीं सुकून गेला, किंवा भुकेनें प्राण व्याकूळ झाला असला, तरी दुसऱ्याला आपणापासून त्रास न होईल अशाच रीतीनें ते आपली तहान भागवितात, किंवा भूक शांत करतात. जेव्हां एकादेवेळीं त्यांची कामेच्छा तीव्र होते, तेव्हां विचारशक्ती अथवा आत्मसंयमनशक्ती तिची लगाम आवरून धरून तिचा वेग कमी करते, तिला योग्य मर्यादेबाहेर जाऊं देत नाहीं, आणि त्यांनां त्यांच्या कर्तव्यविषयक मुख्य नियमांचें उल्लंघन करूं देत नाहीं. ज्यावर त्यांचा कायदेशीर हक्क तेवढ्याचाच ते उपभोग घेतात. ते कधीं दुसऱ्याच्या हक्काला धक्का लावीत नाहींत, किंवा दुसऱ्याच्या मालमत्तेचा अपहार करीत नाहींत; इतकेंच नाहीं, तर आपल्याजवळ असेल त्यापैकीं कांहीं ते दुसऱ्याला देतातहि. ते आपणांमधील वादविषयक मुद्द्यांचा अशा रीतीनें निकाल लावतात, कीं, त्यांत सगळ्यांचाच फायदा होईल, आणि तक्रारीला कोणालाहि जागा राहणार नाहीं. ज्याबद्दल पुढें त्यांनां पश्चात्ताप होईल, अशी गोष्ट रागानें त्यांच्या हातून कधींहि होत नाहीं. असूया—दुसऱ्याचा उत्कर्ष सहन न होणें—तर त्यांच्या स्वप्नींहि नसते! कारण, ते आपल्या मित्रांस आपल्या वस्तूंचा उपभोग घेऊं देतात, आणि उलट त्यांच्या वस्तु आपल्याच आहेत असें समजतात. यावरून तुझ्या लक्षांत येईलच, कीं, चांगले लोक हुद्द्याच्या जागा मिळविण्यांत एकमेकांच्या आड तर जात नाहींतच, परंतु उलट एकमेकांस त्यांच्यानें होईल ती मदत करीत असतात. ज्यांनां चैनीनें घरांत बसून आपलें आयुष्य घालवावें, हातांत सत्ता येतांच तिचा दुरुपयोग

लेक पळण्याचें मुख्य कारण मी त्यांना जुलमानें थांबवीं, हें होय. सायरन्स लोकांनीं कोणावर जुलूम केला नाहीं. ते आपल्या गोड बोलण्यानें आपल्या अंगावरून जाणारायेणारांस थांबवीत, आणि लोकहि त्यांच्या मधुर गाण्यानें गुंग होऊन जात. ''

क्रिटोब्युलस ह्मणाला '' ज्यांची मैत्री मला संपादन करावयाची आहे त्यांच्यावर मी कधींहि जुलूम करणार नाहीं, याबद्दल पक्की खातरी बाळगा; आणि आतां मला तुमची ती कला शिकविण्याला उशीर लावूं नका. ''

साक्रेटीस ह्मणाला '' जेव्हां तुला एकाद्याबरोबर सख्य करावयाचें असेल, तेव्हां तुझ्या मनांत त्याच्याविषयीं पुष्कळ पूज्यबुद्धि आहे, आणि त्याची मैत्री संपादण्याची तुझी फार इच्छा आहे, असें त्याला कळविण्याची तूं मला मोकळीक दे. कारण, आपल्याला पूज्य मानणाराचें वाईट कोणीच इच्छित नाहीं. ''

क्रिटोब्युलस ह्मणाला '' तसें करण्याविषयीं माझी मुळींच हरकत नाहीं. ''

साक्रेटीस ह्मणाला '' त्याच्या अंगचे गुण तुला बिनमोल वाटत असल्यामुळें तो तुला आवडतो असें जर मीं त्याला कळविलें तर तें चुकीचें होईल का ?''

क्रिटोब्युलस ह्मणाला '' बिलकूल नाहीं. कारण जे आपले हितेच्छु आहेत त्यांच्याविषयीं आपल्या मनांत फार ममता असते हें मला ठाऊक आहे. ''

साक्रेटीस ह्मणाला '' तर मग, ज्याच्याशीं सख्य करण्याची तुझी इच्छा आहे त्याजपाशीं मी तसाच बोलेन. तसेंच मी त्याला असें सांगूं का, कीं, तुला चांगल्याशीं मैत्री करण्यांत मोठा आनंद वाटतो, तूं त्याची मोठी काळजी घेतोस, त्यांनीं केलेल्या सत्कृत्यांबद्दल

जी स्वतः तुझ्या हातून घडल्याइतका आनंद तुला वाटतो, त्यांच्या अभ्युदयाबद्दल तुझ्या स्वतःच्या अभ्युदयाइतकें तुला समाधान वाटतें, त्यांच्या उपयोगीं पडण्यांत तुला बिलकूल श्रम वाटत नाहींत, या रीतीनें, मला वाटतें, चांगले मित्र संपादन करण्याच्या कामीं माझें तुला बरेंच सहाय्य होईल !"

क्रिटोब्युलस ह्मणाला " माझ्याविषयीं वाटेल तें बोलण्याची जशी कांहीं तुह्माला मोकळीक नाहींच, अशा रीतीनें तुह्मीं हा प्रश्न मला कां बरें केलात ?"

साक्रेटीस ह्मणाला "खरेंच तूं चुकतो आहेस ! असोसिया एकदां असें ह्मणाल्याचें मला स्मरतें, कीं, लग्न जमविणारे अडते, ज्याची तरफदारी ते करीत असतील त्याविषयीं एकहि खोटा शब्द बोलले नाहींत, तर यश पावतात. खोटें बोलून जुळविलेली लग्नें ह्मणजे दुर्दैवाची प्रदर्शनेंच आहेत. कारण एकमेकाविषयीं फसलेलीं माणसें एकमेकांचा द्वेष करितात, आणि त्याचा फसवून संबंध जुळविणारा तर त्यास नजरेसमोरहि सहन होत नाहीं ! आणि याच कारणासाठीं तुझें वर्णन करीत असतां मीं खोटें बोलूं नये असें मला वाटतें, आणि ह्मणूनच मी तुला असा प्रश्न विचारला."

क्रिटोब्युलस ह्मणाला " लोकांनीं माझी स्तुति करावी असा कांहीं गुण माझ्या अंगांत असला तर तुह्मी मला मदत करणार. तसें नसेल तर नसता गुण माझ्या अंगीं लावून साह्य करण्याची कांहीं तुमची इच्छा नाहीं! असेंच का तुह्मीं आमचे मित्र ते ? "

साक्रेटीस ह्मणाला "क्रिटोब्युलस, सर्व लोकांच्या स्तुतीस तूं पात्र होशील, अशी योग्यता अंगीं आणण्याविषयीं तुला उत्सुक करण्यापेक्षां तुझ्या योग्यतेबाहेर तुझी खोटीनाटी स्तुति करण्यानेंच मी तुझ्या जास्त उपयोगी पडेन, असें का तुझें मत आहे ?

या प्रश्नाचें उत्तर देण्यांत जर तुला शंका वाटत असेल, तर या दोन्ही गोष्टींचे परिणाम तूं चांगले लक्षांत आण. समज कीं, तूं उत्तम नावाडी आहेस अशी मी एका गलबतवाल्याजवळ तुझी शिफारस केली, आणि त्यानेंहि ती ऐकून तुला सुकाणावर नेमिलें, तर गलबताचा नाश होणार नाहीं असें मानण्याला कांहीं कारण आहे का? किंवा, तूं मोठा अनुभाविक सेनापति अथवा मुत्सद्दी आहेस असें मी प्रसिद्धपणीं ह्मणालों, आणि मीं केलेली ही अन्यायाची स्तुती ऐकून सेनानायकाची अथवा मुख्य न्यायाधिशाची जागा कोणीं तुला दिली, तर तुझ्या जिवावर काय प्रसंग येईल, आणि सर्व राज्याची तरी काय अवस्था होईल? तसेंच, समज कीं, एकाद्या खासगी मनुष्याजवळ तूं मोठा काटकसरी मनुष्य आहेस असें मीं ह्मटलें, आणि त्यानें तें ऐकून आपल्या कुटुंबाची व्यवस्था तुझ्यावर सोंपविली, तर त्याच्या मालमत्तेचा धुवा उडवून तूं आपली बेअब्रु आणि छीथूच करून घेशील ना? क्रिटोब्युलस, याचा अर्थ इतकाच कीं, आपण जसे दिसत असूं तसे खरोखर असण्याविषयीं ह्मटणें, हाच जगामध्यें सन्मान पावण्याचा खात्रीलायक आणि जवळचा रस्ता आहे. आणि तूं बारीक विचार करशील तर तुला कळून येईल कीं, सर्व सद्गुण सवयीनें व अनुभवानें वाढून कायमचे होतात. याकरितां माझा हा उपदेश ऐकून ते सद्गुण आपलेसे करून घेण्याची मेहनत कर आणि तुझें मत याहून भिन्न असेल तर मला तरी कळीव."

क्रिटोब्युलस ह्मणाला "या असल्या विचारानें भरलेल्या भाषणावर चांगला आणि महत्वाचा असा कांहीं आक्षेप निघेलसें मला वाटत नाहीं. असें असतां त्याच्याविरुद्ध मुद्दाम जाणें ह्मणजे मोठी शरमेची गोष्ट आहे, असें मला वाटतें."

# दारिद्र्यापासून मुक्तता कशी व्हावी ?

साक्रेटिसाचा आपल्या मित्रांवर अत्यंत लोभ असे; आणि मूर्खपणानें त्यांनीं आपणावर कांहीं संकट आणून घेतलें असतां, तो योग्य उपदेशानें त्यांना सुख देण्याचा प्रयत्न करी. प्रसंगीं आपण एकमेकांस मदत करावी असा बोध सर्वांस करून आपल्या मित्रांस दारिद्र्य आलें असतां तो त्यांतून त्यांची सुटका करण्याकरितां फार मेहनत घेत असे. अशा प्रसंगीं तो कसा वागे, याचीं कांहीं उदाहरणें येथें देतों.

एके दिवशीं आरिस्टार्चसची व त्याची गांठ पडली. आपल्या मित्राचा चेहरा अगदीं उतरला आहे असें पाहून साक्रेटीस ह्मणतो "आरिस्टार्चस, तुला आज कांहीं तरी होत असावेंसें वाटतें. तुझ्या दुःखाचें कारण जर तूं आह्मांला सांगशील तर कदाचित् आह्मी तें नाहींसें करून तुला सुखी करूं."

तो ह्मणाला " खरोखर, आज मी मोठ्या दुःखांत पडलों आहें. नुकत्याच झालेल्या लढाईंत पुष्कळ लोक पीरसकडे पळून गेले, आणि तेव्हांपासून माझ्या बहिणी, त्यांचीं मुलें, माझीं चुलतभावंडें यांनीं माझा आश्रय केल्यामुळें आज मला एकंदर चौदा माणसें पोसावीं लागत आहेत. शहराबाहेर जिकडे तिकडे शत्रूंचा अंमल असल्यामुळें आह्मांला आमच्या जमिनीचें उत्पन्न मिळत नाहीं, हें तुला ठाऊक आहेच. अथेन्समध्यें सध्यां फारच थोडे लोक असल्यामुळें आमच्या तेथल्या घरांत कोणीच भाडेकरी नाहीं; मालाला कोणी गिऱ्हाईक नाहीं. कितीहि व्याज कबूल करा, कोणी पैसा देत नाहीं, आणि पैसा मागावा तरी कोणाजवळ, अशी मोठी पंचाईत पडली आहे. अशी प्रत्येक गोष्टीची महागाई झाल्यामुळें

आपल्या नातेवाईकांनीं आपला आसरा करावा आणि आपल्याला त्यांना पोसण्याचें सामर्थ्य न राहून आपण आपल्या डोळ्यांदेखत त्यांना मृत्युमुखीं पडतांना पहावें, ह्मणजे किती वाईट ?"

हें सर्व स्वस्थपणें ऐकून घेऊन साक्रेटीस त्याला ह्मणाला "सिन्यामनच्या कुटुंबांत इतकीं मनुष्यें असतां तो त्यांचा निर्वाह करितो; इतकेंच नाहीं, तर त्यांच्या मेहनतीनें नफा मिळवून त्यावर सधन देखील होतो; आणि तुला आपल्या कुटुंबांत पुष्कळ माणसें आलीं ह्मणून उपासमार होण्याची भीति वाटते, हें कसें ?"

आरिस्टार्चेस ह्मणाला "याचें कारण असें कीं, सिन्यामनला फक्त गुलामांचेंच रक्षण करावयाचें असल्याकारणानें तो त्यांजपासून हवें तसें काम करून घेतो. मला तसें करतां येणार नाहीं. कारण मला स्वतंत्र माणसांचें रक्षण करणें आहे."

साक्रेटीस पुढें ह्मणाला "बरें, तुला कोणाची किंमत जास्त वाटते ? सिन्यामनच्या गुलामांची, कीं, तुझ्या घरीं असलेल्या माणसांची ?"

आरिस्टार्चेस ह्मणाला "या दोघांत तुलनाच करतां येत नाहीं !"

साक्रेटीसानें उत्तर दिलें " ज्यांची किंमत तुला फार कमी वाटते, त्या गुलामांच्या मदतीनें सिन्यामननें श्रीमंत व्हावें; आणि ज्यांची योग्यता तूं मोठी समजतोस अशीं चांगलीं माणसें घरांत असतां तुला दारिद्र्य यावें, आणि तूं मोठ्या संकटांत पडावेंस, ही मोठी लाजिरवाणी गोष्ट नाहीं का ?"

आरिस्टार्चेस ह्मणाला " छे, मुळींच नाहीं ! कारण, या दोघांच्या स्थितींत फार अंतर आहे. सिन्यामनचे गुलाम कांहीं धंदा करितात; परंतु माझ्या मनुष्यांना सर्व विषयक शिक्षण मिळालें आहे आणि तीं कोणताहि धंदा करीत नाहींत."

साक्रेटीस ह्मणाला " सर्वविषयक गोष्टींचें ज्ञान असणाऱ्या मनुष्यांना कांहीं धंदा करतां येऊं नये काय !"

आरिस्टार्चस ह्मणाला " होय, आला पाहिजे."

साक्रेटीस ह्मणाला " ओट धान्याचा रवा, भाकरी, बायका-पुरुषांचे कपडे, उपाध्याचे झगे, कोट आणि अशा दुसऱ्या पुष्कळ उपयोगी वस्तूंपैकीं एखादी देखील तुमच्या येथल्या मनुष्यांना करतां येत नाहीं ?"

आरिस्टार्चस ह्मणाला " अरे एकादी कां ? मला वाटतें या सर्व वस्तु त्यांनां करतां येतात."

साक्रेटीस ह्मणाला "झालें तर मग. तुला इतकी भीति ती कसली वाटते ? श्रीमंत होण्याचा मार्ग ठाऊक असतां दारिद्र्याबद्दल इतकी कुरकर तूं कां करतोस. नासिसिडेस किती वाढला आहे हें तुला माहित आहेना ? किती त्याचीं गुरेंढोरें, आणि सार्वजनिक कर्जाला त्यानें केवढाल्या तरी रकमा दिल्या आहेत ! आतां मला सांग, तो एवढा श्रीमंत कशानें झाला ? त्यानें ओट धान्य दळून त्याचा रवा काढून विकण्यापलीकडे दुसरें कांहीं केलें नाहीं. तसेंच सिर्थेस तुला ठाऊक आहे. तो नुसत्या भाकऱ्या विकून आपल्या कुटुंबाचा निर्वाह करीत मजेनें राहिला आहेना ? कोलिटस गांवचा डेमिस आपली उपजीविका कशावर करतो ? पाद्री लोकांचे झगे शिवून, दुसरें कांहीं नाहीं. मेनांत जो इतक्या चैनींत राहतो त्याला शिंप्याच्या धंद्यावांचून आहे का दुसरें कांहीं साधन ? आणि याच धंद्यावर मिगरा येथील किती कुटुंबें सांवरलीं आहेत बरें ?"

आरिस्टार्चस ह्मणाला "मला हें सर्व कबूल आहे; परंतु त्यांच्या आणि माझ्यामध्यें पुष्कळ अन्तर आहे. त्यांनीं पुष्कळ गुलाम विकत घेतले आहेत, आणि त्यांनां कामाला लावून ते आपला फायदा

करून घेतात; परंतु मला स्वतंत्र अशा सभ्य गृहस्थांचें आणि त्यांच्या बायकांचें पोषण करायवाचें असून त्यांच्यापैकीं कांहीं तर माझे नातेवाईक आहेत. आतां तूंच सांग, मी गुलामाप्रमाणें त्यांना का कामाला लावावेत?"

साक्रेटीस ह्मणाला "हीं माणसें स्वतंत्र आहेत आणि तुझ्या नात्याचीं आहेत ह्मणून त्यांनीं पुस्वा झोंडून झोंपा ताणण्यापलीकडे कांहींच करूं नये, असें का तुला वाटतें? अशा रीतीनें आळसांत राहून यथेष्ट वर्तन करणारे लोक दुसऱ्या लोकांपेक्षां सुखी असतात, असें तूं कधीं पाहिलें आहेस का? मी पूर्वीं सांगितलेल्या धंद्यापैकीं एकादा किंवा दुसरा कोणताहि उपयुक्त अथवा मनुष्याच्या जीवितालाअवश्य असा धंदा करणाऱ्या लोकांपेक्षां हे आळसाचे पुतळे जास्त संतुष्ट आणि जास्त सुखी असतात, असें तुला वाटतें का? स्वस्थ बसणें आणि उद्योग न करणें या दोन गुणांनीं का आपणाला अवश्य गोष्टींचें ज्ञान होईल? आपण शिकलेल्या गोष्टी कायम राहतील, आपलें शरीर मजबूत बनून आपण निरोगी होऊं, आणि आपण श्रीमंत होऊं, अथवा आपण मिळविलेली संपत्ति आपणाजवळ कायम राहील, अशी का तुझी कल्पना आहे? उद्योगी आणि मेहनती स्वभाव कुचकामाचा, असा तुझा समज आहे काय? ज्या गोष्टी तुझ्या येथल्या कुलीन स्त्रियांना माहित आहेत, त्यांचा अभ्यास त्यांनीं कां केला? त्या निरुपयोगी आहेत, सबब त्या प्रत्यक्ष करून पहावयाच्या नाहींत, असा त्यांचा निश्चय होता, कीं याच्या उलट, त्यांचा कारखाना काढून त्यापासून आपलें हित करून घ्यावें असें त्यांना वाटत होतें? उपयुक्त आणि कल्याणाच्या गोष्टी करण्यामध्यें निमग्न राहण्यापेक्षां कांहींएक न करितां पायावर पाय टाकून स्वस्थ बसण्यांतच जास्त शहाणपणा आहे काय? हात जोडून उदरनिर्वाह

कसा चालेल त्याचा विचार करीत बसण्यापेक्षां उद्योगाला लागणें हेंच खरें शहाणपण नव्हे काय ? आरिस्टार्चस, मी तुला अगदीं आपल्या मनांतील गोष्ट सांगू का ? मला वाटतें, सध्याच्या स्थितींत तुझी तुझ्या पाहुण्यावर आणि उलट त्यांची तुझ्यावर खरी प्रीति असूं शकणार नाहीं. कारण, ते तुला तुझ्यावर ओझें पडल्यासारखे वाटतील, आणि तुला कष्टी पाहून आपण याला जड वाटतों असें त्यांनां वाटेल, आणि अशा रीतीनें दोघांचाहि असंतोष वाढून तुझीं एकमेकांचे पूर्वीचे उपकारहि विसरून जाल. परंतु तूं त्यांनां कामावर लावलेंस ह्मणजे तुझा फायदा होऊं लागेल, आणि फायदा झाला ह्मणजे तूं त्यांच्यावर प्रीति करशील. आणि आपल्यापासून याला आनंद होतो असें पाहून तेहि तुझ्यावर जास्त प्रीति करूं लागतील. तुं त्यांच्यावर केलेली दया ते चांगल्या रीतीनें स्मरतील, आणि तुजवर उलट उपकार करण्याविषयीं जास्त दक्ष राहतील. सारांश, तुह्मी हल्लींपेक्षां एकमेकांवर जास्त प्रेम करणारे संबंधी आणि एकमेकांचे जास्त चांगले मित्र व्हाल. त्या मनुष्यांकडून होणारी गोष्ट दूषणीय असती तर ती त्यांजकडून करविण्याचा विचार मनांत आणण्यापेक्षां मरणच पत्करतें; परंतु आपण त्यांनां जी गोष्ट करा ह्मणून सांगणार, ती त्यांनां योग्य आणि आदरास पात्र अशीच आहे आणि जींत प्राविण्य संपादिलें आहे अशी गोष्ट जर कोणी करील तर त्यांत त्याचें हित होऊन लोक त्याचा सन्मान करतील. ह्मणून सर्वांच्या हिताची ही गोष्ट त्यांनां सुचविण्याचें तूं दिनावधीवर टाकूं नकोस, आणि माझी खात्री आहे, कीं, त्यांनां ही सूचना ऐकून फार आनंद होईल."

आरिस्टार्चस मोठ्या आनंदानें ह्मणाला " अहाहा ईश्वरा ! खरोखर साक्रेटीस, तूं ही मला किती चांगली युक्ती सांगितलीस ! मला ती अगदीं मान्य आहे, इतकेंच नाहीं, तर तिच्यायोगानें

माझ्या मनावर असा कांहीं परिणाम झाला आहे कीं, लोकांचें कर्ज आणून तें एकदां खर्च करून बसलों म्हणजे मला तें परत करतां येणार नाहीं म्हणून कोणाचें कर्ज काढूं नये असें जरी मी ठरविलें होतें, तरी काम सुरू करण्याकरितां, व हत्यारें आणि दुसरें सामान खरेदी करण्याकरितां मिळेल तेथून कोणत्याहि अटी-वर कांहीं रक्कम कर्जाऊ काढण्याचा मी आतां निश्चय केला."

ही सूचना लागलीच अमलांत आली. आरिस्टार्चसनें जरूरीचें सामान खरेदी केलें. एकदम पुष्कळ लोंकर आणून घरांत टाकिली आणि बायका सकाळपासून संध्याकाळपर्यंत जारीनें काम करूं लागल्या. त्यांच्या चिंतातुर मनाला उद्योगामुळें करमणूक झाली, आणि आरिस्टार्चस व त्यांची मंडळी यांच्यामध्यें उत्पन्न झालेला वाईटपणा नाहींसा होऊन एकमेकांच्या सहवासांत त्यांनां समाधान वाटूं लागलें. बायकांनां तो आपला पालकसें वाटूं लागलें, व तो त्यांनां अत्यंत उपयोगी आणि अवश्य समजूं लागला.

सरतेशेवटीं आरिस्टार्चसनें कांहीं दिवसांनीं साक्रेटीसाला भेटून झालेली सर्व हकीकत मोठ्या आनंदानें सांगितली, आणि त्याच बायका आतां मीच आळशी म्हणून कुरकुरूं लागल्या आहेत, असेंहि तो म्हणाला. तेव्हां साक्रेटीसानें त्याला विचारिलें, "तूं त्यांनां कुत्र्याची गोष्ट कां सांगत नाहींस ? कारण, त्या गोष्टीप्रमाणें जेव्हां पशूंनां बोलतां येत होतें, तेव्हां एके दिवशीं मेंढरें आपल्या धन्याला म्हणालीं, 'धनी-साहेब, आपण फार विलक्षण दिसतां ! आमच्यापासून तुम्हाला लोंकर मिळते, आमचीं कोंकरें तुमच्या उपयोगी पडतात, आणि आमच्या दुधापासून केलेल्या लोण्याच्या गोळ्यावर तुमचा केवढा तरी फायदा होतो. असें असून परमेश्वराच्या कृपेनें जें गवत जमिनीवर हवें तितकें उगवतें त्यापलीकडे तुम्ही आम्हांला कांहीं खाणें घालीत

नाहीं, आणि ज्या कुत्र्यापासून तुह्माला कांहीचाहि फायदा होत नाहीं त्याला मोठ्या ममतेनें वागवून स्वतः जी भाकर खातां ती त्याला खाऊं घालतां. तेव्हां याला काय ह्मणावें !' कुत्रा जवळच होता. तो ही तक्रार ऐकून ह्मणाला 'उगाच नाहीं मला इतक्या चांगल्या रीतीनें वागवीत ! तुमचें रक्षण मीच करतों, मीच चोरांना तुह्मांला चोरूं देत नाहीं, आणि तुमचें रक्त घोटण्यासाठीं तृषित झालेल्या लांडग्यांनां तरी मीच पिटाळून लावितों. माझा पहारा जर तुमच्याभोंवतीं नसता तर तुमच्यानें बाहेर चरण्याला जाववतेंना.' हें उत्तर ऐकतांच मेंढ्या ज्या हक्कासाठीं भांडत होत्या तो हक्क कुत्र्याचा आहे, आपला नाहीं, असें त्यांनीं कबूल केलें. याचप्रमाणें बायकांनां सांग कीं, 'मी तुमचा पालक, तुमचा रक्षक आहें आणि विश्वासु शूर कुत्रा आपल्या कळपाचें रक्षण करण्याकरितां मोठ्या काळजीनें जसा नेहमीं दक्ष असतो, तसा मी तुमच्या रक्षणाकरितां तत्पर असतों.' त्यांना आणखी असेंहि सांग कीं, 'माझ्यामुळें तुह्माला कोणी त्रास देत नाहीं. आणि मी आहें ह्मणूनच तुह्मी मजेनें सुखरूप राहतां.'"

# लोकनिंदा कशी टाळतां येईल ?

एके दिवशीं साक्रेटिस आणि त्याचा जुना मित्र युथेरस यांची फार दिवसांनीं गांठ पडली. तेव्हां साक्रेटिसानें त्याला तूं कोठून आलास ह्मणून विचारलें. तो ह्मणाला "आतां मी कांहीं फार लांबून आलों नाहीं. जवळूनच आलों. खुद्द एटिकामध्यें आमच्या वडिलांनीं आह्मांला कांहींच ठेविलें नाहीं. थोडेंबहुत जें कांहीं होतें तें सरहद्दी-वर. त्याची वाट लढाईमध्यें लागली. तेव्हां पोटासाठीं कांहीं तरी धंदा करणें भाग पडलें, ह्मणून लढाई संपण्याच्या सुमाराला आलों. आतां एका गलबतावर नोकरी धरीन. आपल्या पोटासाठीं दुसऱ्यांना त्रास देण्यापेक्षां असें कांहीं तरी करणें मला आवडतें. तसेंच आतां कोणाचें कर्ज ह्मणून काढावयाचें नाहीं. कारण, गहाण ठेवायलासुद्धां कांहींच उरलें नाहीं."

साक्रेटिस ह्मणाला " अरे, पण पोटासाठीं हा असला धंदा तुला आणखी किती दिवस करितां येईल असें तुला वाटतें ?"

युथेरस ह्मणाला " आतां आणखी थोडे दिवस असें करतां येईल. "

साक्रेटिस ह्मणाला " ह्मातारपणीं तुझ्यानें असला धंदा होणार नाहीं. अर्थात्च अशानें कांहींएक मिळणार नाहीं. मग त्या वेळीं जें थोडें पोटाला लागेल त्याची तरतूद तूं काय करणार ? ह्मणून तूं अशा रीतीचा धंदा कर, कीं, ज्याच्यायोगानें तुला तुझ्या ह्मातारपणा-करितां कांहीं शिल्लक टाकतां येईल. तूं एकाद्या श्रीमंताची चाकरी धर. त्याची व्यवस्था पाहून त्याला काटकसर शिकीव. त्याच्या चाकरांवर देखरेख ठेव. त्याचें उत्पन्न गोळा कर. त्याच्या प्रत्येक वस्तूची काळजी घेऊन ती नीट जपून ठेव, ह्मणजे तो तुला तुझ्या नोकरीबद्दल बक्षीस देईल. "

युथेरस ह्मणाला " मला एकाद्याचा गुलाम होऊन राहणें मोठें कठिण वाटतें. "

साक्रेटीस ह्मणाला " आपल्या राज्यांतील न्यायाधीश किंवा दुसरे नोकर यांनां कोणी गुलाम समजत नाहींत; इतकेंच नाहीं तर त्यांनां जिकडेतिकडे मोठा मान मिळतो. "

युथेरस ह्मणाला "तें कसेंहि असो, लोकांनीं दोष द्यावा हें मला आवडत नसल्यामुळें ज्या कामांत लोकांनां दोष देण्याला संधी सांपडते तें काम पत्करावें असें माझ्या मनांतहि येत नाहीं. "

साक्रेटीस ह्मणाला " ज्यामध्यें एकादा मनुष्य अगदीं निष्णात आहे, आणि लोक त्याला मुळींच दोष देत नाहींत, असा धंदा तुला कोठें मिळणार ? कारण, कधींच चूक होण्याचा संभव नाहीं इतकी पूर्णता येणें फार कठिण आहे. आणि ती आली असें जरी घटकाभर मानलें, तरी तिचें ज्ञान नाहीं अशा लोकांची निंदा चुकविणें त्यापेक्षांहि कठिण आहे ! तूं जो धंदा करितोस त्या धंद्यांत तुला कोणीहि दोष लावणार नाहीं, इतकें प्राविण्य जर तूं संपादिलेंस, तर तें मला मोठेंच चमत्कारिक आणि विलक्षण वाटेल ! ज्या लोकांचा धंदाच हा कीं, विचार न करितां प्रत्येक गोष्टींत लोकांनां दोष लावावयाचा, त्यांची संगति टाळून तूं निःपक्षपाती लोकांशीं संबंध ठेवीत जा. जें कृत्य तुला करतां येईल तेंच हातीं घे; जें कृत्य करण्याला आपण अपात्र आहों असें तुला वाटेल तें हातीं धरूं नकोस, आणि जेव्हां तूं एकादें काम हातीं धरशील तेव्हां तुझ्यानें होईल तितक्या उत्तम तऱ्हेनें तें शेवटाला ने. असें केलेंस ह्मणजे लोकांच्या दोषाला तूं फारसा पात्र होणार नाहींस, दारिद्र्यापासून तुझी सुटका होईल, तुझें आयुष्य तुला जास्त सुखानें घालवितां येऊं लागेल, तुझ्यावर संकटें येणार नाहींत, आणि वृद्धपणांत अवश्य लागणाऱ्या वस्तूंचा तुजजवळ चांगलाच संग्रह होईल. "

# मैत्रीचें महत्त्व.

एके दिवशीं साक्रेटीस व डायओडरस यांची गांठ पडली असतां साक्रेटिस त्याला ह्मणतो " तुझा एकादा गुलाम पळाला तर तूं त्याला शोधण्याची मेहनत घेशील कीं नाहीं ? "

त्यानें उत्तर केलें " होय अलबत घेईन ! मी एक जाहिरात प्रसिद्ध करून त्याला धरून आणणारास कांहीं बक्षिसहि देऊं करीन. "

साक्रेटीस ह्मणाला " बरें. त्यांच्यापैकीं कोणी आजारी पडला, तर डाक्टराला बोलावून आणून त्याचा जीव वांचविण्याची तजवीज तूं करशील कीं नाहीं ? "

तो ह्मणाला " अगदीं निःसंशय करीन. "

साक्रेटीस ह्मणाला "बरें, गुलामापेक्षां सहस्रपटीनें तुझ्या उपयोगीं पडणाऱ्या मित्राला जर दारिद्र्य आलें तर त्यांतून तूं त्याला सोडविण्याचा प्रयत्न करूं नयेस का ? मी हर्मोनिससंबंधानें तुला हें विचारतों. तुला पक्कें ठाऊक आहे, कीं, तो कृतघ्न नाहीं. प्रत्युपकाराची आशा नसतां तुझ्याकडून काडीभरहि उपकार करून घेणारा तो मनुष्य नाहीं. तसेंच तुला हेंहि ठाऊक आहे, कीं, नाखुषीनें चाकरी करणाऱ्या शेंकडों गुलामांपेक्षां खुषीनें, उत्सुकतेनें आणि प्रीतीनें उपयोगीं पडणाऱ्या एका मित्राची योग्यता फार जास्त आहे. त्यानें आपणासाठीं जेवढें करावें असें आपणास वाटतें तेवढेंच करून तो रहात नाहीं. तर आपल्या उपयोगीं पडतील अशा पुष्कळ गोष्टी तो स्वतःच आपल्या बुद्धीनें आपणासाठीं करीत असतो. तो चांगला विचारी असतो. त्याला पुढें काय होईल हें चांगलें कळतें, आणि त्याच्यापासून आपणांस चांगली मसलत मिळण्याची आशा असते. एकादी मोठ्या किंमतीची वस्तु थोडक्यांत मिळत असली तर विकत

ण्यावी असा व्यवहारदक्ष माणसांचा ठराव असतो, तो लक्षांत आण. सध्या थोडक्या श्रमांत चांगला मित्र मिळण्याची संधि आहे."

डायओडरस ह्मणाला " तुझें ह्मणणें बरोबर आहे. आतां मेहरबानी करून तूं हर्मोजिनसला मजकडे पाठवून दे. "

साक्रेटिसानें उत्तर दिलें " मला माफ कर. त्याला इकडे बोलावून न आणतां तुला तिकडे जातां येईल. "

हें बोलणें ऐकून डायओडरस हर्मोजिनसकडे गेला आणि अल्प उपकारानें त्यानें त्याची मैत्री संपादन केली. तेव्हांपासून हर्मोजिनस डायओडरसच्या प्रत्येक वेळीं उपयोगीं पडून त्याला संतुष्ट करूं लागला.

# सेनानायकाचे गुण.

आपण आपल्या कर्तव्यास अवश्य लागणाऱ्या गोष्टींचें ज्ञान संपादन करण्याकरितां फार मेहनत घेत जावी. असा उपदेश विश्वासाचीं आणि मानाचीं कामें करूं इच्छिणाऱ्या लोकांस करून साक्रेटीस त्यांच्या किती उपयोगी पडत असे, हें आतां आपण पाहूं. सैन्यांतील मुख्य जागा आपणाला मिळावी म्हणून हक्क सांगणाऱ्या आपल्या एका मित्राला, युद्धकला शिकविणारा डायओनिसोडरस नांवाचा कोणी मनुष्य अथेन्स येथें आला आहे असें ऐकून साक्रेटीस म्हणाला " अशा तऱ्हेची उत्तम संधी आली असतां सैन्याचा पुढाकार घेऊं इच्छिणारानें आपली हुकमत कशी ठेवावी, हें शिकण्याची हेळसांड करणें फार निंद्य आहे. मला वाटतें, मूर्तिकाराचें काम न शिकतां पुतळा खोदण्याचें काम हातीं घेणाऱ्या मनुष्यापेक्षांहि, सेनानायकाच्या गुणांचें ज्ञान करून न घेतां तें काम शिरावर घेणारास जास्त शिक्षा असली पाहिजे ! कारण, लढाईच्या प्रसंगीं राष्ट्राचें हिताहित केवळ सेनानायकावर अवलंबून असतें. त्याच्या दक्षतेनें राष्ट्राला यश मिळतें, आणि त्याच्या हलगर्जीनें राष्ट्राचे अनेक तोटे होतात. आणि म्हणूनच त्या कामाची पात्रता आंगीं न आणतां जो मनुष्य तें मिळावें म्हणून खटपट करतो त्याला चांगलें कडक शासन झालें पाहिजे."

असा उपदेश करून साक्रेटिसानें त्या तरुण मनुष्याचें मन शिक्षणाकडे वळविलें, व तो मनुष्य लागलाच डायओनिडोरसकडे जाऊन युद्धशास्त्र शिकूं लागला. आपणाला युद्धकलेचें कांहीं ज्ञान मिळालें असें वाटून जेंव्हां पुढें कांहीं दिवसांनीं तो साक्रेटीसाकडे आला, तेव्हां त्याला पाहून त्याची थट्टा करण्याच्या उद्देशानें साक्रे-

टीस तेथें असलेल्या मंडळीस ह्मणाला "काहो मंडळी, आपली हुकमत कशी ठेवावी हें शिकून आल्यामुळें सेनानायकाच्या मानास पात्र झालेल्या या तरुण मनुष्याला आपण मान का देऊं नये? बीन कसा वाजवावा हें शिकलेल्या मनुष्यानें तो कधींहि हातीं घेतला नाहीं तरी त्याला आपण जसे बीनकार ह्मणतों, किंवा औषधोपचाराची माहिती असणाराला, प्रत्यक्ष अनुभवहि नसला तरी जसे आपण वैद्यराज ह्मणतों, तसे हे गृहस्थ सैन्यावर छाप कशी ठेवावी हे शिकल्यामुळें आतां सेनानायक बनले आहेत. यांनां तसे बनविण्याला आपणांपैकीं कोणीहि मत देणार नाहीं हें मला ठाऊक आहे. युद्धकलेची पूर्ण माहिती झाल्यावांचून कोणीहि या जागेकरितां आपली निवड करून घेणें व्यर्थ जाहे. कारण, वैद्यशाळेंत नुसता अभ्यास करून पदव्या मिळविल्यानें कोणीहि जसा उत्तम वैद्य ठरत नाहीं, तसा सेनानायकाचे जागीं निवड व्हावी ह्मणून झटणारा कोणीहि खरा सेनानी होऊं शकत नाहीं."

पुढें त्या तरुण मनुष्याकडे वळून साक्रेटीस ह्मणतो "बरें, हें पहा, आमच्यापैकीं कोणाला तुमच्या सैन्यांतील एकाद्या टोळीवर अम्मल करण्याची वेळ आली, तर आह्मीं अगदीं अडाणी नसावें ह्मणून कृपाकरून तुमच्या गुरुजीनीं तुह्माला प्रथम काय शिकविलें. तें सांगा"

तो तरुण मनुष्य ह्मणाला "प्रथम आणि मागाहून सारें एकच. कारण, लढत असतां, कूच करीत असतां, किंवा तळ दिला असतां सैन्यामध्यें व्यवस्था कशी राखावी, हेंच कायतें त्यांनीं मला शिकविलें."

साक्रेटीस ह्मणाला "सेनाध्यक्षानें ज्या कांहीं दुसऱ्या शेंकडों गोष्टी केल्या पाहिजेत त्यांशीं ताडून पाहतां या कांहींच नाहींत. त्यानें लढाईची सर्व तयारी मोठ्या काळजीनें केली पाहिजे; आपल्या शिपायांनां अन्नाचा आणि दारुगोळ्यांचा चांगला पुरवठा केला पाहिजे;

तो शोधक, मेहनती, उद्योगी, विचारी व तीक्ष्ण बुद्धीचा असला पाहिजे; त्याच्या आंगीं दया आणि क्रूरता असे दोन्ही गुण असले पाहिजेत; तसेंच तो मोकळ्या आणि खोल मनाचा असला पाहिजे; आपलें राखून दुसऱ्याचें कसें घ्यावें हें त्याला ठाऊक असलें पाहिजे; तो खर्चिक आणि लुटालुट करणारा असला पाहिजे; त्याच्या आंगीं औदार्य असावें आणि लोभहि असावा; त्यानें सावध असलें पाहिजे आणि धाडसीहि असलें पाहिजे. आतां लढाईच्या प्रसंगीं सैन्याची व्यवस्था कशी राखावी याची माहिती त्याला असली पाहिजे, ही गोष्ट मला कबूल आहे. व्यवस्था आणि शिक्षण या दोन सैन्याच्या कामीं फार महत्त्वाच्या गोष्टी आहेत. जसें दगड, विटा, लांकडें, कौलें यांचा एकच खिचडा केलेला असला ह्मणजे इमारतीच्या कामीं त्याचा उपयोग होणें अशक्य, तसेंच वरील दोन गोष्टींवाचून सैन्याचा उपयोग होणें अशक्य आहे. परंतु इमारत बांधते वेळीं सर्व वस्तु जेथल्या तेथें असाव्या, पाया आणि आच्छादन हीं पाण्यानें न कुजणाऱ्या वस्तूंचीं पाहिजेत. ह्मणजे पाया दगडाचा आणि आच्छादन कौलांचें केलें असावें आणि लांकुड व विटा यांचा उपयोग योग्य ठिकाणीं ह्मणजे इमारतीच्या आंतल्या आंगास करावा, ह्मणजे आपणास आनंद देणारें असें घर तयार होतें."

साक्रेटीसाचें हे बोलणें संपलें नाहीं तोंच तो तरुण मनुष्य ह्मणाला "तुमच्या या उपमेच्या योगानें सेनानायकानें आणखीं काय केलें पाहिजे हें शिकल्याची मला आठवण झाली. त्यानें सैन्याच्या पहिल्या आणि शेवटच्या रांगेंत उत्तम शिपायांची योजना करावी, ह्मणजे पहिल्या रांगेंतलि शिपाई सैन्याला आपल्यामागें ओढतील आणि शेवटच्या रांगेंतले त्याला पुढें ढकलतील."

साक्रेटीस ह्मणाला "तर त्यानें तुह्मांला चांगले वाईट शिपाई कसें ओळखावें हें शिकविलेंच असेल. नाहींतर तुमच्या या सांगण्याचा उपयोग काय? कारण तुमच्याजवळ बरेचसे रुपये देऊन त्यांपैकीं खरे टेबलासभोंवतीं लावून खोटे मध्यें लावा असें तुह्माला सांगितलें, तर हें काम खरेखोटे रुपये ओळखण्याची माहिती असल्यावांचून तुह्माला कसें करितां येईल?"

तो तरुण मनुष्य ह्मणाला "खरोखर, तुह्मीं जें ह्मणतां तें कांहीं त्यानें मला शिकविलें नाहीं. आणि मला वाटतें चांगल्या वाईट शिपायांची निवड करावयाची ती आपली आपणच करावयाला शिकलें पाहिजे."

साक्रेटीस ह्मणाला "या बाबतींत सेनापतीनें कसें वागावें, हें आपण पाहूं. ज्या वेळेला पैशाची लूट करावयाची असेल त्या वेळीं त्यानें लोभी शिपाई पुढें ठेवावे, आणि ज्या वेळेस मोठा धोक्याचा प्रसंग असेल त्या वेळेस वैभवाची इच्छा करणारे महत्वाकांक्षी शिपाई पुढें ठेवावे, असें नाहीं का तुह्माला वाटत? आणि हे असे शिपाई योग्य वेळीं आपण होऊनच पुढें येत असल्यामुळें त्यांना ओळखण्याचीहि फारशी भानगड नसते. बरें, काय हो, तुमच्या शिक्षकानें तुह्माला निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळे हुकूम कसे सोडावे याविषयीं कांहीं सांगितलें आहे काय?"

तो ह्मणाला "असें कांहीं त्यानें मला शिकविलें नाहीं."

साक्रेटीस ह्मणाला "तर मग तुह्मी आधीं त्याच्याकडे जा. पैसे उपटणें हाच जर त्याचा धंदा नसेल तर तुमचे पैसे घेऊन तुह्माला कांहीं न शिकवितां परत पाठविण्याबद्दल त्याला शरम वाटेल. याबद्दलची माहिती त्याला असल्यास तो ती तुह्मांला सांगेल; निदान तुमचे पैसे तरी तो तुह्माला परत देईल!"

# चांगला राजा कोणाला ह्मणावें.

साक्रेटीस अथेनियन लोकांनीं नुकत्याच निवडलेल्या सेनापतीला ह्मणाला "होमरने ॲगमेमनानला धनगराची उपमा कां बरें दिली आहे ? धनगर जसा आपलीं मेंढरें चांगल्या रीतीनें असावीं, त्यांनां कांहीं कमी पडूं नये ह्मणून त्यांची काळजी घेतो, तशी काळजी सेनाध्यक्षानें आपल्या शिपायांची घेतली पाहिजे, व राजानें आपल्या प्रजेची घेतली पाहिजे. सेनापतीनें आपल्या शिपायांस चांगल्या स्थितींत राखिलें पाहिजे. अन्नापाण्याची कमतरता त्यांनां पडूं देतां कामा नये, आणि आपल्या शत्रूंनां जिंकून सुखानें नांदावें ह्मणून त्यांनीं हातीं धरलेली शस्त्रें योग्य काम बजावताहेत किंवा नाहीं हें पहावें. पोप ह्मणतो ॲगमेमनान हा उदार सेनापती आणि कृपाळू राजा होता. हे दोन्ही गुण राजाच्या आंगीं असणें मोठें भूषणावह आहे. स्वतः धैर्यानें लढून शौर्याचे तडाके गाज-विल्यानेंच हें भूषण कधीं मिळत नाहीं. जो स्वतः धैर्यानें आणि शूरत्वानें लढून आपल्या शिपायांच्या आंगांत लढाईचें वारें भरवील, आणि त्यांच्याकडून आपल्या सारखींच धीराचीं आणि मर्दुमकीचीं कामें करवील तोच उदार सेनापती. दयाळु राजा ह्मणवून घेण्याला आपस्वार्थीपणा उपयोगाचा नाहीं. ज्या राजाच्या राज्यांत जिकडेतिकडे समृद्धी आणि सुख भरलेलें दिसतें, तोच कृपाळू राजा. राजाची निवड, त्यानें आपल्या स्वतःच्याच पोळीवर तूप ओढावें ह्मणून कोणी करीत नाहीं; तर तो, ज्यांनीं त्याला निवडलें त्यांनां सुख देईल, ह्मणूनच करितात. लोक शांततेसाठीं लढतात आणि हा आपला हेतु शेवटास नेण्याकरितां आपणांस पुढारी पाहिजे, ह्मणून कोणीतरी सेनापति निवडतात. ह्मणून सेना-

पतीनें याचकारितां आपणास त्या पदवीस चढविणाऱ्या लोकांच्या कल्याणासाठीं होईल तितका प्रयत्न केला पाहिजे. तो साधला ह्मणजे झालें त्याचें काम. त्याचें सर्व वैभव काय तें हेंच! याच्या उलट त्याच्या वर्तनानें जर त्याला निवडून देणारांचें अकल्याण झालें तर त्याच्या सारखी फजेती नाहीं."

या संभाषणावरून, जो राजा आपले प्रजेला सुख देतो, तोच चांगला राजा, असें साक्रेटिसाचें मत होतें असें दिसतें.

# घोडेस्वारांच्या मुख्याचें कर्तव्य.

एकदां साक्रेटिसाची व घोडेस्वाराच्या मुख्याची गांठ पडली असतां साक्रेटीस त्याला ह्मणतो "हें काम पत्करण्याचा तुमचा मुख्य हेतु काय बरें, आपलें नांव सर्वत्र प्रसिद्ध व्हावें असा तर खास नसेल? कारण, वेड लागलेल्या लोकांचेंच नांव सर्वांत अधिक प्रसिद्ध असतें. तर मग हें काम पत्करण्यांत काय बरें तुमचा उद्देश आहे? मला वाटतें, स्वारांच्या पलटणींत असलेले घोटाळे मोडून त्यांच्या उपयोगाची वेळ आली असतां आपल्या हातून देशाची कांहीं तरी चांगली कामगिरी व्हावी, ह्मणून त्या पलटणी सुव्यवस्थित करण्याकरितां तुह्मीं ही जागा पत्करिली असावी, कां असेंच ना?"

तो ह्मणाला "होय, याचकरितां ही कामगिरी पत्करिली."

साक्रेटीस ह्मणाला "वा फार चांगलें. तुमच्या हातून जर हें एवढें काम होईल तर आणखी काय पाहिजे? पण काय हो, हें काम ह्मटलें ह्मणजे तुम्हांला घोड्यावर आणि त्यावर बसणाऱ्या शिपायांवर नेहमी चांगली देखरेख ठेवावी लागत असेल, नाहीं?"

तो म्हणाला "हो, हो! अलबत! ती तर ठेवलीच पाहिजे."

साक्रेटीस ह्मणाला "तुह्मी चांगले घोडे मिळावे ह्मणून काय तजवीज करतां?"

तो ह्मणाला "तें पाहण्याचें माझें काम नाहीं. प्रत्येक स्वारानें ती आपली तजवीज आपण पहावी."

साक्रेटीस ह्मणाला "असें असल्यावर जर त्यांनीं लंगडे, पांगळे, रोडके, अशक्त, खोडकर आणि अडेल घोडे आणले आणि त्यामुळें जर ते सर्वांच्या मागें राहूं लागले, तर मग आपण काय कराल? असल्या स्वारांकडून आपल्या कोणत्या कामगिरी बजावल्या जातील? आणि देशाला आपला काय उपयोग होईल?"

## घोडेस्वारांच्या मुख्याचें कर्तव्य.

तो ह्मणाला " साक्रेटीसबुवा, आपलें ह्मणणें अगदीं बरोबर आहे. यापुढें मी सैन्यांतील घोड्यावर उत्तम प्रकारची देखरेख ठेवीत जाईन."

साक्रेटीस ह्मणाला " आणि स्वारांवर ? त्यांच्यावर नाहीं का तुह्मी नजर ठेवणार ? "

तो म्हणाला " हो, हो ! नाहीं कशी ? त्यांच्यावरहि ठेवीनच !"

साक्रेटीस म्हणाला " तर मग, प्रथम तुम्हीं आपल्या स्वारांना घोड्यावर बसण्याच्या कामांत अगदीं पटाईत केलें पाहिजे, आणि घोड्यावरून खालीं पडण्याची पाळी आली तर धांवत जाऊन घोडा कसा धरावा हेंहि तुह्मीं त्यांना शिकविलें पाहिजें. तुह्मीं कांहीं दिवस हिकडे तर कांहीं दिवस तिकडे अशा निरनिराळ्या ठिकाणीं आणि विशेषतः जशा प्रकारच्या प्रदेशांत आपले शत्रु आहेत, अशा प्रकारच्या ठिकाणीं त्यांची कवाईत घेऊन त्यांनां मैदानांत काय, किंवा डोंगरांत काय, कोठेंहि लढण्याचा प्रसंग आला तरी सारख्याच हिंमतीनें आणि जोरानें घोडे चालविणारे स्वार बनविले पाहिजेत. कारण, आह्मीं आपल्या स्वारांनां मैदानांत कवाईत शिकविली आहे, करितां लढणें असेल तर मैदानांत येऊन लढा, असा निरोप आपणाला आपल्या शत्रूला पाठवितां येणार नाहीं. आणि आपण जरी असा निरोप पाठविला, तरी शत्रू त्याला जुमानणार नाहीं. तुह्मीं त्यांनां भाले मारण्यांत पटाईत केलें पाहिजे, आणि त्यांनीं शूर बनावें अशी तुमची इच्छा असेल तर त्यांच्या मनांत सन्मान मिळविण्याची उत्कट इच्छा तुह्मीं उत्पन्न केली पाहिजे, आणि शत्रूचें नांव ऐकतांच त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला जाईल असें केलें पाहिजे. "

तो ह्मणाला " या कामांत मी अगदीं झटून मेहनत करीन. "

साक्रेटीस ह्मणाला " बरें तुह्मीं आपल्या सैनिकांनां आज्ञाधारक बनविलें आहे काय ? तसें नसेल तर त्यांचा तुह्मांला काडीचाहि उपयोग होणार नाहीं."

तो ह्मणाला " तें सर्व खरें, पण त्यांच्या अंगीं आज्ञाधारकपणा आणण्याला काय केलें पाहिजे ! तें कशानें आज्ञाधारक बनतील."

साक्रेटीस ह्मणाला " एकाद्याच्या अंगांत प्राविण्य आहे असें आढळून आलें ह्मणजे लोक त्याचे अनुयायी बनतात, आणि त्याच्या सांगण्याप्रमाणें वागूं लागतात, हें तुह्माला ठाऊक नाहीं का ? आजारी-पणांत आपण प्रवीण वैद्याच्या धोरणानें वागतों; गलबतावर असतांना उत्तम नावाड्याच्या कह्यांत राहतों; आणि शेतकीच्या कामांत अनुभविक शेतकऱ्याच्या सल्ल्यानें चालतों."

तो ह्मणाला " हें तुमचें सर्व बोलणें मला मान्य आहे."

साक्रेटीस ह्मणाला "झालें तर मग. असें जर आहे तर घोडेस्वारहि ज्याला घोड्याची उत्तम परीक्षा असून जो घोड्यावर बसण्यांत पुरा निष्णांत असेल त्याच्या धोरणानें कां वागणार नाहींत ?"

तो ह्मणाला " मी आपली तशी योग्यता दाखविली ह्मणजे पुरे आहे ना ? तितक्यानेंच ते सर्व आज्ञाधारक बनतील, असें तुह्माला वाटतें ना ?"

साक्रेटीस ह्मणाला "होय, मला तसें वाटतें. ह्यांत काय संशय ! मात्र तुमची आज्ञा पाळण्यांत आपल्या जीवाचें आणि अब्रुचें संरक्षण आहे, अशी तुम्हीं त्यांची खात्री करून दिली पाहिजे."

तो ह्मणाला " काय खात्री ! मी त्यांची खात्री ती कशी करून देणार ?"

साक्रेटीस ह्मणाला " वा हें काम तर फारच सोपें आहे. व्यसनी झाल्यापासून हित आहे कीं निर्व्यसनी राहिल्यानें हित आहे,

हें समजावून सांगण्याचें काम जितकें सोपें आहे तितकेंच वरील गोष्टी संबंधानें खात्री करून देण्याचेंहि काम सोपें आहे. ”

तो ह्मणाला “ तर मग सेनाध्यक्षानें काय वक्तृत्वकलेचाहि अभ्यास करावा, असें तुमचें ह्मणणें ? ”

साक्रेटीस ह्मणाला “होय. एक शब्दहि न बोलतां सेनापति आपलें काम बजावील, अशी तुमची कल्पना आहे, कीं काय? आपल्या आयुष्यक्रमांत अवश्य लागणाऱ्या गोष्टींचें ज्ञान भाषेच्या द्वारें आपण संपादन करितों. भाषेवांचून कोणतेंहि उत्तम ज्ञान आपणाला होणें शक्य नाहीं. भाषण हा एक शिक्षण देण्याचा सर्वांत उत्कृष्ट मार्ग आहे. शास्त्रीयज्ञानांत प्रवीण असलेले लोक बोलूं लागले असतां ऐकणारी मंडळी मोठ्या आनंदानें टाळया वाजवून त्यांचा जयजयकार करिते. सर्व ग्रीस देशांत कोणत्याहि प्रसंगीं अथेन्सचे लोक सर्वांत पुढें सरसावलेले दृष्टीस पडतात, आणि तेथल्या तरुण मंडळीसारखी होतकरू मंडळी दुसऱ्या देशांत पहावयास सांपडत नाहीं, ही गोष्ट कधीं तुह्मीं लक्षांत आणली आहे काय ? फार लांब कशाला ? उदारणार्थ एक गाणाऱ्या मुलांचा मेळाच कां घ्याना ? उत्सावप्रसंगीं अपोलाच्या देवळांत निरनिराळया शहरांहून अनेक मेळे येतात; परंतु अथेन्सच्या संगीत मेळया सारखा एक तरी मेळा तुह्मांला तेथें आढळतो काय ? याचें कारण काय ? अथेन्सच्या मुलांचें आवाज, इतर शहरांच्या मुलापेक्षां उत्तम नाहींत, आणि त्यांचीं शरिरें सुंदर आणि बांधेसुत नाहींत. मग असें कां होतें ? याचें कारण फक्त एकच आहे, आणि तें अथेन्सच्या लोकांची सन्मान मिळविण्याविषयींची अत्युत्कट इच्छा हेंच होय. या सन्मानेच्छेमुळेंच लोक चांगली कृत्यें करण्याला प्रवृत्त होतात. आपल्या घोडेस्वारांची आपण योग्य काळजी घेतली,

आणि आपलीं हत्यारें आणि घोडे जय्यत राखण्यांत, कवाइतीमध्यें प्राविण्य संपादन करण्यांत, आणि लढाईचे प्रसंगीं शौर्यानें तडाखे गाजविण्यांतच खरें वैभव आणि कीर्ति आहे अशी त्यांची खात्री करून दिली, तर ते इतर राष्ट्रांतील स्वारांच्या पलटणीवर सहजच ताण करतील."

तो ह्मणाला "होय मलाहि असें वाटतें."

साक्रेटीस ह्मणाला "जा तर, आणि आपल्या सैनिकांवर चांगली देखरेख ठेवा, आणि स्वदेशाची थोडी तरी सेवा आपल्या हातून घडावी अशी तुमची इच्छा असेल तर तुमचे सैनिक तुमच्या प्रथम चांगले उपयोगी पडतील असें करा."

तो ह्मणाला "साक्रेटीसबुवा, तुमचा उपदेश फार चांगला आहे, आणि त्याप्रमाणें वागण्याची माझी तयारी आहे."

## स्वतःच्या संसारांत दक्ष असणारा मनुष्य प्रसंगीं योग्य सेनापति होऊं शकेल.

निवडणुकीहून परत येत असतां साक्रेटीसानें निकोम्या किडस यास विचारिलें "सेनापतिच्या जागीं कोणाची निवड झाली?"

निकोम्या किडस ह्मणाला "काय सांगू हो, मीं आपलें सर्व आयुष्य लढाईच्या कामांत घालविलें असतां, व दारावर हुडेल हूप करणाऱ्या यःकश्चित् शिपायापासून कॅपटन, कर्नल वगैरे मोठमोठ्या हुद्याच्या कामगिऱ्या मीं बजावल्या असतां, हें पहा (आपल्या छातीवर असलेले जखमांचें वण साक्रेटीसास दाखवून) माझ्या या सर्व आंगभर लढाईत झालेल्या जखमांचे वण ढळढळीत दिसत असतांहि शेवटीं त्यांनीं ऍन्टिस्थेनिसचीच नेमणूक त्या जागयावर केली! काय त्याची स्थिति! विचाऱ्यानें लढाईचें मैदान देखील पाहिलें नसेल, पैसा मिळविण्यामध्यें मात्र पक्का मारवाडी आहे."

साक्रेटीस ह्मणाला "ठः, मग काय पाहिजे! तो सैन्याला पुष्कळ पगार देईल."

निकोम्या किडस ह्मणाला "अहो, दुकानदार देखील याच्या सारखा पैसा मिळवील, ह्मणून का त्याला सेनापति नेमावा?"

साक्रेटीस ह्मणाला "त्याचा एक गुण कोठें तुह्मीं ध्यानांत आणिला आहे? त्याला मानाची फार आवड आहे. जें काम हातीं घ्यावयाचें त्यांत सर्वांवर ताण करून कीर्ति मिळवावयाची! हा त्याचा गुण सेनापतीच्या अंगीं अवश्य पाहिजे. नाटकाच्या प्रयोगांत त्यानें किती वेळां बक्षिस मिळविलें आहे बरें?"

निकोम्या किडस ह्मणाला "सूत्रधार होऊन नाटकपात्रांव्य हुकमत चालविणें, आणि सेनापति होऊन सैन्याला हुकूम सोडणें, यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे."

साक्रेटीस म्हणाला "नाट्य किंवा संगीत याचें स्वतःस ज्ञान नसतां त्यानें या दोहोंत चांगलें निपूण असे लोक जमवून मोठी कीर्ति संपादन केली."

निकोम्या किडस म्हणाला "मग त्याप्रमाणेंच तो आपणां करतां हुकूम सोडणारे आणि आपल्या जागीं लढणारे लोक जमवून कीर्ति मिळविणार, असें कां तुम्ही म्हणतां?"

साक्रेटीस म्हणाला "हो, याला काय हरकत आहे! या कामांत कुशल लढवय्ये आणि सल्लागार लोक त्यानें मिळविल्यास नाटका- प्रमाणेंच युद्धांतहि त्याला कां यश मिळूं नये? केवळ आपल्या मंडळीची वाहवा व्हावी म्हणून भपका दाखवून लोकांनां तल्लीन करण्यासाठीं नाटकाच्या कामांत पैसे खर्च करण्यापेक्षां तो शत्रूच पराभव करून आपल्या राष्ट्राचा मान आणि कीर्ति वाढविण्याकरत आधिक उत्सुकतेनें पुष्कळ पैसे खर्च करील."

निकोम्या किडस म्हणाला "तर काय असा सिद्धांत काढावयाच कीं, ज्याला नाटक कसें करावें हें समजतें, त्याला सैन्य कसे वागवावे हेंहि कळतें."

साक्रेटीस म्हणाला "नाहीं, तसें नाहीं. सिद्धांत असा काढा- वयाचा, कीं, आपला हेतु शेवटास नेण्याकरितां कोणत्या गोष्टींचे आवश्यकता आहे, व त्या गोष्टी कशा संपादन करावयाच्या हें ज्याला कळतें त्याला नाटक करावयाचें असो, राज्य चालवावयाचे असो, सैन्यव्यवस्था पहावयाची असो, किंवा संसाराचें गाडें हाकावयाचें असो कांहींहि असले तरी अपयश येत नाहीं."

REFBK-0001111